लक्ष्मीबाई टिळकांची स्मृतिचित्रे एक चिंतन

म. ग्रं. सं. ठाणे.
विषय निबंध
सं. क्र. 3281



REFBK-0025554

प्रा. मीर इसहाक शेरव

संपर्क निबंध

3287
२५५०४
२०१९८८

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :–खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ [८] नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

10 FEB 1988

13 MAR 1988

16 JUL 1988

(क्र. मा. पहा)
५०००–११–८६

लक्ष्मीबाई टिळकांची स्मृतिचित्रे एक चिंतन

प्रा. मीर इसहाक शेख

REFBK-0025554

प्रतिमा प्रकाशन, पुणे ३०.

प्रकाशन क्र. ३५

प्रकाशक :
अरुण वि. पारगावकर
प्रतिमा प्रकाशन,
१३५९, सदाशिव पेठ, नवा विष्णु चौकाजवळ,
पुणे ३०.

मुद्रक :
प्रकाश शंकर शिळीमकर
प्रकाश प्रिंटिंग प्रेस,
स. नं. १३०, दांडेकर पूल,
रामकृष्ण आश्रमसमोर, पुणे. ३०.

सर्व हक्क सुरक्षित

मुखपृष्ठ :
अभय पुरंदरे.

प्रथमावृत्ती : १५-९-८७

मूल्य : १५ रुपये

हया पुस्तकाचे प्रकाशनार्थ महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे अनुदान मिळाले आहे.

माझे पूज्य वडील
श्री. सुलेमान दादामियाँ शेख
यांच्या पवित्र स्मृतीस

– मीर इसहाक शेख



अनुक्रमणिका

प्रकरण – १ आत्मचरित्र – एक वाङ्मय प्रकार पृष्ठ ९ – २६

प्रास्ताविक– आत्मचरित्राची व्याख्या – चरित्र व आत्मचरित्र – कादंबरी व आत्मचरित्र – आत्मचरित्राचे स्वरुप – आत्मचरित्र लेखनामागील प्रेरणा – आत्मचरित्राचे स्वरुप विशेष – सत्यदर्शन, भावनाविष्कार, समाजदर्शन, व्यक्तिचित्रण.

प्रकरण – २ व्यक्तिचित्रणाची कला पृष्ठ २७ – ३५

स्वभावलेखनकलेचे वाङ्मयातील स्थान – स्वभावलेखनाच्या तीन पायऱ्या – मनोरचनेचे दर्शन हवे – स्वभावलेखनासाठी निवडलेली व्यक्ती 'प्रतिमा' असावी– स्वभावलेखनातील सुसंगती – कादंबरी व नाटक यातील स्वभाव-लेखन – लघुकथातील व्यक्तिरेखा – आत्मचरित्रातील व्यक्तिचित्रण.

प्रकरण – ३ मराठीतील आत्मचरित्रात्मक लेखन व 'स्मृतिचित्रे' पृष्ठ ३६ – ५५

पुरुषांचे आत्मचरित्रपर लेखन – स्त्रियांचे आत्मचरित्रपर लेखन– 'स्मृति-चित्रां' चे वाङ्मयीन स्वरूप – १. 'स्मृतिचित्रां' ची रचना २. समाजदर्शन ३. प्रसंगनिर्मिती ४. भाषाशैली.

प्रकरण – ४ 'स्मृतिचित्रां' तील व्यक्तिचित्रण पृष्ठ ५६ – १०३

१. लक्ष्मीबाईंचे 'स्व'भावचित्र – २. रेव्ह. ना. वा. टिळक ३. नाना गोखले ४. भिकूताई ५. वामनराव उर्फ मामंजी ६. महादेवभाऊजी ७. सखाराम-भाऊजी ८. डॉ. हचूम ९. बालकवी – 'स्मृतिचित्रां' तील व्यक्तिचित्रणाचे परीक्षण.

संदर्भ ग्रंथ सूची.

भूमिका

'स्मृतिचित्रां'चा हा अभ्यास केवळ वाङ्मयीन दृष्टिकोनातून सादर केलेला नसून तो वाङ्मयीन व सामाजिक असा दुहेरी आहे. कारण 'स्मृतिचित्रे' हे एका स्त्रीचे–गृहिणीचे आणि धर्मांतर केलेल्या एका विचारवंत स्त्रीचे आत्मचरित्र आहे. या आत्मचरित्रात कौटुंबिक आणि सामाजिक प्रश्नांची लक्ष्मीबाई टिळकांनी चिकित्सा केली आणि विशिष्ट कालखंडातील स्त्री–जीवनाला वेढून बसलेल्या सुखदुःखाचेही–प्राधान्याने दुःखांचे, आपत्तींचे-चित्रण केले. त्यामुळे हे आत्मचरित्र केवळ लक्ष्मीबाईचे ठरत नाही. एका सामाजिक आणि धार्मिक परिस्थितीचा तो इतिहासही आहे, याचे भान ठेवून या पुस्तकाची मी मांडणी केली आहे.

लक्ष्मीबाईंनी रेखाटलेली भिन्न–भिन्न वृत्ती – प्रवृत्तींची व्यक्तिचित्रे, त्यांची घरगुती सहजसुंदर शैली आणि त्यातून उलगडत जाणारे लक्ष्मीबाईंचे अनुभवविश्व यांचा मागोवा घेण्याचा व त्यातील वैशिष्ट्ये स्पष्ट करण्याचा मी प्रयत्न केला आहे.

'स्मृतिचित्रे' हे एक बालबोध पुस्तक वाटले तरी ते तसे नाही. कारण या आत्मचरित्राने तत्कालीन स्त्रीजीवनावर आणि विशेषतः धार्मिक, सामाजिक संकेतावर स्पष्ट प्रकाश टाकला आहे. एका बालबोध वाटणाऱ्या पण नाना प्रकारचे अनुभव गोळा केलेल्या एका विचक्षण आणि रसज्ञ वृत्तीच्या कलावती सुगृहिणीने सहजगत्या आपल्या स्वतःच्या, आपल्या पतीच्या आणि आप्त–नातलगांच्या भावजीवनावर शोधक झोत टाकला आहे, 'स्व' ला

बाजूला ठेवून आजुबाजूच्या जगाकडे काहीशा मिस्किल-पणाने पण सखोलपणाने पाहण्याची एक दुर्मिळ समजूतदार वृत्ती लक्ष्मीवाईंच्या ठायी असल्यामुळे हे आत्मचरित्र केवळ आत्मचरित्रात्मक वाङ्मयातच नव्हे तर मराठी वाङ्मयातसुद्धा 'अक्षर' स्वरूपाचे एक लेणे होऊन वसले आहे. अशा या साहित्यकृतीवद्दलचे माझे चिंतन मी वाचकांच्यापुढे प्रकट करीत आहे.

हे पुस्तक लिहितांना वेळोवेळी मला ज्यांच्याशी केलेल्या चर्चेचा लाभ झाला त्यांचा याठिकाणी मी साभार उल्लेख करतो. डॉ. ल. रा. नसिरावादकर, डॉ. गो. मा. पवार, डॉ. निर्मलकुमार फडकुले, डॉ. राजशेखर हिरेमठ यांनी केलेले सहाय्य व मार्गदर्शन मोलाचे आहे.

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने या पुस्तका-साठी अनुदान दिले आणि 'प्रतिमा' प्रकाशना' चे श्री. अ. वि. पारगावकर यांनी पुस्तक–प्रकाशनाची जवाबदारी स्वीकारली व अल्पावधीतच हे पुस्तक सुबक स्वरूपात प्रकाशित केले यावद्दल साहित्य संस्कृती मंडळ व 'प्रतिमा प्रकाशन' यांचा मी मनःपूर्वक ऋणी आहे.

सोलापूर. मीर इसहाक शेख

प्रकरण पहिले

आत्मचरित्र : एक वाङ्मयप्रकार

प्रास्ताविक

साहित्य हे मानवी जीवनाचे एक महत्त्वाचे अंग आहे. मनुष्य जसजसा बुद्धिमान होत गेला, विचारवंत होत गेला, तसतसा तो सामाजिक जीवनाशी अधिकाधिक समरस होत गेला. या समरसतेतून तो दुसऱ्या व्यक्तीसमोर आपल्या मनातील विचार, भावना व कल्पना अभिव्यक्त करू लागला. अशा अभिव्यक्तीच्या विकासामध्ये कधी कधी त्याला असे जाणवू लागले की, आपल्या मनातील विचार, भावना, कल्पना केवळ व्यक्त करण्यापेक्षा त्या उत्कटत्वाने व सौंदर्यपूर्णरीतीने व्यक्त केल्या तर त्याचा परिणाम अधिक होतो आणि त्याचा प्रभावही पडतो. ही जाणीव ज्या वेळेस त्यास झाली त्याच वेळेला मानवी जीवनात कलाजीवनाचे बीजारोपण झाले, असे आपणास म्हणता येईल. मनुष्य हा अधिकाधिक प्रगतिशील होताना तो संस्कृतीमय झाला आणि कला ही त्याच्या सांस्कृतिक जीवनाची एक महत्त्वाची फलश्रुती ठरली.

अशा कलांमध्ये साहित्य ही नंतरची कला असली तरी ही सर्व कलांपेक्षा अधिक महत्त्वाची व अधिक सामर्थ्यशाली अशी अभिव्यक्ती आहे. त्यामुळे सर्व कलांपेक्षा साहित्यकलेचा अधिक प्रसार झालेला दिसून येतो. कारण शब्द हे जे साहित्याचे माध्यम ते मानवी जीवनाशी अधिक निकटवर्ती आहे. आणि इतर कोणत्याही माध्यमापेक्षा या माध्यमातून–शब्दातून–मनुष्य स्वतःला अधिक समर्थपणे व्यक्त करू शकतो. त्याची मूळ प्रेरणा ही मानवी मनात व जीवनात असते. त्यामुळे साहित्य व जीवन यांचा अत्यंत निकटचा संबंध आहे. साहित्य समीक्षकांनी साहित्याच्या विविध दृष्टिकोणातून व्याख्या केल्या असल्या तरी साहित्याची मानवी जीवनापासून फारकत करता येणार नाही. निदान साहित्यातील काही वाङ्मयप्रकार तरी असे आहेत की ज्यांचा जीवनाशी अगदी जवळचा संबंध असतो. काही साहित्यिकही असे असतात की जे जीवनाच्या आधारेच आपल्या अनुभवांची अभिव्यक्ती करीत राहतात, जीवनाचा शोध घेत राहतात. मॅथ्यू अर्नाल्डने 'Poetry is the criticism of life under the conditions fixed for such a criticism by the laws of

poetic truth and poetic beauty–' ' असे जे उद्‌गार काढले आहेत, ते महत्त्वपूर्ण आहेत.

साहित्यात जीवनानुभवांचा आविष्कार असतो, त्याप्रमाणे जीवनभाष्यही असते. आपल्याला आलेल्या विविध अनुभवांचा आविष्कार करता करता अनाकलनीय, व्यामिश्र व गुंतागुंतीच्या असलेल्या जीवनाचे स्वरूपही स्पष्ट करावे, अशी साहित्यकाराची अपेक्षा असते. यातूनच सर्व प्रकारच्या साहित्यकृतींचा उगम झाला आहे. कथा, कादंबरी, नाट्य, काव्य या सर्वांच्या मुळाशी लेखकाची जीवनानुभूती असते. अर्थात आपले जीवनानुभव प्रत्येकजण वेगवेगळ्या पद्धतीने व्यक्त करीत असतो. सामान्यतः त्याबाबतीत आपणास दोन प्रवृत्ती दिसतात– १. वस्तुनिष्ठ चित्रण– स्वतःला अलिप्त ठेवून स्वतःचे किंवा इतरांचे अनुभव व्यक्त करणे. २. आत्मनिष्ठ चित्रण– स्वतःचे किंवा इतरांचे अनुभव स्वतःच्याच अनुभवांच्या आधारे चित्रित करणे. वास्तविक पाहता या प्रवृत्ती केवळ साहित्यकारांच्या नसून त्या मानवी प्रवृत्तीच आहेत. मानसशास्त्राने introvert (अंतर्मुख) व extrovert (बहिर्मुख) या शब्दात या प्रवृत्तींचे वर्णन केले आहे. या प्रवृत्ती साहित्यकारांच्या ठिकाणीही आढळतात. त्यातील आत्मनिष्ठ प्रवृत्तीतून जे वाङ्‌मयप्रकार निर्माण झाले आहेत, त्यात आत्मनिष्ठेचीच कसोटी लावायची झाली तर आत्मचरित्राला पहिले स्थान द्यावे लागेल. कारण इतर कोणत्याही वाङ्‌मयप्रकारामध्ये 'सत्य' असले तरी त्या सत्याचा कलात्मक, कल्पनाविलासात्मक, सौंदर्यात्मक आविष्कार झालेला असतो. म्हणजेच साहित्यात केवळ सत्य नसून सत्याभास असतो. परंतु आत्मचरित्रात सत्याभासाला स्थान नसून केवळ सत्यालाच महत्त्व असते. जीवनाचे यथार्थ चित्रण ही तर त्याची मूळ प्रेरणा.

आत्मचरित्र म्हणजे व्यक्तीचा इतिहास होय. त्यामुळे इतिहासातील सत्याप्रमाणे त्याचे स्वरूप असते. आत्मचरित्राला ललितकृती म्हणण्याऐवजी ऐतिहासिक कृती म्हणावे काय, असा एक प्रश्न त्यामुळेच उपस्थित होऊ शकतो. परंतु इतिहासकाराची भूमिका व आत्मचरित्राची भूमिका पाहता आत्मचरित्राला इतिहास म्हणणे, शास्त्राचा एक प्रकार म्हणणे अवघड आहे. कारण इतिहासकार घटनांपासून अलिप्त असतो, तसा आत्मचरित्रकार अलिप्त असत नाही. आत्माविष्कार ही इतिहासाची प्रेरणा नसून ललितवाङ्‌मयाची प्रेरणा आहे. म्हणून आत्मचरित्राला ललितकृती असेच म्हणणे योग्य ठरेल. आत्मचरित्रात घटना असतात, पण त्यांचे कलात्मक चित्रण असते. आत्मचरित्र लिहिणाऱ्या लेखकाच्या भावना, कल्पना, विकार, भाषाशैली यांचा त्या लेखनास स्पर्श झालेला असल्याने आत्मचरित्राचे स्वरूप कथा–कादंबरीसारखे मनोरंजक बनलेले असते. आत्मचरित्रात कल्पनाविलासात्मक वर्णन नसते तसेच इतिहासाप्रमाणे घटनांचा केवळ रूक्ष तपशीलही नसतो. इतिहासाची सत्यनिष्ठता व कथावाङ्‌मयाची मनोरंजकता यांचा त्यात मिलाफ झालेला असतो. म्हणून आत्मचरित्र

हे एकाच वेळी इतिहास आणि कादंबरीही असते. अर्थात आत्मचरित्रकाराने कोणत्या भूमिकेतून आत्मचरित्र लिहिले आहे, यावरही त्याची कलात्मकता अवलंबून असते. परंतु बहुधा आत्मचरित्राची प्रकृती ही ललितवाङ्मयाच्या प्रकृतीशी जुळणारी असल्याने एक ललितकृती म्हणूनच तिचा विचार करणे योग्य ठरते.

परंतु ही ललितकृती कथा, कादंबरी, कविता, नाट्य या वाङ्मयप्रकाराप्रमाणे तंत्रनिष्ठ असत नाही. आत्मचरित्र हा एक मुक्त वाङ्मयप्रकार आहे. आत्मचरित्राचे विशिष्ट असे तंत्र नसल्याने प्रत्येक आत्मचरित्र दुसऱ्या आत्मचरित्रापेक्षा वेगळे आढळते. प्रत्येकाचे आयुष्य हे एखाद्या कादंबरीप्रमाणेच विविध भावपूर्ण घटनांनी ओथंबलेले असते. अगदी रूक्ष, एकमार्गी आणि नीरस, लालित्याचा किंचितही स्पर्श न झालेले असे मानवी जीवन संभवू शकत नाही. याचे कारण प्रत्येक व्यक्ती दुसऱ्या व्यक्तीहून अनेक अर्थाने भिन्न असते. प्रत्येक व्यक्तीच्या ठायी जीवन नावाचे तत्त्व एकच असले तरी नाना प्रकारची चित्रविचित्र रसायने त्या जीवनात सृष्टीने मिसळलेली असतात. रूसोचे 'कन्फेशन्स' आणि आपल्याकडील वि. रा. शिंदे यांचे 'माझ्या आठवणी आणि अनुभव' ही आत्मचरित्रे तुलनेसाठी घेतली तर असे जाणवते की, देश, काल, परिस्थिती, सामाजिक दृष्टी, वृत्ती, जीवनविषयक विचार या सर्व बाबतींत कमालीची भिन्नता आढळून येते. मानवी जीवनालाच जेथे विशिष्ट आकार नाही तेथे त्याच्या चित्रणाला तरी विशिष्ट आकारात आणि तंत्रात कसे बांधता येईल ? म्हणून अशा वाङ्मयकृतीची समीक्षा ही तंत्रनिष्ठ करण्यापेक्षा आस्वादनिष्ठ करणे योग्य ठरेल.

आत्मचरित्राची व्याख्या

आत्मचरित्र हा एक वैशिष्ट्यपूर्ण वाङ्मयप्रकार आहे. आत्मचरित्र हे एका व्यक्तीचे चरित्र असून ते तिने स्वतःच लिहिलेले असते. आत्मचरित्रकार आपल्या जीवनाचा पट स्वतःच उलगडून दाखवितो स्वतः अनुभविलेल्या जीवनाचे चित्र स्वतःच रेखाटतो. म्हणून प्रत्येक आत्मचरित्र हा लेखकाच्या स्वजीवनाचा इतिहास असतो. श्री. रा. ग. जाधव यांनी 'आपल्या जीवनविषयक अनुभवांचे तदनुषंगाने आपल्या व्यक्तिमत्त्वाचे स्वतः लेखकाने लेखनरूपाने घडविलेले दर्शन म्हणजे आत्मचरित्र होय' [२] अशी आत्मचरित्राची व्याख्या केली आहे.

आत्मचरित्र हा चरित्रवाङ्मयाचाच एक प्रकार आहे. चरित्रात चरित्रलेखक व चरित्रविषयभूत व्यक्ती ही भिन्न असतात. आत्मचरित्रात मात्र या दोन्ही भूमिका एकाच व्यक्तीला पार पाडावयाच्या असतात. त्यामुळे साहजिकच आत्मचरित्राला एक मर्यादाही येते. आत्मचरित्र हे कधीही संपूर्ण असू शकत नाही. कारण त्यामध्ये व्यक्तीच्या जन्मापासून तिच्या मृत्यूपर्यंतची हकीकत येऊ शकत नाही. म्हणून डब्ल्यू. एच. डन या ग्रंथकाराने आत्मचरित्राचे 'मस्तक व

अवयवविरहित मूर्ती (The true autobiography is but a torso)'[३] असे वर्णन केले आहे. तथापि चरित्रकार देखील आवश्यक अशा निवडक घटनांच्या साहय्याने चरित्रनायकाच्या जीवनावर प्रकाश पाडू शकतो. आत्मचरित्रकाराला आपल्या आयुष्यातील वैशिष्टयपूर्ण घटनांचीच निवड करून आपल्या जीवनाचे चित्र रंगवायचे असते. तथापि जन्ममृत्यूच्या सीमारेषांना स्पर्श न करताही व्यक्तिजीवनाचे समग्र दर्शन घडविणे शक्य असल्याने अपूर्णता हा आत्मचरित्राचा दोष मानता येणार नाही. स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकरांच्या 'माझी जन्मठेप' या आत्मचरित्रामध्ये त्यांच्या जीवनातील भयानक अंदमान पर्वाचाच भाग समाविष्ट असला तरी त्यामुळे त्यांच्या भव्योदात्त व्यक्तिमत्त्वाचे दर्शन वाचकांना घडल्याशिवाय राहात नाही.

चरित्र हे वस्तुनिष्ठ असल्याने असंख्य उपलब्ध अशा बाहयपुराव्यांच्या आधारे चरित्रकाराला चरित्रनायकाच्या बाहयजीवनाकडून त्यांच्या आंतरजीवनाकडे जावे लागते. चरित्रनायकाच्या जीवनातील विविध घटना व प्रसंग घेऊन तो त्याचे व्यक्तिमत्त्व रेखाटत असतो. याउलट, आत्मचरित्रकार हा आपल्या चरित्राचा स्वतःच लेखक असल्याने आत्मनिष्ठपणे तो आपली मनःप्रवृत्ती वाचकापुढे उघड करून आपल्या जीवनात घडलेल्या घटनांची संगती दर्शविण्याचा प्रयत्न करतो. चरित्रकार हा चरित्रनायकाच्या अंतःकरणापर्यंत पोहोचू शकला नाही, तर त्याचे चरित्रलेखन कलात्मक ठरणार नाही. आत्मचरित्रकार मात्र आपले अंतःकरण वाचकांना उघडे करून दाखवू शकतो व त्याचप्रमाणे आपल्या जीवनातील विविध घटना, प्रसंग व अनुभव यांचे कथनही करू शकतो. याप्रमाणे तो आपल्या आंतर व बाहय, दोन्ही जीवनाचे दर्शन घडवू शकतो. म्हणून डॉ. जॉन्सनने 'Every man's life may be best written by himself'[४] असे उद्‌गार काढले आहेत. बॉस्वेलने जॉन्सनचे चरित्र लिहिले; पण त्यालाही, डॉ. जॉन्सनने आपले आत्मचरित्र लिहून ठेवले असते तर बरे झाले असते, असे वाटत असे.

चरित्रलेखनासाठी असामान्य व्यक्तीची नायक म्हणून निवड करणे योग्य असते. तथापि आत्मचरित्राचे लेखन करण्यासाठी असे कोणतेच बंधन नाही. सामान्य माणसाचे सत्यदर्शन घडविणारे आत्मचरित्र देखील श्रेष्ठ दर्जाचे ठरू शकते. '...any life, however insignificant would, if truthfully told, be of interest'[५] हे कोलरिजचे वचन या दृष्टिकोणातून लक्षात ठेवण्याजोगे आहे.

चरित्र व आत्मचरित्र या दोन्हीही वाङमयप्रकारांतील चरित्रविषयभूत व्यक्ती सामान्य असो वा असामान्य, परंतु ती वास्तवातील असते, हे या दोन्ही वाङमयप्रकारांतील एक साम्य म्हणून सांगता येईल. कथा–कादंबरी–नाटक वा इतर ललित साहित्यकृतीतील नायक–नायिकांप्रमाणे ती कल्पनानिर्मित नसते. वास्तवाचे अधिष्ठान लाभलेल्या चरित्रनायकाच्या चित्रीकरणातून मानवी स्वभावाचे खरे दर्शन घडविणे हे चरित्र या वाङमयप्रकाराच्या मर्यादांमुळे पूर्णतः शक्य

नसते. तथापि आत्मचरित्रकार हाच स्वतः लेखक असल्याने आत्मचरित्रातून मानवी स्वभावाचे खरे दर्शन अधिक प्रभावीपणे घडू शकते. आत्मचरित्रकार आपले आंतर-विश्व वाचकापुढे समर्थपणे उभे करू शकतो. डी. जी. नाईक यांनी या संदर्भात व्यक्त केलेले विचार महत्त्वाचे वाटतात. ते म्हणतात, 'Autobiography is primarily subjective. It is built from within outward. The invisible world within the individual is revealed to the readers and that too by no less an authority than the individual himself It is therefore first–hand and direct in formation and no guess–work.'[६] ही first–hand information चरित्रकाराला उपलब्ध नसल्याने त्याला चरित्रनायकाच्या व्यक्तिमत्त्वाचा शोध घेण्यात अडचणी येतात. चरित्रनायकाच्या कृतीतून नेहमीच त्याचे व्यक्तिमत्त्व दिसून येते, असे त्याला निश्चयाने सांगता येत नाही. म्हणूनच डॉ. जॉन्सन म्हणतो, 'The biography is likely to be truthful if it is an autobiography.'[७]

एकवेळ चरित्रलेखन सोपे ठरेल, परंतु आत्मचरित्रनिवेदन म्हणजे तारेवरील कसरत आहे. नायकाच्या चरित्राची साधने जमा करून व त्याच्या जीवनाशी समरस होऊन सत्यशोधन करणे हे तितकेसे कठीण नाही. परंतु स्वतःविषयी व स्वतःच्या जीवनातील घटनाप्रसंग व अनुभवाविषयी अलिप्तता स्वीकारून निवेदन करणे सामान्य माणसाच्या शक्तीबाहेरची गोष्ट आहे. चरित्रकाराप्रमाणे आत्मचरित्र-काराला कल्पनाशक्ती, बुद्धिमत्ता, व्यासंग व परिश्रम यांची विशेष आवश्यकता नसतानाही आत्मचरित्राचे कलात्मक लेखन करणे म्हणूनच कठीण असते. चरित्र व आत्मचरित्र हे दोन्हीही वाङ्मयप्रकार एकमेकांशी निगडित असले तरी मूलतः ते स्वतंत्र व स्वयंभू असे आहेत.

कादंबरी व आत्मचरित्र

कादंबरी व आत्मचरित्र या दोन्ही वाङ्मयप्रकारामध्ये व्यक्तिजीवनाची कहाणी आलेली असते. मानवी जीवनाचे दर्शन घडविणे हे दोहोंचेही उद्दिष्ट आहे. तथापि आत्मचरित्रातील कथेचे पाय वास्तवाच्या पक्क्या मातीत रोवलेले असतात, तर कादंबरीतील कथानक हे पूर्णपणे काल्पनिक असू शकते. मनोरंजन हे कादंबरीचे ध्येय असते, तर आत्मचरित्रामध्ये आत्माविष्करणाची भूमिका प्रधान असते. कादंबरी हा 'फॉर्म' असल्यामुळे तंत्राची बंधने जशी त्याला लागू असतात, तशी आत्मचरित्राला लागू नसतात. म्हणून दोन्ही वाङ्मयप्रकारांची प्रकृती भिन्न आहे, असे म्हणावे लागेल.

कादंबरीतील नायक हा कल्पनानिर्मित असला तरी त्याचे चित्रण वास्तवदर्शी करण्याचा प्रयत्न कादंबरीकार करतो. अशा वेळी तो प्रत्यक्षातील अनुभवांची नवीन

रचना अगर संपूर्ण कायापालट करू शकतो. कादंबरीतील प्रसंग सौंदर्यपूर्ण, संघर्षमय व हृदयस्पर्शी करण्यासाठी तो सत्य व कल्पिताचे मिश्रणही करू शकतो. आत्मचरित्रकाराला मात्र हे स्वातंत्र्य मिळू शकत नाही. आपल्या जीवनातील वास्तवाला कल्पनेचे अस्तर तो लावू शकत नाही. तथापि आत्मचरित्र लिहिताना तो वाचकांना प्रभावित करतील अशा घटनांची व प्रसंगांची निवड व जुळणीही करू शकतो. आत्मचरित्रकाराला आपल्या संपूर्ण जीवनाचे दर्शन घडवायचे असते. कादंबरीकाराला हे बंधन नसते. तो आपल्या नायकाच्या जीवनाचे संपूर्ण दर्शनही घडवू शकेल किंवा त्यातील एखाद्या कालखंडाचे चित्रणही करू शकेल.

कादंबरीकार आपल्या पात्रांची निर्मिती त्याला आलेल्या जीवनानुभवावरून किंवा कल्पनाशक्तीने करू शकतो. ही पात्रे वाचकांना अमानवी किंवा अवास्तव वाटू नयेत याची काळजी तो घेतो. आपल्या कल्पनाशक्तीने प्राण ओतून त्यामध्ये जिवंतपणा व अस्सलपणा आणतो, आत्मचरित्रातील पात्रे मात्र खऱ्याखुऱ्या हाडामांसाची व शंभर टक्के सत्य असतात. अ. म. जोशी म्हणतात, 'कादंबरीकार आपणच निर्माण केलेल्या पात्राच्या अंतःकरणात बुडी मारून त्याच्या वर्तनाची संगती लावण्याकरिता आपणास अनुकूल अशी प्रमाणे काढू शकतो. परंतु ईश्वरनिर्मित मनुष्य हा असा अजब प्राणी आहे, त्याचे मन समुद्रासारखे इतके खोल आहे, की त्याचा ठाव घेण्याचा प्रयत्न करणारा मनुष्य बुडून मात्र मरावयाचा!'[८] यास्तव आत्मचरित्रकाराने स्वतःचे व त्याला जीवनात भेटलेल्या व्यक्तीचे केलेले चित्रण बऱ्याच वेळा अपूर्ण व विवादास्पद देखील ठरू शकते. आपल्या जीवनातील काही अनुभव किंवा व्यक्तीसंबंधाने घडलेल्या घटना अप्रिय म्हणून आत्मचरित्रकाराने टाळण्याचा प्रयत्न केला तर ते आत्मचरित्र परिपूर्ण ठरू शकणार नाही. ना. सी. फडके यांचे 'माझे जीवन-एक कादंबरी' हे आत्मवृत्त म्हणूनच कादंबरीसदृश ठरले आहे!

आत्मचरित्रात केवळ आयुष्यातील घटनांची जंत्री दिली तर ते रूक्ष व नीरस होईल व कथा-कादंबरीसारखी आकर्षकता त्याला प्राप्त होणार नाही. परंतु आत्मचरित्रकाराने जीवनातील हृदयस्पर्शी घटना व समरप्रसंगांची नाट्यपूर्ण मांडणी करीत प्रसन्न व मोहक शैलीत आत्मनिवेदन केले तर ते कथा-कादंबरीइतकेच आकर्षक व कलात्मक ठरू शकेल आत्मचरित्राला रंजकता यावी किंवा आत्मचरित्रलेखनाच्या काही पथ्यांपासून सुटका व्हावी म्हणून आत्मचरित्रात्मक कादंबऱ्याही लिहिल्या गेल्या आहेत. उदाहरणार्थ, चार्लस् डिकन्स याचे, 'डेव्हिड कॉपरफील्ड.'

आत्मचरित्र व कादंबरी या वाङ्मयप्रकारांचे नाते स्पष्ट करताना श्री. गंगाधर गाडगीळ म्हणतात, '... आत्मचरित्र हे कादंबरीपेक्षा मूलतः भिन्न नाही. फरक इतकाच की आत्मचरित्र ही एक कादंबरी असते आणि त्याच वेळेला

एका व्यक्तीच्या जीवनाचा तो इतिहासही असतो. परस्परांशी एकजीव झालेली (निदान एकजीव होण्याचा प्रयत्न करणारी) दोन पुस्तके म्हणजे आत्मचरित्र.'[९] आत्मचरित्र व कादंबरी यांचा असा निकटचा संबंध आहे. आत्मचरित्र हे एकाच वेळी इतिहास आणि कादंबरी असल्यामुळे उत्कृष्ट आत्मचरित्र हे इतिहास म्हणून आणि कादंबरी म्हणून देखील उत्कृष्ट असावे लागते.

आत्मचरित्राचे स्वरूप

आत्मचरित्र म्हणजे स्वत: लेखकाने आपल्या व्यक्तिगत जीवनाची स्वत:च्या शब्दात सांगितलेली कहाणी. डॉ. नाईक यांनी आपल्या साध्या व्याख्येतून म्हटले आहे, ' Autobiography in its simplest definition, is the story to one's life written by oneself.'[१०] परंतु ते केवळ घटनांचे निवेदन नसते, तर घटनांचे सिंहावलोकन असते. म्हणून 'एन्सायक्लोपीडिया ब्रिटानिका'मध्ये आत्मचरित्राबद्दल 'The account of an individual human life, written by the subject himself '[११] असे जे म्हटले आहे, ते अर्थपूर्ण आहे. जीवनात स्वत:ला आलेल्या अनुभवाकडे तटस्थपणाने पाहात लेखक आपली कहाणी सांगतो, तेव्हा ते आत्मचरित्र होते. प्रत्येक माणसाचे आयुष्य हे विविध घटनांनी रंगलेले असते. ते नाट्यपूर्ण, गुंतागुंतीचे व अनाकलनीय असते. जीवनाप्रमाणे व्यक्तिस्वभावही नाट्यपूर्ण व अनाकलनीय असतो. अशा व्यक्तिमत्त्वाचा व जीवनाचा शोध शास्त्र व कला नेहमीच घेत राहिले आहेत. हा शोध घेणे अवघड असते. म्हणून गोविंदाग्रजांनी म्हटले आहे,

> ' यावज्जीनहि काय मी न कळले आप्तांप्रती नीटसे ।
> मित्रांतेंहि कळे न गूढ– न कळे माझे मलाही तसें ।।'[१२]

तरीही व्यक्तिमत्त्वाचा शोध घेण्याचा प्रयत्न नेहमीच केला गेला आहे. या शोधाला मर्यादा असल्या तरी त्या मर्यादेत शोध घेता येतो. म्हणून आत्मचरित्राचे महत्त्व राहतेच. आपल्या जीवनातील विविध घटना, त्या घटनांतील नाट्य, जीवनातील संघर्ष, आशा–आकांशा, यशापयश, सुखदु:खे, विविध प्रकारच्या भेटलेल्या व्यक्ती, त्यांच्याशी आलेले चांगले–वाईट संबंध या सर्वांचे चित्रण करता करता आत्मचरित्रकार जाणीवपूर्वक, तर कधी अजाणता जीवनाचा शोध घेतो, जीवनभाष्य करीत राहतो. इतर कोणत्याही वाङ्मयप्रकारापेक्षा हे जीवनभाष्य अधिक अर्थपूर्ण असते. कारण जीवनमंथनातून निर्माण झालेले ते एक नवनीत असते. चांगल्याप्रकारची आत्मचरित्रे ही बोधप्रद ठरतात ती याचमुळे. म्हणून जीवनशोध व मानवी मनाचा शोध हे आत्मचरित्राचे दोन महत्त्वाचे पैलू आहेत. आता प्रश्न असा उपस्थित होतो की आत्मचरित्रकार आत्मचरित्र लिहण्यास प्रवृत्त का होतो ? आत्मचरित्राच्या पाठीशी विविध प्रकारच्या प्रेरणा असू शकतात.

आत्मचरित्र-लेखनामागील प्रेरणा

आत्मचरित्र-लेखनामागील महत्त्वाची प्रेरणा आत्माविष्कार ही होय, आत्माविष्कार हे तत्त्व अत्यंत महत्त्वाचे आहे. ते आत्मचरित्राचे जसे तत्त्व आहे, तसेच ललितवाङ्मयाचेही तत्त्व आहे. आत्मचरित्र व ललितवाङ्मय यांना जोडणारा तो महत्त्वाचा दुवा आहे. आत्मचरित्राला ललितवाङ्मय म्हणावयाचे ते एवढ्याचसाठी.

आपली जीवितकहाणी कोणाला तरी सांगावी, आपल्या सुखदुःखात इतरानाही वाटेकरी करावे, अशी माणसाची इच्छा असते. आपली दुःखे इतरांना सांगितली तर हृदय हलके होते व या सुखदुःखाच्या कथनात एकप्रकारचा विरंगुळाही वाटू लागतो. मालतीबाई बेडेकर आपल्या आत्मचरित्रामागील प्रेरणा स्पष्ट करताना म्हणतात, 'या अत्यंत दुःखाच्या व उद्विग्नतेच्या काळात मनाला केवळ विरंगुळा म्हणून मी या माझ्या आयुष्याच्या आठवणी लिहायला घेतल्या.मी लेखन करीत असले की रोजच्या जीवनातल्या सुखदुःखांचा मला काही काळ तरी विसर पडतो, हा आजवरचा अनुभव याही वेळा प्रत्ययाला आला. आणि खरोखरच या 'सहवास' लेखनाने माझ्या अनिवार दुःखाला विरंगुळा मिळाला.'[१३] आत्मचरित्रकाराने आपल्या सुखदुःखांचे हे निवेदन अत्यंत स्वयंस्फूर्तीने केलेले असते, हा आत्मचरित्राचा एक विशेष होय.

आपल्या जीवनातून इतरांना काही बोध किंवा शिकवण मिळावी, हा हेतू डोळ्यांपुढे ठेवूनही काही लेखकांनी आपली आत्मचरित्रे लिहिली आहेत. संतवाङ्मयाचे गाढे अभ्यासक ल. रा. पांगारकर हे आपल्या 'चरित्रचंद्रा' च्या प्रस्तावनेत म्हणतात, 'माझ्या चरित्रात कोणासही काही घेण्यासारखे नाही, असे मला वाटले असते तर हा चरित्र लिहून प्रसिद्ध करण्याचा हा उद्योग मी केला नसता.'[१४] महर्षि धोंडो केशव कर्वे यांच्यासारख्या समाजसुधारकानेही आपले आत्मचरित्र उद्बोधनाच्या भूमिकेतूनच लिहिले आहे. तथापि इतरांना बोध देण्यासाठी स्वतःच्या दोषावर पांघरूण घालण्याचा प्रयत्न आत्मचरित्रकाराने कधीही करू नये. तसेच, आत्मचरित्रात उपदेशावर भर देणे हेही अनिष्ट आहे. त्यामुळे आत्मचरित्राच्या कलात्मकतेला बाधा येण्याचा संभव असतो.

गतायुष्याचे सिंहावलोकन करावे, हाही माणसाचा एक प्रवृत्तिधर्म असतो. आपल्या गतजीवनाचे सिंहावलोकन करताना तो जुन्या आठवणींची अपरिहार्यपणे उजळणी करतो, व त्याला एकप्रकारचा आनंद वाटतो. सुखद आठवणींना उजाळा देण्याने आनंद वाटतोच, पण दुःखद आठवणीही खूप काळ लोटल्यामुळे सुखदच वाटतात. या आठवणीकडे अलिप्तपणे पाहताना लेखकाला सविकल्प समाधीचा आनंद लुटता येतो. रोमन साम्राज्याच्या उदयास्ताचा इतिहास लिहिणाऱ्या गिबन

या सुप्रसिद्ध इतिहासकाराने आपल्या आत्मचरित्राच्या आरंभी म्हटले आहे, 'वयाच्या बावन्नाव्या वर्षी माझे इतिहासलेखनाचे कार्य संपूर्ण झाल्यामुळे आता रिकाम्या वेळात गतायुष्यावर एकदा दृष्टी टाकण्याची मला इच्छा होत आहे. तसे करण्यात स्वतःच्या मनाचे समाधान हा एकच हेतू आहे व तेच माझे फल होय.'[१५]

गतायुष्यातील आठवणी सांगताना आपल्या हातून घडलेल्या चुका, प्रमाद व गैरकृत्ये जनताजनार्दनापुढे मांडण्यातही एक आत्मिक समाधान असते. महात्मा गांधींनी आपल्या 'सत्याचे प्रयोग' या आत्मकथेत आपल्या अपराधांची कबुली दिली आहे. रूसो या फ्रेंच लेखकाने तर आपल्या आत्मचरित्राला 'Confessions' (कबुलीजबाब) असेच नाव दिले आहे. आपल्या ग्रंथाच्या आरंभी तो म्हणतो, 'जेव्हा मला देवाघरचे बोलावणे येईल तेव्हा मी हे माझे आत्मचरित्र ईश्वरासमोर ठेवीन आणि म्हणेन की 'देवा, मी अशा अशा तऱ्हेने जगात वागलो आहे, माझी पुण्यकृत्ये व पापे मी प्रामाणिकपणे तुझ्यासमोर ठेवीत आहे.'[१६] ख्रिस्ती माणसाने आपल्या धर्मगुरूपुढे दिलेल्या जबाबाप्रमाणे या कबुलीजबाबाचे थोडेफार स्वरूप असते.

राजकीय नेते, समाजसुधारक व देशभक्तांनी लिहिलेल्या आत्मचरित्रात त्यांच्या कार्याचा प्रचार व आत्मसमर्थन आढळते. प्रसंगी ते आपले वैचारिक सिद्धान्तही आत्मचरित्राद्वारा मांडतात. महर्षि धोंडो केशव कर्वे यांच्या 'आत्मवृत्ता'त त्यांनी केलेल्या स्त्री–शिक्षणाच्या कार्याचा प्रचार व त्यांनी स्थापलेल्या संस्थांची माहिती आढळते. स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या 'माझी जन्मठेप' मध्येही त्यांच्या तत्त्वज्ञानाचा व कार्याचा साहजिकच अंतर्भाव झालेला आहे. हिटलर व मुसोलिनी या दोन युद्धपिपासू राजकीय नेत्यांनीही आपली आत्मचरित्रे लिहून आपल्या राजकीय तत्त्वज्ञानाचा प्रचार केला आहे. अगदी अलीकडे अमेरिकेचे माजी परराष्ट्रमंत्री डॉ. हेन्री किसिंजर यांनी 'The white house years' आणि 'The years of upheaval' हे दोन आत्मचरित्रपर ग्रंथ लिहून आपली आंतरराष्ट्रीय राजकारणातील भूमिका स्पष्ट केली आहे. अशा प्रकारच्या आत्मचरित्रातून आपल्या संबंधी झालेले गैरसमज दूर करून स्वतः केलेल्या कृत्यांचे समर्थन करणे हाही भाग असतो. तथापि स्वसमर्थनार्थ आत्मचरित्रे लिहिणे हे वाङ्मयीन दृष्टिकोनातून उचित ठरत नाही. लेखकाने आपल्या कार्याबद्दल व स्वभावाबद्दल स्वतः काही न सांगता त्याबद्दलचा निर्णय वाचकावर सोपविणे इष्ट ठरेल.

प्रा. गंगाधर गाडगीळ यांच्या मते '...आपल्या साऱ्या स्मृतिरूप अनुभवांना सजीव करून त्यांची स्पंदणारी प्रतीती घेणे, त्याचा आकार जाणिवेत उमटविणे, त्यांच्याकडे एका वेगळ्या कुतूहलाने आणि म्हणूनच तटस्थपणे पाहणे, आपल्या अनुभवांना संकेतरूप देऊन स्वतंत्र अस्तित्व प्राप्त करून देणे, अशाप्रकारे त्यांना अजर आणि अमर करणे.'[१७] हे कार्यही आत्मचरित्रलेखनाच्या द्वारे साधता येण्यासारखे

असते. हे कार्य ललितलेखकाच्या कार्याशी जळणारे असल्याने ललितलेखक आपली ललितकृती ज्या पद्धतीने सिद्ध करतो त्याप्रमाणे आत्मचरित्रकाराने आपले आत्मचरित्र सिद्ध केले पाहिजे.

आत्मचरित्राचे स्वरूपविशेष

सत्यदर्शन :

आत्मचरित्र ही जीवनकथा असते. लेखकाच्या जीवनात ज्या ज्या घटना-घडलेल्या असतात, त्या घटनांचे त्याने निवेदन केलेले असते. एका दृष्टीने स्वत: लेखक हाच त्या जीवनकथेचा नायक असतो. त्या नायकाचे मनोगत स्वगत असते. त्यामुळे त्या घटनांचे तो तन्मयतेने वर्णन करतो. परंतु आत्मचरित्रकाराने त्या घटना वाटेल त्या प्रकारे सांगून उपयोगाच्या नाहीत. त्याने सर्वच घटना सांगितल्या पाहिजेत, असेही नाही. ज्या घटना पूर्णपणे आठवतात, त्या जशा घडल्या तशाच त्याने कथन केल्या पाहिजेत. म्हणून बालपणातील ऐकीव घटना सांगून त्या आधारे आपले व्यक्तिचित्रण करण्याचा प्रयत्न त्याने करू नये. तसेच, आपल्याच दृष्टिकोनातून एकांगी चित्रणही करू नये. म्हणजेच घडलेल्या घटनांशी त्याने इनाम राखले पाहिजे. मर्ढेकरांनी म्हटल्याप्रमाणे, 'आत्मनिष्ठा हा वाङ्मयनिर्मितीचा आद्यबिंदू तर आहेच आहे, पण त्याहीपेक्षा अधिक म्हणजे आत्मनिष्ठेतच वाङ्मयनिर्मितीची परिणती आहे. वाङ्मयनिर्मितीची सुरुवात ज्याप्रमाणे आत्मनिष्ठेपासून व्हावयास पाहिजे तसा तिचा शेवटही आत्मनिष्ठेतच व्हावयास पाहिजे.'[१८] म्हणजे अनुभवाशी आत्मनिष्ठ राहून चित्रण केले पाहिजे. यालाच आपण सत्यदर्शन म्हणू शकतो. सत्यदर्शनाविरहित असलेले आत्मचरित्र एक कादंबरीच ठरेल! आपल्या जीवनातील सत्याचे दर्शन घडविण्यासाठी लेखकाला कठोर आत्मनिरीक्षण करता आले पाहिजे. तादात्म्याबरोबरच तटस्थवृत्तीही धारण करता आली पाहिजे. आत्मचरित्रलेखनाचा हा विशेष अ. ना. देशपांडे यांनी पुढीलप्रमाणे स्पष्ट केला आहे. 'आत्मचरित्रनिवेदन म्हणजे तारेवरची कसरत. आत्मश्लाघेचा व आत्मसमर्थनाचा आपल्यावर आरोप येणार नाही, याबद्दल पदोपदी दक्षता बाळगायची आणि त्याचबरोबर जास्तीत जास्त अलिप्तवृत्ती स्वीकारून आपल्या स्वभावविशेषांचे, गुणदोषांचे आणि कर्तृत्वाचे यथातथ्य दर्शन घडवून देण्याची खटपट करावयाची, असे दुहेरी धोरण आत्मचरित्रकाराला सांभाळावे लागते.'[१९]

जीवनाचे यथातथ्य दर्शन घडविण्यासाठी लेखकामध्ये सत्यप्रेम व प्रामाणिकपणा हवा. 'नामूलं लिख्यते किंचित्' हे त्याचे ब्रीदवाक्य असले पाहिजे. सत्यलेखनाने आपल्या व्यक्तिमत्त्वाची हानी होईल असा विचार मनात येऊन असत्यलेखनाचा मोह त्याला होता कामा नये. गोदावरी परुळेकर आपल्या आत्मचरित्राबद्दल म्हण-

तात, ' जेव्हा माणूस जागा होतो ' हे पुस्तक जे पाहिले, जे अनुभवले तेच शब्दांकित करायचे, या उद्देशाने लिहल्यामुळे वस्तुस्थितीपेक्षा वेगळे काही लिहिण्याचा मोह मला कधीच झाला नाही.'[२०] वस्तुस्थितीशी इमान राखून केलेले आत्मनिवेदन हेच खरे बळ आहे. म्हणूनच महात्मा गांधींचे ' सत्याचे प्रयोग ' व रूसोचे ' कन्फेशन्स ' ही आत्मचरित्रे उच्च कोटीची ठरली आहेत. अर्थात हे सत्यदर्शन घडविताना प्रांजळपणा हवा, तसेच फाजील विनय नको की आत्मस्तुतीही नको. लेखकाने इतरांचे दोषदर्शन घडवू नये व आत्मप्रदर्शन वा आत्मगौरवाचा मोहही टाळावा.

सत्यदर्शन हे आत्मचरित्राचे प्रमुख वैशिष्ट्य असले तरी संपूर्ण सत्याचे दर्शन घडविणे हे अत्यंत कठीण असे कार्य आहे. आपल्या जीवनातील काही गोष्टी आत्मचरित्रकार विसरतो, तर काही अप्रिय घटनांचे त्याला बुद्धचाच विस्मरण होते. आपली जीवनकथा हा कलेचा एक उत्तम नमुना व्हावा, या इच्छेतून तो काही कटू घटना वगळतो व कलात्मकतेसाठी तपशिलाची काटछाट करतो. अशा संक्षेपामुळे मूळ सत्याचे स्वरूप बदलण्याचा संभव असतो. म्हणूनच अत्यंत विश्वसनीय असे आत्मचरित्र लिहिले जाणे अत्यंत कठीण असते. डॉ. रां. बा. ग्रामोपाध्ये यांनीही आत्मचरित्राविषयी बोलताना एका मुलाखतीत हेच मत व्यक्त केले आहे. ते म्हणतात, ' सत्य, संपूर्ण सत्य सांगावे, अशी आपली अपेक्षा असली तरी ते फार कठीण आहे. नावनिशीवार उल्लेख, बदनामी, भावना दुखविणे इत्यादींमुळे अशक्य. ' World within world. ' मध्ये स्टीफन स्पेंडर फक्त त्याला वैशिष्ट्यपूर्ण वाटणाऱ्या गोष्टींचाच उल्लेख करतो. काही स्त्रियांची आत्मचरित्रे मोकळेपणाने लिहिली गेली आहेत. ती वाङ्मयाला जवळची आहेत. पण ' स्मृतिचित्रा ' सारखी क्वचितच. आत्मचरित्राचं मूल्यमापन कसं करणार ? धड फिक्शन नाही की धड सत्यही नाही, अशीच आत्मचरित्रं मराठीत अधिक आहेत. '[२१]

आत्मचरित्रकार जे लिहितो ते सत्य तर असावेच, पण त्या बरोबरच ते सुंदरही व्हावे इकडे लक्ष दिले पाहिजे. आकर्षकपणे मांडलेली एक वास्तववादी कहाणी असे त्याचे स्वरूप असावे. आपल्या जीवनातल्या कोणत्या गोष्टी वाचकापुढे मांडावयाच्या याचे ज्ञान लेखकाला असणे आवश्यक आहे. आत्मचरित्राचे इतिहासाशी साम्य असले तरी तो इतिहास नव्हे. म्हणून त्यात बाल्यापासून अंतापर्यंतचे सर्व प्रसंग येणे शक्य नाही. आपल्या जीवनातील जे प्रसंग त्याला आठवावेसे वाटतील व जे कलात्मकदृष्ट्या योग्य असतील ते आत्मचरित्रकार वाचकांना निवेदन करू शकतो. आपली जीवनगाथा रसपूर्ण, मनोरंजक, उत्कंठावर्धक करण्यासाठी नाट्यमयता, संघर्ष, योगायोग दर्शविणाऱ्या घटना व प्रसंग आत्मचरित्रात असावेत. लेखकाची अभिव्यक्तीची पद्धती, त्याची शैली ही प्रसन्न व आकर्षक असावी. लेखकाला सौंदर्यदृष्टी असेल तर आपले आत्मचरित्र कलात्मक करण्यासाठी तो निश्चितच प्रयत्नशील राहील.

आत्मचरित्रात कलात्मकता असली म्हणजे त्यात काही दोष असले तरी त्यांचे विस्मरणच होते. याबाबतीत न. चिं. केळकर यांच्या 'गतगोष्ट' या आत्मचरित्राबद्दल अ. म. जोशी यांनी व्यक्त केलेला अभिप्राय लक्षात घेण्याजोगा आहे. ते म्हणतात, '... ज्या ठिकाणी ते राजकारणाच्या प्रांतात शिरले आहेत, त्या ठिकाणी त्यांची स्वत्वाची जाणीव उसळी मारून वर आल्यासारखी वाटते व शुद्ध भावनेची जागा वासनेने घेतल्यासारखी वाटते. हा दोष जरी असला तरी भाषेचे व वर्णनाचे लालित्य, कथनातील खेळकरपणा व आत्मपरीक्षणातील मार्मिकता इत्यादी गुणांमुळे केळकरांचे आत्मचरित्र कोणत्याही आत्मचरित्र-वाङ्मयात महत्त्वाचे स्थान मिळवील यात शंका नाही.'[२२]

भावनाविष्कार

आत्मचरित्र म्हणजे लेखकाच्या जीवनात घडणाऱ्या घटनांचे निवेदन होय. या निवेदनात सत्यनिष्ठता, तटस्थता इत्यादी गुण असावेत असे म्हटले जाते. त्यामुळे आत्मचरित्र-लेखकावर अनेक बंधने पडतात आणि त्याचे लेखन रूक्ष बनते. परंतु आत्मचरित्र हे केवळ निवेदनात्मकच असावे असे नाही, ते कलात्मकही असावे लागते. त्यामुळे, ज्यामुळे त्या लेखनात सौंदर्य निर्माण होईल व वाचकांना त्यापासून आनंद मिळेल अशा प्रकारची सौंदर्यनिर्मिती करता आली पाहिजे. प्रसंगांचे वर्णन, त्यातील नाट्यमयता, प्रसंगाचा परस्पर संबंध, प्रसंगवर्णनातील मार्मिकता, सुंदर भाषाशैली यांसारख्या गुणांनी लेखक आत्मचरित्रात कलात्मकता निर्माण करू शकतो. अर्थात ही कलात्मकता सहजस्फूर्त व नैसर्गिक असावी. कादंबरी किंवा नाटक चित्ताकर्षक व मनोरंजक करण्यासाठी लेखक काही युक्त्यांचा, तंत्रांचा वापर करू शकतो, त्याला ते स्वातंत्र्य असते. परंतु आत्मचरित्रकाराला अशा प्रकारचे स्वातंत्र्य असत नाही. कारण आत्मचरित्र कलात्मक करण्यासाठी त्याने अशा काही तंत्राचा वापर केला की त्याचे आत्मचरित्र हे तटस्थतेकडून ढळू लागते. त्यातील सत्यदर्शनाला बाधा येते आणि हळूहळू आत्मचरित्राचे कांदबरीत रूपांतर होऊ लागते. म्हणून आत्मचरित्र–लेखकाला कलात्मकतेच्या बाबतीत सावधान राहावे लागते. याचाच अर्थ असा की आत्मचरित्रलेखनातील कलात्मकता ही आपोआपच त्या लेखनातून निर्माण व्हावी, त्यासाठी लेखकाने जाणीवपूर्वक कोणतेही प्रयत्न करू नयेत. प्रत्येक आत्मचरित्रकाराचे लेखन हे 'स्वतंत्र' असावे लागते. परंतु आपले लेखन रूक्ष होणार नाही याची लेखकाने काळजी घेतली पाहिजे.

आत्मचरित्रात लेखक आपल्या जीवनात घडलेल्या घटनांचे निवेदन करीत असतो. या घटना विविध प्रकारच्या असू शकतात. त्यामुळे त्याच्या लेखनात विविध भावनांचा आविष्कार होऊ शकतो. आपल्या जीवनातील सुखदुःखाचे प्रसंग उत्कटपणे सांगताना त्याच्या लेखनात भावसौंदर्य निर्माण होऊ शकते. उत्कटतेतून निर्माण

होणारे भावसौंदर्य नसेल तर त्याचे लेखन रूक्ष निवेदन होईल, केवळ तपशील होईल. त्याच्या लेखनात उत्कटता हवीच–म्हणजेच भावनात्मकता हवी. परंतु ही भावनात्मकता निर्माण करीत असताना लेखकाला तारेवरची कसरत करावी लागते. कारण हे त्याचे लेखन अधिक भावनोत्कट झाले की त्यातील सत्य थोडे शबलित होते. याउलट, भावनेपासून अलिप्त राहून त्याने लेखन केले तर ते नीरस आत्मनिवेदन ठरते. याचा अर्थ आत्मचरित्रकाराने भावशील असावयास हरकत नाही, परंतु भावशरण असू नये. एकप्रकारचा संयम बाळगून सत्यकथनाच्या उद्दिष्टांचा विसर पडू न देता उत्कटतेने लेखन केले तर त्यात भावसौंदर्य निर्माण होऊ शकते. त्यासाठी लेखकाच्या जीवनातच विविध प्रकारच्या घटना घडणे आवश्यक असते. एकाच प्रकारच्या घटना असतील तर त्याच्या लेखनात एकच एक विशिष्ट प्रकारची भावना आविष्कृत होईल आणि त्याचे लेखन एकसूरी बनेल, ते आकर्षक वाटणार नाही. परंतु विविध प्रकारच्या घटना असतील तर मग मात्र विविध प्रकारच्या भावना आविष्कृत होतील व विविधतेचे सौंदर्य निर्माण होईल. विविध रसनिर्मिती ही वाचकांना नेहमीच आनंद देते. त्या दृष्टीने विविध भावनांचा आविष्कार होणे आवश्यक असते. परंतु विविध भावनांचा आविष्कार करण्यासाठी आत्मचरित्रलेखकाला विविध प्रकारचे प्रसंग मात्र निर्माण करता येणार नाहीत. त्यामुळे जे प्रसंग घडलेले आहेत त्या प्रसंगांमध्येच त्याला हा भावविलास दाखवावा लागतो. एका अर्थाने लेखकाच्या जीवनाच्या स्वरूपावरच हे अवलंबून आहे.

समाजदर्शन

आत्मचरित्रात लेखकाने स्वतःच्या जीवनाचे चित्रण केलेले असले तरी आत्मचरित्रात त्या विशिष्ट व्यक्तीच्या (लेखकाच्या) दर्शनाबरोबरच ती व्यक्ती ज्या कालखंडात राहते, त्या कालखंडाचेही दर्शन घडते. (तेन या साहित्यिकाने 'Man is the product of environment' असे म्हटले आहे, ते खरे आहे.) कोणत्याही व्यक्तीचे व्यक्तिमत्त्व हे केवळ स्वयंभू असत नाही. ते व्यक्तिमत्त्व सभोवतालच्या जीवनाचे संस्कार घेत असते. मनुष्य हा समाजजीवनाचा एक घटक असल्याने समाजजीवनाच्या क्रियाप्रतिक्रिया त्याच्या व्यक्तिमत्त्वावर व जीवनावर होत राहतात. मनुष्य कितीही आत्मकेंद्रित व एकलकोंडा असला तरी सभोवतालच्या जीवनप्रवाहापासून तो पूर्णतः अलिप्त राहू शकत नाही. सुप्रसिद्ध साहित्यिक वि. वा. शिरवाडकर यांनी कलावंताचे व्यक्तिमत्त्व व जीवन या संदर्भात काढलेले उद्‌गार अर्थपूर्ण आहेत. त्यांनी म्हटले आहे, 'जीवनाच्या ज्या परिसरात आपण वावरतो, त्यापासून साहित्य हे अलग काढता येईल, हे शक्य नाही. साहित्यिकाची प्रतिभा कितीही आकाशमार्गी असली तरी त्याचे पाय नव्हे, त्याचं सारंच जीवन पृथ्वीवर टेकलेलं असतं. लेखकाचं व्यक्तित्व हे त्याच्या वाङ्मयाचं अधिष्ठान असतं हे कोणीच नाका-

रत नाही. परंतु हे व्यक्तित्वसुद्धा सामान्यतः मानलं जातं तितकं स्वयंभू आणि स्वतंत्र असत नाही. परिसरातील परिस्थितीचे नानाविध संस्कार त्याच्यावर होत असतात व त्या क्रिया–प्रतिक्रियातून त्याला विशिष्ट आकार, विशिष्ट रंग प्राप्त होतो.' [२३] हे विधान सर्वांनाच लागू पडणारे आहे. याचाच अर्थ कोणत्याही वाङ्मयीन कलाकृतीमध्ये त्या कृतीच्या लेखकाचे प्रतिबिंब उमटलेले असते. त्याप्रमाणे त्या व्यक्तीच्या सभोवतालच्या समाजाचेही प्रतिबिंब उमटलेले असते. निदान आत्मचरित्राच्या बाबतीत हे अधिक खरे आहे. लेखकाचा जो नवीन कालखंड असेल त्या कालखंडातील कौटुंबिक जीवन, धर्मजीवन, चालीरीती, रूढी, परंपरा, अशा विविध सामाजिक प्रवृत्तींचे प्रतिबिंब आपोआपच आत्मचरित्रात व्यक्त होते. परंतु याचा अर्थ असा नव्हे की, आपल्या कालखंडातील समाजजीवनाचे दर्शन घडविण्यासाठी लेखक आत्मचरित्र लिहीत असतो, त्यादृष्टीने आत्मचरित्र लिहिले तर त्यात आत्मचरित्र कमी व इतिहास अधिक होईल व आत्मचरित्राला झळ पोहोचेल. आचार्य अत्र्यांच्या 'मी कसा झालो ?' मध्ये जीवनघटनांना व व्यक्तिदर्शनाला महत्त्व मिळाले आहे. परंतु तेच 'कऱ्हेचे पाणी' या आत्मचरित्रामध्ये महाराष्ट्राचा गेल्या पन्नास वर्षांचा राजकीय, सामाजिक व वाङ्मयीन इतिहास वाचकांपुढे ठेवण्याचा संकल्प करून त्यांनी आत्मचरित्राच्या कलात्मकतेला बाधा आणली आहे. असाच प्रकार वि. द. घाटे यांच्या 'दिवस असे होते' या आत्मचरित्रातही आढळतो. म्हणून आत्मचरित्रात येणारे समाजदर्शन हे सहजतेने व पार्श्वभूमीसारखे यावे, हे अधिक उचित होय. तथापी कमीअधिक प्रमाणात आत्मचरित्रात समाजदर्शन घडत असल्याने त्या दृष्टीनेही आत्मचरित्राचा अभ्यास होऊ शकेल.

व्यक्तिचित्रण

आत्मचरित्र ही एक जीवनकथा असते हे खरे असले, तरी ती एक चरित्रकथा असते. स्वतः लेखकाच्याच जीवनाचे ते एक चित्र असते. त्यामुळे आत्मचरित्रात लेखकाच्या व्यक्तिमत्त्वाची अनेक गुणवैशिष्टचे व्यक्त झालेली असतात. येथे स्वतः लेखकच आपल्या जीवनातील घटनांचे निवेदन करीत असल्यामुळे त्याचे अनुभव, आशा–आकांक्षा, सुखदुःखे, रागलोभ, जीवनदृष्टिकोन अशा अनेक गुणधर्मांचे प्रतिबिंब उमटून त्या लेखकाची एक प्रतिमा तयार होत असते. आत्मचरित्रातील कथेत महत्त्व असते ते या व्यक्तिमत्त्वालाच. येथे एक प्रश्न असा उपस्थित होऊ शकेल की आत्मचरित्रात घटना महत्त्वाच्या की व्यक्तित्व महत्त्वाचे ? कोणत्याही कथेत प्राधान्य हे घटनेला द्यावयाचे की व्यक्तित्वाला, यासंबंधी परस्परविरोधी विधाने करण्यात येतात. उदाहरणार्थ, घटनांमुळे व्यक्तित्व बनते. (Plot creates the character.) याउलट, व्यक्तित्व घटना निर्माण करते. (Character creates the plot.) वास्तविक पाहता घटना या स्वभावामुळेच निर्माण होतात. ॲरिस्टॉटलच्या शोकां-

तिकेवर विचार मांडताना एस्. एस्. वुचर याने म्हटले आहे, 'The action is the product of the character and of the circumstances in which they are placed.' [२४] शोकनाट्यासंबंधीचे हे विधान जीवनासही लागू पडते. व्यक्तीच्या स्वभावामुळेच जीवनात विविध प्रकारच्या घटना घडत असतात. अर्थात घटनांचा त्या व्यक्तीच्या स्वभावावरही परिणाम होत असतो. परंतु त्या सर्वातून आपल्यासमोर उभे राहते ते व्यक्तित्व. त्यामुळे आत्मचरित्रातील जीवनदर्शनापेक्षा त्यातील व्यक्तिदर्शन हे सर्वात अधिक महत्त्वाचे असते. यासंबंधी 'ग्रंथकाराचे चरित्र म्हटले तरी त्याचा प्रमुख हेतू व्यक्तिचित्रण हाच असावयास पाहिजे.' [२५] हे प्रा. अ. म. जोशी यांचे विधान समर्पक वाटते.

आत्मचरित्रामध्ये व्यक्तीची मनोवृत्ती, तिची ध्येये, आयुष्यातील झगडे, त्या वेळेला त्या व्यक्तीच्या स्वभावधर्माचे दिसून आलेले गुणदोष या सर्वांचे प्रतिबिंब यथार्थपणे उमटलेले असते. हे व्यक्तिदर्शन सत्यपूर्ण असावे असे म्हटले जाते, याचा अर्थ आत्मचरित्रकाराला कथा-कादंबरी-नाटकाप्रमाणे कल्पनाविलासाचे साहाय्य घेता येत नाही. जसे घडले असेल तसेच प्रसंगांचे व स्वभावाचे चित्रण करावे लागते. एका दृष्टीने 'अनुभवांशी आत्मनिष्ठा' आत्मचरित्रलेखनाच्या ठायी असावी लागते. सत्यदर्शन, यथार्थदर्शन, तटस्थता हे गुण जे निर्माण होतात ते यातूनच. यामुळे लेखकाला मर्यादा पडत असते. तरी त्या मर्यादेत राहूनही तो स्वतःची व इतरांची व्यक्तिचित्रे परिणामकारकरीत्या रंगवू शकतो. या दृष्टीने पाहता चरित्राच्या संदर्भात सिडने ली याने 'a truthful transmission of personality' [२६] म्हणजे व्यक्तित्वाचे सत्यपूर्ण चित्रण हा चरित्राचा जो हेतू सांगितला आहे, तो आत्मचरित्राच्या बाबतीतही खरा ठरतो.

आत्मचरित्रातील व्यक्तिदर्शनात अनेक पात्रे असली तरी स्वतः लेखक हा त्या जीवनकथेचा नायक असतो. आत्मचरित्राच्या केन्द्रस्थानी त्याच्यातील 'मी' असतो. त्यामुळे आत्मचरित्रात लेखकाच्या व्यक्तिमत्त्वाला महत्त्व प्राप्त होणे अपरिहार्य असते. स्वतःच स्वतःचे चित्र रेखाटणे ही अत्यंत अवघड गोष्ट आहे. कारण लेखकाने आपल्या जीवनातील घडामोडींच्या आधारे आपली भूमिका स्पष्ट केली, आपली मते मांडली व आपले गुण सांगितले की त्यावर आत्मसमर्थनाचा, आत्मप्रौढीचा आक्षेप येतो. याउलट, केवळ घटनांचे वर्णन केले आणि भूमिका स्पष्ट केली नाही तर संकोचाचा, लीनतेचा आरोप येतो. आत्मप्रौढी व आत्मश्लाघा या दोन्ही गोष्टी टाळून आत्मदर्शन घडविणे अत्यंत कठीण गोष्ट आहे. याचे कारण असे की प्रत्येकाला स्वतःचे कुतूहल असते, प्रत्येकजण 'स्व'मध्ये गुरफटलेला असतो. आत्मप्रेमामुळे 'नार्सिसस' प्रमाणे माणसे स्वतःच्या प्रतिबिंबावर प्रेम करतात. आत्मचरित्रलेखनात अहंकाराचे तर्पण होते, तो कुरवाळला जातो. लेखकाला तटस्थता

हवी असते ती याच बाबतीत. वास्तविक पाहता लेखकाला जसे वाटेल तसे त्याने लिहावे. वाचक वा समीक्षक काय म्हणतील याचा विचार करून जर त्याने आत्मचरित्र लिहिले तर तो एका दडपणाखाली राहील व त्याच्या हातून आत्मवंचनेचा अपराध घडेल. पर्यायाने त्या लेखनाच्या उत्कटतेवर व कलात्मकतेवर परिणाम झाल्याशिवाय राहणार नाही. म्हणून असे म्हणावेसे वाटते की आत्मचरित्रकाराने 'आत्म'शीच प्रामाणिक राहावे. त्याने मनमोकळेपणाने लिहिल्याशिवाय त्याच्या गुणदोषांचे दर्शन तरी कसे घडेल ?

आत्मचरित्रातील त्याच्या जीवनानुभवातून रसिकांनी व समीक्षकांनी त्याचे व्यक्तिचित्र शोधायचे असते. त्याचे गुणदोष, स्वभाववैशिष्ट्ये, जीवनदृष्टी त्याचा व्यक्तित्वविकास इत्यादी गुण पाहून त्याचे व्यक्तिमत्त्व पाहावयाचे असते. अर्थात हे व्यक्तिमत्त्व आत्मचरित्रापुरतेच मर्यादित असते. ते त्या संपूर्ण व्यक्तीचे चित्र असू शकणार नाही. कारण ती संपूर्ण व्यक्ती आत्मचरित्राच्या व्यक्तीपेक्षा वेगळी व व्यापक असू शकते. आत्मचरित्रातील व्यक्तिमत्त्व हा त्या व्यक्तिमत्त्वाचा एक भाग असतो. आत्मचरित्रातून स्वतः लेखक स्वतःकडे पाहतो हे दिसून येते. अर्थात आत्मचरित्रातील 'मी' चे चित्रण स्वतः लेखकानेच केलेले असल्याने ते आत्मनिष्ठच राहणार. म्हणून वस्तुनिष्ठतेच्या कसोटचा सावधानतेने वापराव्या लागतील.

आत्मचरित्रात स्वतः लेखकाबरोबर इतरांचीही व्यक्तिचित्रे आलेली असतात. लेखक जीवन जगत असताना त्याच्या आयुष्यात त्याच्या जीवनाला अनुकूल–प्रतिकूल असणारी अनेक पात्रे आलेली असतात. त्यांतील काही पात्रे त्या व्यक्तीच्या जीवनात खोलवर ठसा उमटविणारी, सुखदुःखाचे प्रसंग निर्माण करणारी, संघर्ष निर्माण करणारी, जीवनाला कलाटणी देणारी, म्हणूनच एका दृष्टीने त्याचे जीवन घडविणारी असतात अशा व्यक्तित्वाचा आत्मचरित्रकाराने वेध घेतलेला असतो. ही पात्रे जशी स्वतंत्र असतात, तशी आत्मचरित्रातील 'मी' शी संबंधित असतात. 'मी' च्या एका मोठ्या वर्तुळात सामावलेली ही छोटी छोटी वर्तुळे असतात. ही वर्तुळे परस्परांमध्ये गुंतलेली असल्याने त्या मोठ्या मोठ्या वर्तुळात एक 'गुंतावळ' निर्माण होते. म्हणून डॉ. सदा कऱ्हाडे यांनी म्हटले आहे, ' आत्मचरित्र हे केवळ 'स्व' भोवतीच केंद्रित असू शकत नाही. ' स्व ' भोवती असणारे आप्तेष्ट, जिवलग मित्र, सख्यसंबंधी आणि हितशत्रू यांची देखील त्यात गुंतवणूक असते. '[२७]

आत्मचरित्रात लेखक जेव्हा दुसऱ्या व्यक्तिमत्त्वाचा वेध घेतो, तेव्हा तो आपल्याच दृष्टिकोनातून वेध घेत असल्याने त्यामध्ये अलिप्तत्व व वस्तुनिष्ठता निर्माण होणे अवघड असते. कारण लेखक 'स्व' ला पूर्णतः अलिप्त ठेवू शकत नाही. ही व्यक्तिचित्रे लेखकाच्या दृष्टिकोणातून रेखाटलेली असल्याने त्याला मर्यादा पडणे स्वाभा-

विक असते. आत्मचरित्राचा अभ्यास करताना या स्वाभाविकपणे पडणाऱ्या मर्यादा गृहीत धरूनच लेखकाने स्वत:चा व इतर व्यक्तिमत्वांचा 'व्यक्तिवेध' कसा घेतला आहे, हे पाहणे उचित ठरेल

• •

संदर्भ सूची

1. Arnold, Mathew –The study of poetry – English Critical Texts – Edited by D. J. Enright and Ernst De Chickera – Oxford University Press, Delhi, Third impression 1979 Page 261.

२. मराठी विश्वकोश – खंड दुसरा
महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृति मंडळ, मुंबई.
प्रथम प्रकाशन १९७६, पृष्ठ–११.

३. जोशी, अ. म. चरित्र – आत्मचरित्र
सुविचार प्रकाशन मंडळ प्रायव्हेट लिमिटेड, नागपूर.
१९५६, पृष्ठ १०३.

4. Maurois, Andre – Aspects of Biography, Cambridge University Press, 1929, Page 133.

5. Wellek and Warren –
Theory of Literature – Penguin Books, Third Edition. Reprinted 1968, Page 75.

6. Naik, Dr. D. G – Art of Autobiography., Vidarbha Marathwada Book Company, Poona First Published 1962, Page 13.

७. तत्रैव, पृष्ठ १७

८. जोशी अुनि, पृष्ठ ७०.

९. गाडगीळ, गंगाधर – साहित्याचे मानदंड, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई १९६२, पृष्ठ–७१

१०. नाईक अुनि, पृष्ठ ११.

11. Encyclopaedia Britannica, vol. 2, Encyclopaedia Britannica, Ltd. William Benton, Publisher, London, 1963. Page 854.

हवी असते ती याच बाबतीत. वास्तविक पाहता लेखकाला जसे वाटेल तसे त्याने लिहावे. वाचक वा समीक्षक काय म्हणतील याचा विचार करून जर त्याने आत्मचरित्र लिहिले तर तो एका दडपणाखाली राहील व त्याच्या हातून आत्मवंचनेचा अपराध घडेल. पर्यायाने त्या लेखनाच्या उत्कटतेवर व कलात्मकतेवर परिणाम झाल्याशिवाय राहणार नाही. म्हणून असे म्हणावेसे वाटते की आत्मचरित्रकाराने 'आत्म'शीच प्रामाणिक राहावे. त्याने मनमोकळेपणाने लिहिल्याशिवाय त्याच्या गुणदोषांचे दर्शन तरी कसे घडेल ?

आत्मचरित्रातील त्याच्या जीवनानुभवातून रसिकांनी व समीक्षकांनी त्याचे व्यक्तिचित्र शोधायचे असते. त्याचे गुणदोष, स्वभाववैशिष्ट्ये, जीवनदृष्टी त्याचा व्यक्तित्वविकास इत्यादी गुण पाहून त्याचे व्यक्तिमत्त्व पाहावयाचे असते. अर्थात हे व्यक्तिमत्त्व आत्मचरित्रापुरतेच मर्यादित असते. ते त्या संपूर्ण व्यक्तीचे चित्र असू शकणार नाही. कारण ती संपूर्ण व्यक्ती आत्मचरित्राच्या व्यक्तीपेक्षा वेगळी व व्यापक असू शकते. आत्मचरित्रातील व्यक्तिमत्त्व हा त्या व्यक्तिमत्त्वाचा एक भाग असतो. आत्मचरित्रातून स्वत: लेखक स्वत:कडे पाहतो हे दिसून येते. अर्थात आत्मचरित्रातील 'मी' चे चित्रण स्वत: लेखकानेच केलेले असल्याने ते आत्मनिष्ठ च राहणार. म्हणून वस्तुनिष्ठतेच्या कसोटचा सावधानतेने वापराव्या लागतील.

आत्मचरित्रात स्वत: लेखकाबरोबर इतरांचीही व्यक्तिचित्रे आलेली असतात. लेखक जीवन जगत असताना त्याच्या आयुष्यात त्याच्या जीवनाला अनुकूल–प्रतिकूल असणारी अनेक पात्रे आलेली असतात. त्यांतील काही पात्रे त्या व्यक्तीच्या जीवनात खोलवर ठसा उमटविणारी, सुखदु:खाचे प्रसंग निर्माण करणारी, संघर्ष निर्माण करणारी, जीवनाला कलाटणी देणारी, म्हणूनच एका दृष्टीने त्याचे जीवन घडविणारी असतात अशा व्यक्तित्वाचा आत्मचरित्रकाराने वेध घेतलेला असतो. ही पात्रे जशी स्वतंत्र असतात, तशी आत्मचरित्रातील 'मी' शी संबंधित असतात. 'मी' च्या एका मोठ्या वर्तुळात सामावलेली ही छोटी छोटी वर्तुळे असतात. ही वर्तुळे परस्परांमध्ये गुंतलेली असल्याने त्या मोठ्या मोठ्या वर्तुळात एक 'गुंतावळ' निर्माण होते. म्हणून डॉ. सदा कऱ्हाडे यांनी म्हटले आहे, ' आत्मचरित्र हे केवळ 'स्व' भोवतीच केंद्रित असू शकत नाही. ' स्व ' भोवती असणारे आप्तेष्ट, जिवलग मित्र, सख्यसंबंधी आणि हितशत्रू यांची देखील त्यात गुंतवणूक असते. '[२७]

आत्मचरित्रात लेखक जेव्हा दुसऱ्या व्यक्तिमत्त्वाचा वेध घेतो, तेव्हा तो आपल्याच दृष्टिकोनातून वेध घेत असल्याने त्यामध्ये अलिप्तत्व व वस्तुनिष्ठता निर्माण होणे अवघड असते. कारण लेखक 'स्व' ला पूर्णत: अलिप्त ठेवू शकत नाही. ही व्यक्तिचित्रे लेखकाच्या दृष्टिकोणातून रेखाटलेली असल्याने त्याला मर्यादा पडणे स्वाभा-

विक असते. आत्मचरित्राचा अभ्यास करताना या स्वाभाविकपणे पडणाऱ्या मर्यादा गृहीत धरूनच लेखकाने स्वतःचा व इतर व्यक्तिमत्वांचा ' व्यक्तिवेध' कसा घेतला आहे, हे पाहणे उचित ठरेल

• •

संदर्भ सूची

1. Arnold, Mathew –The study of poetry – English Critical Texts – Edited by D. J. Enright and Ernst De Chickera – Oxford University Press, Delhi, Third impression 1979 Page 261.

२. मराठी विश्वकोश – खंड दुसरा
महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृति मंडळ, मुंबई.
प्रथम प्रकाशन १९७६, पृष्ठ–११.

३. जोशी, अ. म. चरित्र – आत्मचरित्र
सुविचार प्रकाशन मंडळ प्रायव्हेट लिमिटेड, नागपूर.
१९५६, पृष्ठ १०३.

4. Maurois, Andre – Aspects of Biography, Cambridge University Press, 1929, Page 133.

5. Wellek and Warren –
Theory of Literature – Penguin Books, Third Edition. Reprinted 1968, Page 75.

6. Naik, Dr. D. G – Art of Autobiography., Vidarbha Marathwada Book Company, Poona First Published 1962, Page 13.

७. तत्रैव, पृष्ठ १७

८. जोशी अुनि, पृष्ठ ७०.

९. गाडगीळ, गंगाधर – साहित्याचे मानदंड, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई १९६२, पृष्ठ–७१

१०. नाईक अुनि, पृष्ठ ११.

11. Encyclopaedia Britannica, vol. 2, Encyclopaedia Britannica, Ltd. William Benton, Publisher, London, 1963. Page 854.

१२. कुसुमाग्रज (संपादक) – 'पिंपळपान'
कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे, द्वितीय आवृत्ती –
'माझा मृत्युलेख' पृष्ठ १०८
१३. बेडेकर, मालती – 'माझे आत्मचरित्र आणि मी'
'ललित' दिवाळी अंक – नोव्हें–डिसें, १९८१, पृष्ठ ४८.
१४. जोशी अुनि, पृष्ठ १०६
१५. तत्रैव, पृष्ठ १०६.
१६. तत्रैव, पृष्ठ १०६.
१७. गाडगीळ अुनि, पृष्ठ ६८–६९.
१८. मर्ढेकर, बा. सी. – सौंदर्य आणि साहित्य
मौज प्रकाशन, तिसरी आवृत्ती १९७५, पृष्ठ १४६.
१९. देशपांडे, अ. ना. – आधुनिक मराठी वाङ्मयाचा इतिहास,
भाग दुसरा, व्हीनस प्रकाशन, पुणे. आवृत्ती पहिली
१९५८, पृष्ठ ५३.
२०. परुळेकर, गोदावरी – 'माझे आत्मचरित्र आणि मी'
'ललित' दिवाळी अंक नोव्हें– डिसें. १९८१, पृष्ठ–५१
२१. ग्रामोपाध्ये, डॉ. गं. ब. – 'आमचे समीक्षक'
'ललित' एप्रिल १९८२, पृष्ठ ३८.
२२. जोशी अुनि, पृष्ठ १४१
२३. शिरवाडकर, वि. वा. अध्यक्षीय भाषण,
मुंबई उपनगर म. सा. संमेलन अधिवेशन चौदावे १९५६,
वीणा मे १९६४, पृष्ठ ३१
24. Aristotle's Theory of Poetry and Fine Arts' Dover Publications INC, USA 4th Edition 1907, Page 355
२५. जोशी अ. म. – प्रदक्षिणा 'चरित्र वाङ्मय'
कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे ३०
पाचवी आवृत्ती १९७२, पृष्ठ १९९
26. Nicolson, Harold – The Development of English Biography, The Hogarth Press, London, 1959, Page 145.
२७. कऱ्हाडे, डॉ. सदा – चरित्र आणि आत्मचरित्र
(साहित्यरूप) लोकवाङ्मयगृह प्रा. लि.
मुंबई, प्रथमावृत्ती १९७६, पृष्ठ–९१.

प्रकरण दुसरे

व्यक्तिचित्रणाची कला

स्वभावलेखनकलेचे वाङ्मयातील स्थान

व्यक्तिचित्रण किंवा स्वभावलेखन हा वाङ्मयकृतीतील एक महत्त्वाचा घटक आहे. वाङ्मयकृतीला सामान्यतेच्या कक्षेतून उचलून अलौकिकतेच्या प्रांतात नेऊन ठेवण्याचे सामर्थ्य स्वभावलेखनकलेत असते. ही स्वभावलेखनकला सर्व लेखकांना अवगत असणे आवश्यक आहे. मानवी विकार हे ललितकलेचे माध्यम असून वर्णयुक्त वाणी या साधनाद्वारे विचारप्रकटीकरणाचे कार्य लेखक करीत असतो. तथापि नुसत्या मानवी विकारांचे ज्ञान वाङ्मयलेखकास पुरे पडत नाही. एखादी व्यक्ती विशिष्ट प्रसंगी कशी वागेल हे कल्पनेने जाणून घेणे त्याला आवश्यक असते. यासाठी त्याला स्वभावलेखनकलेची कास धरावी लागते. वाङ्मयाची भाषा मनुष्यस्वभाव ही आहे. म्हणून वाङ्मयलेखनासाठी स्वभावलेखनकला पायाभूत ठरते. प्रख्यात आंग्ललेखक गार्डिनर याने 'सर्टन मेन ऑफ इम्पॉर्टन्स' या पुस्तकाच्या प्रस्तावनेत स्पष्टच म्हटले आहे, 'गेल्या पंधरावीस वर्षांतील कालाचा ओघ व्यक्तिस्वभावाच्या भाषेत सांगण्याचा या पुस्तकात मी प्रयत्न केला आहे.'[१] म्हणूनच स्वभावलेखनकलेला वाङ्मयात स्वतंत्र मान आहे. वाङ्मयाचा उच्च हेतू जो आनंदनिर्मिती आहे तो मनुष्यस्वभावाच्या भिन्न भिन्न चित्रांतून पूर्ण होतो. या मनुष्यस्वभावाच्या चित्रणातून वाचकांना आपल्याच सुखदुःखांचे पडसाद ऐकावयास मिळतात. या संदर्भात प्रा. ना. सी. फडके यांचे पुढील विधान लक्षात घेण्याजोगे आहे. ते म्हणतात, '....समाजाची रुची सुसंस्कृत होत गेली, की ललितकथांचे सौंदर्य त्यांच्या रचनाचमत्कृतीपेक्षा त्यातील मार्मिक व्यक्तिदर्शनाच्या मापाने मोजण्याची वाचकांची तयारी होते.'[२] मानवी मन अत्यंत चमत्कारिक व विलक्षण असते. मानवी स्वभावाला निरपवादपणे लागू पडेल असा कोणताच नियम नाही. मनुष्यस्वभावाबद्दल कार्यकारणभावाने तर्क करणेही नेहमीच योग्य ठरणार नाही. त्याविषयी पूर्वानुभवाने बांधलेले अंदाजही साफ कोसळणे शक्य आहेत, इतके ते अगम्य व चंचल आहे. तथापि भौतिकशास्त्राइतके नसले तरी बऱ्याच प्रमाणात ते नियमबद्ध आहे व म्हणून त्याबद्दल काही अंदाज करणे शक्य आहे, म्हणूनच

स्वभावलेखनाचे शास्त्र निर्माण होऊ शकते.

स्वभावलेखनाच्या तीन पायऱ्या

वाङ्मयामध्ये लेखकाला जे व्यक्तिदर्शन घडवायचे ते प्रत्यक्ष जीवनातील व्यक्तीसारखे हुबेहूब असले पाहिजे. सर्वसाधारण मानवी विकार–विचार घेऊनच त्यामधून कालमानाप्रमाणे व्यक्तिरेखा उभी करायची असते. स्वभावलेखनाच्या तीन पायऱ्या डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे यांनी पुढीलप्रमाणे सांगितल्या आहेत– 'प्रथम विकार-विचारांच्या रांध्यातून मानवसदृश रेखा तयार करणे, नंतर तिच्यात काल, प्रांत व वर्ग यांची वैशिष्ट्ये भरून तिची प्रतिमा तयार करणे व मग आपल्या वर्गातील इतर लोकांतूनही निवडून दाखविणारी व्यक्तीची अशी अगदी विशिष्ट वळणे तिच्या अंगी दाखवून तिला पूर्ण व्यक्तिरूप देणे, या त्या तीन पायऱ्या होत.'[३] प्रत्येक मनुष्य हा प्रथम 'मानव' व नंतर 'प्रतिमा' (वर्गाचा प्रतिनिधी किंवा नमुना) असतो. लेखकाला मानवी आकृती रंगविताना त्याची कृती, राहणी, विचार व भाषा यांचा बारकाईने विचार करावा लागतो. प्रतिमालेख जिवंत वाटावा यासाठी वर्गविशिष्ट भाषेचा उपयोग त्या व्यक्तीच्या तोंडी करणे आवश्यक ठरते. शेक्सपियरने अनेक अमर व्यक्तिरेखा निर्माण केल्या तरीही, 'विशिष्ट भाषापद्धतीने शेक्सपियर आपल्या व्यक्तिरेखा भिन्न भिन्न करून दाखवीत नाही,'[४] अशी तक्रार टॉलस्टॉयने केली आहे. शेक्सपियरने सर्व नाटके पद्यात लिहिली असल्याने हा दोष निर्माण झाला असे म्हणतात, तथापि यावरून वर्गविशिष्ट भाषेच्य वापराचे महत्त्व लक्षात येण्याजोगे आहे. भाषेप्रमाणेच मानवाची कृती, राहणी व विचार यांवरून त्याचा काल, प्रांत व वर्ग यांची नेमकी जाणीव वाचकांना होत राहिली तर प्रतिमालेख यशस्वी ठरतो.

मनोरचनेचे दर्शन हवे

व्यक्तिरेखा तयार करताना व्यक्तीच्या भाषेबरोबरच तिची मनोरचना व शारीरिक हालचाल या साधनांचा उपयोग करावा लागतो. व्यक्तीची मुद्रा, तिचा आवाज, इतकेच नव्हे, तर तिच्या प्रत्येक हालचालीत इतर व्यक्तीपासूनची भिन्नता प्रकट होत असते. विकारातून मानव व मानवातून प्रतिमालेख तयार झाल्यावर शरीर व मन यांची विशिष्ट ठेवण व शरीराच्या विशिष्ट हालचाली यांचा पुरेपूर तपशील लेखकाने भरला की ती व्यक्तिरेखा सचेतन होऊ लागते. व्यक्तिरेखा स्पष्ट करण्याचे एक प्रमुख साधन म्हणजे मनोरचनेचे वर्णन हे होय. 'पिण्डे पिण्डे मतिर्भिन्ना:' या न्यायाने प्रत्येक व्यक्तीची मनोरचना ही भिन्न असते. मानवी मनाची भिन्न रचना सुस्पष्टपणे दाखविणे हे स्वभावलेखनकलेचे सर्वश्रेष्ठ वैशिष्ट्य किंबहुना तो तिचा आत्माच होय. व्यक्तीची विशिष्ट मनोरचना हेच व्यक्तिरेखा अमर करण्याचे खरे साधन आहे; हे लेखकाने लक्षात ठेवले पाहिजे. विशिष्ट मनोरचनेचे

यथार्थ दर्शन घडविणे लेखकाला साधले नाही, तर व्यक्तिरेखा निर्माण करण्यात लेखक अयशस्वी ठरला, असेच म्हणावे लागेल. याउलट, हे कार्य जर त्याला साधले तर इतर अनेक त्रुटी असल्या तरी तो आपल्या वाङ्मयास नावलौकिक प्राप्त करून देऊ शकतो. शेक्सपियरचे सर्व स्वभावलेखन मनोरचनेच्या वैशिष्ट्यांमुळेच जिवंत झाले आहे. मनोरचनेस अनुरूप अशी भाषासरणी असली म्हणजे व्यक्तिरेखा अधिक स्पष्ट होते व विशिष्ट शब्दप्रयोग व अंगविक्षेप यांनी तिला शेवटची सफाई येते. डॉ. सहस्रबुद्धे यांनी उत्तम व्यक्तिरेखनाचे रहस्य पुढीलप्रमाणे विशद केले आहे– 'विचारविकारांची माती थापून काल, प्रांत, वर्ग, कृती, राहणी, विचार, मनोरचना, भाषासरणी व अंगविक्षेप या कोरण्या लावून मूर्ती तयार केली की उत्तम व्यक्ति-रेखा तयार होते.' [५]

स्वभावलेखनासाठी निवडलेली व्यक्ती 'प्रतिमा' असावी

अशा तऱ्हेने वाङ्मयात निर्माण होणारी ही व्यक्तिरेखा वाचकांना आकर्षक वाटावी व तिने अनेकांच्या सुखदुःखाचे प्रतिनिधित्व करावे, याची खबरदारी लेखकाने घेणे आवश्यक आहे. लेखकाने निर्माण केलेल्या व्यक्तिरेखेशी वाचक तादात्म्य पावला तर वाङ्मयात खरा रस निर्माण होऊ शकतो. यासाठी स्वभावलेखनासाठी निवडलेली व्यक्ती 'प्रतिमा' असावी लागते म्हणजेच तिची सुखदुःखे ही आपली सुखदुःखे असे वाटणारा समाजात एक बराच मोठा वर्ग असावा लागतो. ती व्यक्तिरेखा मानवजातीची प्रतिनिधी असावी लागते. म्हणून क्लेटन हॅमिल्टन म्हणतो, 'ललितकृतीत येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीच्या अंगी सामान्य गुण असलेच पाहिजेत. सामान्य व विशेष असले तर चांगलेच पण केवळ विशेष गुण असणाऱ्या व्यक्ती ललितकृतीत येणेच शक्य नाही.' [६] 'पण लक्षात कोण घेतो?' मधील यमुना, 'जादूगार' मधील इंदुमती, 'दौलत'मधील निर्मला या व्यक्तिरेखा 'प्रतिमा' असल्यामुळे वाचक त्यांच्याशी एकरूप होऊ शकले.

स्वभावलेखनातील सुसंगती

लेखकाने स्वभावलेखनातील सुसंगतीकडे लक्ष ठेवणे ही एक महत्त्वाची बाब आहे. कादंबरी किंवा नाटक यात व्यक्ती जेव्हा प्रथम प्रवेश करते तेव्हा तिचा जो स्वभाव व्यक्त होईल, तिचे जे विकार–विचार दिसतील, तिची जी बोलण्याची पद्धत असेल, तीच शेवटच्या प्रवेशापर्यंत तशीच टिकणे याला स्वभावातील सुसंगती असे म्हणता येईल. तथापि कथानकरचनेतील दोषामुळे, बोधवादाच्या हव्यासामुळे, विनोद निर्माण करण्याचा हौसेमुळे व मानवी मनोविकारांच्या अज्ञानामुळे लेखका-कडून स्वभावलेखनात विसंगती निर्माण होऊ शकते. म्हणून लेखकाने याबाबतीत सावधानता बाळगणे आवश्यक आहे. ज्या लेखकाला मनोविश्लेषणाचे ज्ञान आहे, त्याच्या हातून हा विसंगतीचा दोष कमीत कमी संभवतो. डॉ. सहस्रबुद्धे म्हणतात, 'मनाचे अगदी सूक्ष्मातील सूक्ष्म तंतू कसे हलत असतात, स्वाभिमान, प्रेम, स्वार्थ,

औदार्य इत्यादी विकारांची आंदोलने या मानससरोवरात कशी चालू असतात, याचे यथार्थ वर्णन म्हणजेच मनोविश्लेषण. हे मनोविश्लेषण ज्याला येत नाही, त्या लेखकाची कृती उच्च वाङ्मयात समाविष्ट होऊ शक्य नाही.' [७] यावरून उत्कृष्ट स्वभावलेखनासाठी मनोविश्लेषणाचे ज्ञान असणे किती आवश्यक आहे, हे दिसून येईल.

स्वभावलेखन करीत असताना काही लेखक निवेदनपद्धतीचा आश्रय घेतात तथापि निवेदनपद्धतीमुळे व्यक्तीच्या स्वभावाची यथार्थ कल्पना येत नाही व त्यामुळे अशा प्रकारचे स्वभावलेखन वाचकांना संतुष्ट करू शकत नाही. लेखकाने केलेल्या निवेदनामुळे वाचकांचा विरस होतो. व ते लेखकाच्या व्यक्तिचित्रणाशी तद्रूप होऊ शकत नाहीत. म्हणून आधी व्यक्तीची कृती, संवाद, तिच्याबद्दलचे इतरांचे उद्‌गार, इतरांचे तिच्याशी वर्तन इत्यादी साधनांनी तिची स्वभावरेखा काढून मग जरूर तर निवेदन करणे हीच पद्धत योग्य वाटते. वाचक व कथानक यामधून लेखक अदृश्य झाल्याखेरीज खऱ्या अर्थाने रसनिर्मिती होऊ शकत नाही. 'जादूगार', 'हिंदोळचावर', 'दोन ध्रुव', 'भंगलेले देऊळ' या कादंबऱ्यांमध्ये निवेदन शक्यतोवर टाळण्याचा प्रयत्न केलेला आहे. व्यक्तीचे आचरण, त्यांचे संवाद व मनोविश्लेषण एवढे देऊन त्यावरून काय निष्कर्ष काढावयाचे ते वाचकावर सोपविण्यात आलेले आहे. लेखकाचे अस्तित्व न जाणविल्याने उत्कृष्ट सत्याभास घडून आनंदनिर्मिती झाल्याने या कादंबऱ्या विशेष रम्य झाल्या आहेत. 'जादूगार' मधील 'आनंदराव' ही व्यक्तिरेखा रंगविताना प्रा. फडके निवेदनाचा एक शब्दही चुकून काढीत नाहीत, तरीसुद्धा ही रेखा अस्पष्ट होण्याऐवजी जास्तच रम्य होते. स्वभावलेखनपद्धतीच्या विलासाचा हा परमोच्च बिंदू मानावा लागेल.

कादंबरी व नाटक यांतील स्वभावलेखन

कादंबरी, नाटक व लघुकथा या तिन्ही शाखा सारख्या असल्या तरी विस्तार, रचना, वर्णनपद्धती या दृष्टीने त्यांत फार फरक दिसून येतो व त्यामुळेच त्यातील स्वभावलेखनही भिन्न स्वरूपाचे असते. कादंबरीत स्वभावलेखनाला खूपच वाव असतो, तसा नाटकात असू शकत नाही. परंतु नाटकात जी उत्कटता असते ती कादंबरीत आणता येत नाही. प्रत्यक्ष दर्शन आणि उद्‌गार व भाव यांचे एकत्र दर्शन कादंबरीत शक्य होत नाही व त्यामुळे भावनांचा ठसा नाटकाइतका प्रभावीपणे उमटू शकत नाही. तथापि नाटककारावर अंक, प्रवेश इत्यादी रचनेची बंधने असतात, त्यामुळे स्वभावदर्शक किती व कोणते प्रवेश दाखवावे यावर मर्यादा येते. नाटककार वाचकांना सर्व स्थळी व सर्व काळी नेऊ शकत नाही, व अगदी आवश्यक असणारे प्रसंगही दाखवू शकत नाही. कादंबरीत काही वाक्यांचा प्रवेश शक्य आहे. पण नाटकात तो तसा योजता येणार नाही. काही प्रसंगांचा केवळ उल्लेख करून नाटककार पुढे जातो, तर कादंबरीकार त्यांचे बारकाईने वर्णन करू शकतो.

त्यामुळे नाटकातील काही प्रसंग हे कादंबरीतील प्रसंगापेक्षा निर्जीव ठरू शकतात. नाटककार जे प्रसंग केवळ निवेदनपद्धतीने रंगवू शकेल त्यांचे कादंबरीकार दर्शनपद्धतीने वर्णन करू शकेल. तसेच नाटककाराला जे साधन नाटकात वापरणे शक्य नसते त्या साधनाचा–मनोविश्लेषणाचा–आधार कादंबरीकार घेऊ शकतो. ना. सी. फडके यांनी कथारचनेपेक्षा व्यक्तिदर्शन हेच ललितकथेचे अधिक महत्त्वाचे अंग मानले आहे. व कादंबरीचे श्रेष्ठत्व त्यातील मनोविश्लेषणावरच अवलंबून असल्याचे मत व्यक्त केले आहे. ते म्हणतात, 'उच्च कलेच्या दृष्टीने कथानकाच्या रचनेतील चातुर्यापेक्षा कुशल व्यक्तिदर्शनाच्या शोभेने सजलेल्या कादंबरीलाच श्रेष्ठ स्थान मिळेल. याचे कारण असे की बाह्यसृष्टीतील विविध वस्तूंच्या दर्शनापेक्षा मानवी अंतःकरणात ज्या असंख्य घडामोडी सतत होत असतात त्यांचे दर्शन वाचक–प्रेक्षकांस घडले तर त्यास अधिक आल्हाद होतो.'[८] कादंबरीकार पात्रांच्या मनोरचनेचे पापुद्रे उलगडून दाखवितो, नाटककाराला हे शक्य होत नाही. मानवी मनातील भावनांचे विविध पदर केवळ कादंबरी व लघुकथा यांतच दाखविणे सहज शक्य होते. मानवी मनाचे संपूर्ण दर्शन व पृथक्करण केवळ कादंबरीत शक्य असल्यामुळे याबाबतीत कादंबरी नाटकापेक्षा श्रेष्ठ ठरते. यासाठीच 'अमर अशा व्यक्तिरेखा फक्त कादंबरीतच शक्य आहेत'[९] असे गॉल्सवर्दीने म्हटले आहे.

नाटक व कादंबरी यांतील स्वभावरेखनाविषयीचा आणखी एक महत्त्वाचा फरक म्हणजे कादंबरीत व्यक्तीच्या मनाचा विकास किंवा स्वभावाची घडण दाखविता येते, नाटकात मात्र हे शक्य होत नाही. नाटकातील व्यक्तिरेखा या आरंभापासून ते अंतापर्यंत ओतीव मूर्तीप्रमाणे एकरूप असतात. नाटक हे रंगभूमीवर करावयाचे असल्याने त्याला साहजिकच कालमर्यादा पडते. तीन–चार तासांच्या अवधीत जे प्रसंग बसतील व जे रंगभूमीवर करून दाखविता येतील तितकेच नाटकात समाविष्ट होऊ शकतात. पण व्यक्तीच्या मनाचा विकास दाखविण्यास इतका अवधी वा प्रसंग पुरेसे पडत नाहीत. नाटकात फक्त ओतीव रेखा दाखविता येतात, कादंबरीत त्या दाखवून मनोविकासाचे वर्णनही तपशिलाने करता येते.

लघुकथेतील व्यक्तिरेखा

लघुकथेत व्यक्तिरेखांसंबंधी विचार करताना हे लक्षात ठेवले पाहिजे की, कादंबरी हे सर्व संसाराचे चित्र असते, तर लघुकथा संसारातील विशिष्ट घटनेचे किंवा प्रसंगाचे चित्र असते. मानवी जीवन हा एक वृक्ष मानला तर त्याचा आडवा छेद घेणे लघुकथेत शक्य होते. लघुकथेमधील नायक, नायिका यांना प्रातिनिधिक रूप असते. म्हणजेच त्या 'प्रतिमा' असतात. त्यामुळे त्यांची सुखदुःखे, विचार-विकार यांच्याशी वाचक तादात्म्य पावतो. विशिष्ट मनोरचना स्पष्ट करण्यास कादंबरीच्या

तुलनेने लघुकथेत वाव कमी असतो. तथापि अंगविक्षेप व भाषापद्धती यांची वैशिष्ट्ये व्यक्तिरेखेत आणणे शक्य असते. लघुकथेतील व्यक्तिरेखेसंबंधी ईव्हलिन मे अल्-ब्राइट याने पुढील विचार व्यक्त केले आहेत –' लघुकथेत स्वभावाचा विकास कधीच दाखविता येत नाही. ओतीव स्वभावाचे संपूर्ण विशदीकरण लघुकथेत शक्य नाही. तर लघुकथेत विशिष्ट प्रसंगीचे परिवर्तन मात्र दाखविता येईल. जीवनाच्या सबंध प्रवासाचे चित्र लघुकथेत शक्य नाही. पण त्या प्रवासातला अनेक मार्गांचा जो संपातबिंदू, जेथून जीवनाला एकदम निराळेच वळण मिळते, असा प्रसंग हाच फक्त लघुकथेत दाखविता येतो.'[१०] लघुकथेमध्ये विशिष्ट मनोरचना किंवा स्वभावाचा विकास दाखविणे अवघड असले तरी एकाच व्यक्तीच्या अनेक कथा लिहिल्या तर हे काम सुलभ होऊ शकते. ताम्हणकरांची 'दाजी' ही व्यक्तिरेखा किंवा इंग्रजीतील ऑर्थर कॉनन डायल यांची 'शेरलॉक होम्स' किंवा डिकन्सची 'पिकविक' ही व्यक्तिरेखा यावरून ही गोष्ट लक्षात येऊ शकेल.

आत्मचरित्रातील व्यक्तिचित्रण

कोणत्याही ललितकृतीत मानवी जीवनाला अधिक महत्त्व असते. कारण मानवी जीवनाचे चित्रण करण्यासाठीच ललितवाङ्मयाचा जन्म झाला आहे. मनुष्य हा ललितकृतीच्या केंद्रस्थानी असतो. परंतु ललितवाङ्मयात ज्या जीवनाचे चित्रण केलेले असते त्या जीवनाला रंग, रूप, आकार मिळतो तो मानवी स्वभावामुळे. म्हणून ललितकृतीतील जीवनचित्रण हे एका दृष्टीने मानवाचे स्वभावचित्रणच असते. हे स्वभावचित्रण त्या त्या वाङ्मयप्रकारामध्ये वेगवेगळ्या पद्धतीने रंगविलेले असते. प्रत्येक वाङ्मयप्रकाराची प्रकृती ही भिन्न असल्याने सर्वत्र एकसारखेच स्वभावचित्रणाचे स्वरूप आढळेल, असे नाही. कादंबरी, लघुकथा, नाटक या वाङ्मयप्रकारात कथेतील पात्रांचे स्वभावचित्रण भिन्न भिन्न पद्धतीने कसे केलेले असते, याची चर्चा केलीच आहे. आत्मचरित्र ही ललितकृती असली तरी इतर वाङ्मयप्रकारांना स्वभावचित्रणाचे जे स्वातंत्र्य आहे ते आत्मचरित्रकाराला नसते. इतर ललितकृतींत स्वभावचित्रणात कल्पनेचा रंग मिसळता येतो, परंतु आत्मचरित्रकाराला आपली सत्यदर्शनाची भूमिका सोडून रंगउधळण करता येत नाही. त्यामुळे इतर ललितकृतींतील स्वभावचित्रणाचे निकष आत्मचरित्रातील स्वभावचित्रणाला तंतोतंत वापरणे धाडसाचे ठरते.

आत्मचरित्रातील व्यक्तिचित्रण हे अधिक वास्तव व जिवंत असते. कारण इतर कलांचा जड मानव हा विषय असतो. तर वाङ्मयाचा विषय जिवंत मानव हा असतो, आणि आत्मचरित्रात तर इतर कोणत्याही ललितकलेपेक्षा व्यक्ती या खऱ्याखुऱ्या वास्तवातील असतात. अशा व्यक्तींचे चित्र रंगविणे हे फारच अवघड असते कारण सत्यदर्शनाचे एक फार मोठे, परंतु आवश्यक असे बंधन आत्मचरित्र-

काराला स्वीकारावे लागते. त्यामुळे आत्मचरित्रकार हा आपले चित्र रंगविण्यात जितका गुंततो तितका तो इतरांची चित्रे रंगविण्यात गुंतत नाही. लक्ष्मीबाई टिळकांसारखी एखादीच समर्थ लेखिका त्याबाबतीत यशस्वी होते आणि वाचकांसमोर समर्थ व्यक्तिरेखा उभ्या करते.

आत्मचरित्रकार आपल्या आयुष्यात आलेल्या व्यक्तींचे जेव्हा स्वभावचित्रण करतो, तेव्हा आणखी एक मर्यादा पडते. त्या त्या व्यक्तींचे व्यक्तिचित्रण हे आत्मचरित्रकाराच्या दृष्टीतून आलेले असते. आत्मचरित्रकाराला त्या व्यक्ती जशा जाणवल्या तसेच त्यांचे चित्रण येते. त्या व्यक्तींचे गुणदोष हे आत्मचरित्रकाराला जाणवलेले गुणदोष असतात. प्रत्यक्षात ते तसे असतीलच असे नाही. त्यामुळे आत्मचरित्रातील स्वभावचित्रणात एकांगीपणाची शक्यता नाकारता येत नाही. परंतु ही अपरिहार्यपणे पडलेली मर्यादा असते. आणखी एक मर्यादा म्हणजे आत्मचरित्राचा लेखक सोडून इतर पात्रांचे जे चित्रण आलेले असते ते 'संपूर्ण' असत नाही. त्या पात्रांचे संपूर्ण व्यक्तिमत्त्व, त्यांची पार्श्वभूमी, कारणमीमांसा यांना तिथे वाव नसतो. ज्या ज्या प्रसंगांच्या संदर्भात त्यांचा संबंध आलेला असतो, त्या त्या संदर्भातच त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची वैशिष्ट्ये दिसून येतात. परंतु आत्मचरित्रात असे घडणे अटळ असते. म्हणून आत्मचरित्रलेखकाने त्या व्यक्तिमनाचा शोध कसा घेतला आहे, या दृष्टीनेच आत्मचरित्रातील व्यक्तिरेखेकडे पाहिले पाहिजे.

आत्मचरित्रातील स्वभावलेखनात सर्वांत अधिक महत्त्व असते ते स्वत: आत्मचरित्रलेखकाला. कारण तोच त्या जीवनकथेचा नायक असतो. आत्मचरित्र हे लेखकाचेच चरित्र असल्याने त्यात त्याच्या व्यक्तिमत्त्वाचे अधिक चित्रण येणे स्वाभाविक असते. आत्मचरित्रात त्याचे संपूर्ण व्यक्तिमत्त्व आपल्या नजरेसमोर उभे राहते. परंतु यातही एक धोका असतोच व त्यामुळे एक दोष निर्माण होतो. स्वत:चे स्वभावचित्रण लेखकाने स्वत:च रेखाटलेले असल्याने येथेही एकांगीपणाचा आरोप येण्याची शक्यता असते. याचे कारण स्वत:चे चित्र रेखाटणे ही एक अत्यंत कठीण अशी कृती आहे. स्वत:ला स्वत:पासून दूर ठेवणे आणि 'स्व'कडे दूरस्थाच्या दृष्टिकोणातून पाहणे, हे तर योग्यांना सुद्धा साधू शकत नाही. माणसे सर्व काही विसरू शकतात, पण आत्मप्रेमात ती इतकी गुंतलेली असतात की स्वत:चे निरीक्षण, समीक्षण आणि चित्रण करण्यासाठी आवश्यक असलेली अलिप्तता त्यांच्या वृत्तीत येऊ शकत नाही. याचा अपरिहार्य परिणाम कित्येक आत्मचरित्रांवर झालेला दिसतो. 'चरित्रचंद्र'मध्ये पांगारकर स्वत:च्या कर्तृत्वावर संतुष्ट आहेत, ना. सी. फडके आपले जीवन एखाद्या कादंबरीसारखे रम्याद्भुत आहे, अशा कल्पनेत गुरफटले आहेत. 'कऱ्हेचे पाणी'मध्ये आचार्य अत्रे अहंपणाच्या वर्तुळातून बाहेर पडू शकत नाहीत. त्यामुळे आपल्याच हाताने आपल्याच पाठीवर

शाबासकीची थाप ते मारतात, असे वाटते. कित्येकजण आपल्या दुःखाचे व त्यागाचे आत्मचरित्रात भांडवल करतात. त्यामुळे आत्मचरित्र ही एक स्वतःसंबंधी आत्मसमाधानाने लिहिलेली जीवनकथा, अशी अनेक आत्मचरित्रांच्या बाबतीत अवस्था होऊन बसते. उत्तम आत्मचरित्र हे बहुधा दुर्मिळ असते याचे कारण आपल्या व्यक्तिगत रागद्वेषांतून व स्वतःसंबंधीच्या आसक्तीतून बाहेर पडलेल्या जीवनभक्तालाच स्वतःचे योग्य त्या संदर्भात चित्र रेखाटता येते. 'स्वान्तरासी नग्न पाहावे' असे म्हटले जाते व ज्या लेखकांना हे साधते ते लेखक आपल्या जीवनाचे तटस्थपणाने अवलोकन करून आपले गुणदोष प्रकट करीत असतात. त्यामुळे त्यांचे चित्रण हे एकांगी असले तरी अर्थपूर्ण असते. स्वभावलेखन ही एक अत्यंत श्रेष्ठ व तितकीच दुःसाध्य अशी कला मानण्यात येते. तथापि ही दुःसाध्य कला लक्ष्मीबाई टिळकांना चांगलीच साध्य झाल्याचे दिसून येते. त्या आपले दोष पाहू शकतात. चुका कबूल करू शकतात, दुसऱ्यांचे गुण ग्रहण करू शकतात. त्यामुळे 'स्मृतिचित्रे' सारखी आत्मचरित्रे आत्मसमर्थनाच्या दोषापासून अलिप्त राहू शकतात. अशा आत्मचरित्रातील स्वभावरेखेत वा. ल. कुलकर्णी यांनी म्हटल्याप्रमाणे 'स्वत पासून स्वतःला दूर सारून जर स्वतःकडेच परंतु त्रयस्थाच्या नजरेने बघता आले तरच त्याला स्वतःचे यथार्थ दर्शन घडण्याचा संभव'[११] याचा प्रत्यय येतो. हे यथार्थ दर्शन केवळ यथार्थ असून उपयोगाचे नाही तर ते कलात्मकही असावे लागते. 'आपणाला आत्मचरित्रात त्या व्यक्तीचे चित्र नको असते, चरित्र हवे असते... आत्मचरित्र हे आत्मचरित्र आहे, चित्र नव्हे,'[१२] हे वा. ल. कुलकर्णी यांचे मत या संदर्भात महत्त्वाचे वाटते.

आत्मचरित्रातील स्वभावरेखेतून मानवी प्रवृत्ती, ती बनण्याची कारणे, परिस्थितीचा स्वभावावर व स्वभावाचा परिस्थितीवर होणारा परिणाम, स्वभाव–वैशिष्ट्ये, स्वभावातील परिवर्तन, त्यांचा कृति–उक्तीवर होणारा परिणाम, आणि या सर्वांतून एका व्यक्तीच्या जीवनाचा आखला जाणारा आलेख वाचकांच्या डोळ्यांसमोर उभा केला जातो. अशा स्वभावचित्रणात मग आपोआपच मनोविश्लेषणाचे धागे गुंफले जातात. इतर कोणत्याही ललितकृतीपेक्षा आत्मचरित्रे मानसशास्त्राला अधिक खाद्य पुरवितात. आत्मचरित्राच्या स्वभाव–रेखनातून जिवंत व्यक्तिरेखा समोर उभ्या केलेल्या असतात. अशा व्यक्तिरेखा या विशिष्ट (particular) असल्या तरी लेखकाने सूक्ष्म दृष्टीने शोध घेतला असेल तर त्या विश्वात्मकही (universal) बनू शकतात. म्हणून आत्मचरित्रातील व्यक्तिरेखांचे महत्त्व सांगताना डॉ. नाईक यांनी मांडलेले विचार अर्थपूर्ण वाटतात. ते म्हणतात, 'The modern age is deeply interested in psychology–understanding aright the highly complex composition of man's personality. Honest autobiographies are bound to be a great help in this

direction–it is here we may be able to discover man in his nakedness.[१३]

मानवी स्वभावाचे यथार्थ असे दर्शन आत्मचरित्रात घडत असल्याने आत्मचरित्राच्या अभ्यासामध्ये सर्वांत अधिक महत्त्व स्वभावचित्रणास प्राप्त होते. स्वभावचित्रणाच्या आधारेच त्या जीवनकथेची व वाङ्मयीन कृतीची वैशिष्ट्ये आपणास विशद करता येतात. लक्ष्मीबाई टिळक यांच्या 'स्मृतिचित्रे' या आत्मचरित्राचा अभ्यास करताना स्वभावचित्रणाच्या अनुषंगाने या वाङ्मयकृतीचा आधार असलेल्या लक्ष्मीबाई टिळकांच्या आणि इतर व्यक्तींच्या व्यक्तिमत्त्वाची मीमांसा येथे करावयाची आहे.

● ●

संदर्भ – सूची

१. सहस्रबुद्धे, पु. ग. –स्वभावलेखन
मॉर्डन बुक डेपो, पुणे, १९३८, पृष्ठ ८
२. फडके ना. सी. – प्रतिभा–साधन
देशमुख आणि कंपनी, पुणे–२
सातवी आवृत्ती १९६०, पृष्ठ १०९
३. सहस्रबुद्धे उनि, पृष्ठ ३२.
४. तत्रैव, पृष्ठ ५३.
५. तत्रैव, पृष्ठ १६२
६. तत्रैव, पृष्ठ १७८
७. तत्रैव, पृष्ठ १८४
८. फडके उनि, पृष्ठ १०८
९. सहस्रबुद्धे उनि, पृष्ठ ३३२.
१०. तत्रैव, पृष्ठ ३३०.
११. कुलकर्णी वा. ल. वाङ्मयातील वादस्थळे
पॉप्युलर प्रकाशन– दुसरी आवृत्ती १९६२ पृष्ठ, १४८.
१२. तत्रैव, पृष्ठ १५०, १५७
13. Naik, Dr. D. G. – Art of Autobiography
Vidarbha Marathwada Book Company, Poona, First Published 1962. Page, 217.

प्रकरण तिसरे

मराठी आत्मचरित्रात्मक लेखन व 'स्मृतिचित्रे'

पुरुषांचे आत्मचरित्रपर लेखन

'स्मृतिचित्रा'चा एक आत्मचरित्र म्हणून अभ्यास करताना 'स्मृतिचित्रा'-पूर्वी प्रकाशित झालेल्या व 'स्मृतिचित्रा'नंतर साधारणपणे १९५० पर्यंतच्या काल-खंडात लिहिल्या गेलेल्या आत्मचरित्रांचा एक स्थूलस्वरूपाचा आढावा घेऊन त्याच्या पार्श्वभूमीवर 'स्मृतिचित्रां'ची वैशिष्ट्ये स्पष्ट करणे योग्य ठरेल.

मराठीतील आत्मचरित्र वाङ्मयाकडे नजर टाकली असता हे दालन संख्येच्या दृष्टीने विशेष संपन्न नाही, ही गोष्ट सहज लक्षात येते. आत्मचरित्र–लेखनाची कला इंग्रजी अमदानीत विकसित झाली. त्यापूर्वी प्राचीन मराठी कवींपैकी नामदेव, तुकाराम, जनाबाई, बहिणाबाई यांच्या अभंगात आत्मनिवेदन आलेले आढळते. पेशवाईच्या काळात नाना फडणविसांनी आपले आत्मचरित्र लिहून ठेवले आहे. 'आत्यंतिक धर्मभावना आणि प्रखर कामभावना यांच्या कोंडीत सापडलेल्या आपल्या व्यक्तिमत्त्वाची कोंडी पेशव्यांच्या आपल्याबद्दलच्या लोभामुळे कशी फुटली आणि परिणामी आपण राजकारणाकडे कसे जुंपलो गेलो, याबद्दलचे हे निर्भीड आत्मनिवेदन आहे आणि आत्मपरीक्षणही आहे' [१] असे मत श्री. भीमराव कुलकर्णी यांनी या आत्मचरित्राबद्दल व्यक्त केले आहे. तथापि हे आत्मचरित्र अत्यंत संक्षिप्त व त्रोटक आहे. बडोद्याचे गंगाधर कृष्णाशास्त्री पटवर्धन यांनीही आत्मपर लेखन केले आहे. १८५९ मध्ये विष्णुबुवा ब्रम्हचारी यांनी 'वेदोक्त धर्मप्रकाश' हा ग्रंथ प्रसिद्ध केला, त्यात आत्मचरित्रलेखनाच्या खुणा आढळतात. सुप्रसिद्ध क्रांतिकारक वासुदेव बळवंत फडके यांचे आत्मचरित्र १८७९ मध्ये ज्ञानप्रकाशात प्रसिद्ध झाले. त्यात त्यांनी आपली कैफियत मांडली आहे. तथापि वरील सर्व ग्रंथांचा समावेश आत्मचरित्र या प्रकारात करणे धाडसाचे ठरेल.

मराठीतील पहिला आत्मचरित्रात्मक ग्रंथ म्हणून आद्य मराठी व्याकरणकार दादोबा पांडुरंग यांच्या 'आत्मचरित्र' या ग्रंथाचा उल्लेख केला पाहिजे. स्वतः ठेवलेल्या दैनंदिनीच्या आधारे त्यांनी आपल्या बालपणापासून ते १८४८ पर्यंतची हकीकत यात सांगितली आहे, व पुढे १८८२ मध्ये स्वतःचा मृत्यू होईपर्यंत या

ग्रंथात त्यांनी थोडी थोडी भर टाकली आहे. अव्वल इंग्रजी अमदानीतील समाज-स्थितीचे दर्शन या ग्रंथात घडते. हा ग्रंथ महाराष्ट्रास प्रथम ज्ञात करून देणारे श्री. पांगारकर म्हणतात, '१८२० पासून १८७० पर्यंतच्या महाराष्ट्र समाजाचा, महाराष्ट्रीय विद्वानांचा, मराठी गद्याच्या वाढत्या काळाचा मनोरंजक इतिहास या आत्मचरित्रावरून दिसून येतो.' [२]

दादोबांचे समकालीन बावा पदमनजी यांनी लिहिलेले 'अरुणोदय' (१८८७) हे आत्मचरित्र त्यांच्या ख्रिस्तीकरणाचा इतिहास सांगते. त्यांनी आपल्या आत्मचरित्र लेखनासाठी पत्रे, दैनंदिनी, वृत्तपत्रातील उतारे इ. साधनांचा उपयोग केला आहे. तत्कालीन समाजजीवनातील संघर्षाचे सुंदर चित्र त्यांनी आपल्या आत्मचरित्रात रेखाटले आहे. त्यांच्या आत्मनिवेदनातील समतोलवृत्तीचा व प्रांजल-पणाचा वाचकांच्या मनावर प्रभाव पडतो.

'अरुणोदया'नंतरचे उल्लेखनीय आत्मचरित्र म्हणून एका उत्कृष्ट भाषांतराचा उल्लेख करावा लागेल व तो म्हणजे वि. दा. सावरकर यांनी प्रसिद्ध इटालियन देशभक्त जोसेफ मॅझिनी यांच्या आत्मचरित्राचा केलेला अनुवाद होय. १९०७ मध्ये प्रकाशित झालेल्या या ग्रंथाद्वारे इंग्रजांच्या दडपशाहीविरुद्धच्या तीव्र भावनांचा आविष्कार करण्याचे व तरुणांना राष्ट्रभक्तीचा संदेश देण्याचे महत्त्वाचे कार्य सावरकरांनी केले आहे.

विसाव्या शतकाच्या आरंभी फारच कमी आत्मचरित्रे लिहिली गेली. थोर समाजसेवक व स्त्री–शिक्षणाचे पुरस्कर्ते महर्षी धोंडो केशव कर्वे यांनी आपल्या जीवनापासून विद्यार्थ्यांनी बोध घ्यावा व आपण स्त्रियांच्या कल्याणासाठी केलेल्या कार्याची लोकांना माहिती व्हावी या उद्देशाने 'आत्मवृत्त' (१९१५) लिहिले. कठोर आत्मपरीक्षण हा आत्मचरित्रकाराला आवश्यक असणारा गुण महर्षी कर्वे यांच्या ठायी आढळतो, म्हणून त्यांचे आत्मचरित्र दर्जेदार ठरले आहे.

या कालखंडात महाराष्ट्राच्या राजकीय जीवनात प्रचंड उलथापालथ चालली असताना देखील तो काळ गाजविणाऱ्या टिळक, गोखले आदी समाजधुरीणांनी स्वतःची आत्मचरित्रे मात्र लिहिली नाहीत. तथापि वि. दा. सावरकर यांनी मात्र सरकारच्या रोषाची पर्वा न करता अंदमान येथील त्यांच्या कारावासाची कहाणी 'माझी जन्मठेप' (१९२७) च्या रूपाने जनतेपुढे ठेवली आहे. इंग्रज सरकारने या पुस्तकावर बंदी घातली होती. भारताच्या स्वातंत्र्य–प्राप्तीसाठी क्रांतिकारकांनी इंग्रजी सत्तेविरुद्ध दिलेला लढा जाणून घेण्यासाठी हा ग्रंथ अत्यंत उपयुक्त आहे. म्हणूनच याला राष्ट्रीय व वाङ्मयीन असे दुहेरी महत्त्व प्राप्त झाले आहे.

लक्ष्मण रामचंद्र पांगारकर यांचा 'चरित्रचंद्र' (१९३८) व नरसिंह चिंतामण केळकरकृत 'गतगोष्टी' (१९३९) हे या कालखंडातील दोन महत्त्वाचे आत्मचरित्र ग्रंथ होत. पांगारकरांनी बोधवादी दृष्टिकोणातून आपल्या आत्मचरित्राचे

लेखन केले आहे. वाङ्मयनिर्मिती करू इच्छिणाऱ्या लेखकांना, धर्मकार्य करू इच्छिणाऱ्या वक्त्यांना व संसार सुखमय करू इच्छिणाऱ्या प्रापंचिकांना व परमार्थाची इच्छा बाळगणाऱ्या मुमुक्षूंना आपल्या चरित्रापासून काहीतरी बोध मिळावा असा या ग्रंथलेखनामागे पांगारकरांचा हेतू आहे. आत्मसंतोष व आत्मगौरव या दोन गुणवैशिष्ट्यांचा आढळ त्यांच्या आत्मचरित्रात होतो. त्यांची श्रद्धाळू वृत्तीही त्यांच्या लेखनातून दृग्गोचर होते. अत्यंत रसाळ व प्रेमळ निवेदन शैलीत लिहिलेले एका मुमुक्षूचे आकर्षक असे हे आत्मचरित्र आहे.

केळकरांनी 'गतगोष्टी'च्या प्रस्तावनेत आत्मचरित्र लेखनामागील आपली भूमिका स्पष्ट केली आहे. आपल्या जीवनाचा वृत्तांत जनतेसमोर सादर करावा व मनाला विरंगुळा वाटावा म्हणून जुन्या आठवणीत रमावे हा त्यांच्या आत्मचरित्रलेखनामागील हेतू आहे. आपल्या गुणदोषांचे त्यांनी तटस्थपणे दर्शन घडविले आहे. तथापि आपल्या राजकीय जीवनाचे दर्शन घडविताना मात्र ते आत्मसमर्थन करू लागतात. केळकरांच्या निर्मळ व प्रासादिक भाषाशैलीचा आविष्कार त्यांच्या या मनोवेधक आत्मचरित्रात आढळतो.

सुप्रसिद्ध विनोदी लेखक व नाटककार श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांनी १९३५ साली आपले 'आत्मवृत्त' लिहिले. उपयुक्ततावादी दृष्टिकोणातून लिहिलेल्या या आत्मचरित्रात क्वचित आत्मश्लाघेचा दोष आढळला तरी कठोर आत्मपरीक्षणही आले आहे. कोल्हटकरांच्या नाट्यनिर्मितीचे रहस्य व पार्श्वभूमीही त्यांच्या या आत्मवृत्तातून कळते. या आत्मवृत्ताच्या लेखनसमाप्तीनंतर जन्ममरणाच्या फेऱ्यातून सुटल्याचा आनंद त्यांना झाला आहे.

सी. ग. देवधर यांनी आपल्या 'जीवनवृत्तान्ता'त (१९३७) प्रतिकूल परिस्थितीत बी. ए. पर्यंतची विद्या आपण कशी संपादन केली, हे सांगितले आहे. टिळक–आगरकर संबंधावरही त्यांच्या आत्मचरित्रातून प्रकाश पडतो.

गो. स. टेंबे यांचा 'माझा जीवनविहार' (१९४८) व ग. गो. बोडसांचे 'माझी भूमिका' (१९४०) ही या कालखंडातील कलावंतांनी लिहिलेली आत्मचरित्रे होत. यात त्यांनी आपल्या कलाजीवनातील आठवणी सांगितल्या आहेत. महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचे 'माझ्या आठवणी व अनुभव' (१९४०) हे आत्मचरित्र देशातील समाजसुधारणांचा इतिहास जाणून घेण्याच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे. म्हणून या ग्रंथास व्यक्तिगत व सामाजिक असे दुहेरी मूल्य लाभले आहे.

ग. त्र्यं. माडखोलकरांचे 'दोन तपे' (१९४६) व 'एका निर्वासिताची कहाणी' (१९४९) हे दोन आत्मवृत्तात्मक ग्रंथ माडखोलकरांच्या अहंकारी वृत्तीचे दर्शन घडवितात. काका कालेलकरांचे 'स्मरणयात्रा' (१९४९) हे आत्मवृत्त एक कुटुंबचित्र म्हणून हृद्य आहे. यात व्यक्तिदर्शनाप्रमाणेच बोधदर्शनही आहे. ना. सी.

फडके व भा. वि. वरेरकर यांनी आपल्या वाङ्मयीन कर्तृत्वाविषयीचे आत्मनिवेदन अनुक्रमे 'माझ्या साहित्यसेवेतील स्मृति' व 'माझा नाटकी संसार' या ग्रंथांतून केले आहे. त्यातून उभय लेखकांच्या कलासक्त व्यक्तिमत्त्वाचे दर्शन घडते. 'हॉट-सनवर रोखलेल्या पिस्तुलांतून' (१९५०) या आत्मचरित्रात वा. ब. गोगटे यांनी हॉटसनप्रकरणाची व त्यांना भोगाव्या लागलेल्या आपत्तींची हकीकत सांगितली आहे.

या कालखंडात सामाजिक कार्यकर्त्यांनी जी आत्मचरित्रे लिहिली, ती पुढील पिढीच्या मार्गदर्शनासाठी लिहिली. अर्थातच त्यांचा दृष्टिकोण बोधवादी होता. कोल्हटकर, केळकर, फडके, माडखोलकर इत्यादी साहित्यिक व टेंबे, बोडस यांसारखे कलावंत जेव्हा आत्मचरित्रे लिहू लागले, तेव्हा आत्मचरित्रात रोचकता निर्माण झाली. कारण या लेखकांनी बोधवादी दृष्टिकोणातून लेखन केले नाही. गतायुष्यातील स्मृतींना उजाळा द्यावा व त्यांचे निःसंकोचपणे प्रकटीकरण करावे हा त्यांचा आत्मवृत्त लेखनामागील हेतू होता. यादृष्टीने त्यांची आत्मचरित्रे बरीच यशस्वी ठरली, असे म्हणावे लागेल.

स्त्रियांचे आत्मचरित्रपर लेखन

स्त्रियांनी लिहिलेल्या आत्मचरित्रांपेक्षा पुरुषांनी लिहिलेल्या आत्मचरित्रांची संख्या जास्त असली तरी मराठीतील चांगल्या आत्मचरित्रांत स्त्रियांनी लिहिलेल्या आत्मचरित्रांचाच उल्लेख करावा लागेल. स्त्रियांचे पहिले आत्मचरित्रलेखन म्हणून रमाबाई रानडे यांच्या 'आमच्या आयुष्यातील काही आठवणी' (१९१०) या ग्रंथास मानाचे स्थान द्यावे लागेल. रमाबाईंचे हे आत्मचरित्र मराठीतील एक अव्वल दर्जाचे आत्मचरित्र म्हणून गणले जाते. न्यायमूर्ती रानडे यांच्या निधनानंतर लिहिलेल्या या ग्रंथात रमाबाईनी पतीबरोबरील आपल्या सहजीवनाची हकीकत सांगितली आहे. या ग्रंथाच्या प्रस्तावनेत नामदार गोखले म्हणतात, 'आपल्या वयाची सत्तावीस वर्षे ज्यांनी त्या विभूतीबरोबर त्यांची सहधर्मचारिणी या नात्याने 'सावली 'प्रमाणे घालविली, ज्यांच्या अंगचे नैसर्गिक तेज शिक्षणाने व अतिथोर सहवासाने अनेक पटींनी वृद्धिगत झाले व ज्यांचे मन रावसाहेबांच्या भक्तीत कायमचे गढून राहिले आहे, त्यांनी आपल्या दिगंतकीर्ती पतीच्या स्वभावाचे व आयुष्यक्रमाचे काढलेले चित्र आपणास पाहावयास मिळाल्याबद्दल महाराष्ट्रातील लोकांस अभिमान व समाधान वाटणे साहाजिक आहे.'[२] पत्नीने पतीबद्दल अशा तऱ्हेने लिहिलेला हा हिंदुस्थानातील पहिलाच ग्रंथ आहे, असेही त्यांनी नमूद केले आहे. पती हेच सर्वस्व मानणाऱ्या अत्यंत सुजाण व समंजस अशा साध्वीचे हे आत्मचरित्र वाचताना महाराष्ट्रातील त्या महापुरुषाचे विशाल अंतःकरण जसे जाणवते तद्वतच रमाबाईंच्या समर्पणशीलतेचेही दर्शन घडते.

स्त्रियांनी लिहिलेले आत्मचरित्र म्हणून ज्याला वाङ्मयगुणदृष्ट्या अग्रक्रम द्यावा लागेल असे आत्मचरित्र म्हणजे 'स्मृतिचित्रे' होय. लक्ष्मीबाई टिळकांनी लिहिलेले हे आत्मचरित्र मराठी साहित्यातील मानदंड होऊन बसले आहे. १९३४ ते १९३६ या कालावधीत चार खंडांत ते प्रसिद्ध झाले. रे. नारायण वामन टिळक या मराठीतील सुप्रसिद्ध कवीचे चरित्र सांगावे या हेतूने त्यांच्या पत्नीने या ग्रंथाचे लेखन केले आहे. 'स्मृतिचित्रां'तून कवी ना. वा. टिळक यांचे चरित्र, लक्ष्मीबाई टिळक यांचे आत्मचरित्र व तत्कालीन समाजस्थिती यांचा बोध होतो. म्हणून डॉ. भा. दि. फडके म्हणतात, 'तसे हे आत्मचरित्र तिपेडी आहे. रे. टिळकांचे मन, लक्ष्मीबाईंचे मन, आणि तत्कालीन जीवन यांचे धागे एकमेकांत मिळून गेले आहेत.' व्यक्तिरेखनातील कौशल्य, उत्कृष्ट प्रसंगनिर्मिती, खेळकर व विनोदी भाषाशैली व जीवनाकडे पाहण्याची तटस्थ वृत्ती या गुणांनी हे आत्मचरित्र नटलेले आहे. 'आधुनिक मराठी वाङ्मयात 'स्मृतिचित्रे' ही आत्मचरित्र म्हणून निरपवाद अजोड आहेत,'[५] असा डॉ. अ. ना. देशपांडे यांचा अभिप्राय आहे.

लक्ष्मीबाईंच्याही अगोदर पार्वतीबाई आठवले यांनी 'माझी कहाणी' (१९२८) हे आत्मचरित्र प्रसिद्ध केले. त्यांच्या आत्मचरित्रातून अनाथबालिकाश्रमाच्या प्रचारिका म्हणून त्यांनी केलेल्या कामाची हकीकत कळते. वयाच्या वीस वर्षांपर्यंत अपंग पतीबरोबर संसार केल्यानंतर त्यांना वैधव्य आले. वयाच्या चाळिसाव्या वर्षी अमेरिकेत जाऊन त्यांनी मोलकरणीची कामे केली व तेथे द्रव्यार्जन करून महर्षी कर्वे यांच्या संस्थेला आर्थिक सहाय्य केले. एक दुर्दैवी विधवा स्त्री संधी मिळताच किती कर्तबगारी गाजवू शकते याचा बोध पार्वतीबाईंच्या जीवनातून होतो. आपल्या जीवनाला व विचारांना अण्णासाहेब कर्वे यांनी जी दिशा दाखविली त्याबद्दल त्या कृतज्ञ आहेत. त्यांच्या मतप्रणालीत जुन्या व नव्या विचारांचा संकर आढळतो. त्यांना बालविवाहाप्रमाणे प्रेमविवाहही नकोसा वाटतो. केशवपनाच्या रूढीविरुद्ध स्त्रियांनी सत्याग्रह करावा असे त्यांना वाटते. केशवपनातील अमानुषता पटल्यावर त्यांनी पुन्हा आपले केस वाढविण्यास सुरुवात केली विवाहित स्त्रियांनी लग्नानंतरही आपला पोशाख व सौंदर्य यांच्याकडे लक्ष देऊन पतीस प्रसन्न ठेवावे, असा आधुनिक संदेश त्यांच्या आत्मचरित्रात आढळतो. तसेच मागील पिढीतील कौटुंबिक जीवनाचे दर्शनही त्यांच्या आत्मचरित्रात घडते.

आनंदीबाई ऊर्फ बाया कर्वे यांच्या 'माझे पुराण' (१९४४) या आत्मवृत्तातही समाजशास्त्राच्या अभ्यासकाला उपयुक्त अशी माहिती मिळू शकते. जुन्या पिढीतील कोकणस्थ ब्राह्मणांच्या कुटुंबातील चालीरीतींची माहिती या ग्रंथातून कळते. तथापि या ग्रंथाचा अधिक महत्त्वाचा विशेष म्हणजे आनंदीबाईंनी निःसंकोचपणाने आणि प्रांजलपणाने केलेले आत्मनिवेदन हा होय. महर्षी कर्व्यांसारख्या थोर पुरुषाची आपण पत्नी आहोत याचा अहंकार आपणास होता, अनाथ बालकांना

सांभाळण्याचे कार्य सोडून दिल्यास इतर सर्व व्यवहारांत आपण स्वार्थ पाहिला; तरुणपणी आपल्याशी पापबुद्धीने काहींनी लगट करण्याचा प्रयत्न केला– या सर्व गोष्टी त्या मनमोकळेपणाने सांगतात. विधवांच्या कल्याणाराठी स्थापन झालेल्या 'शारदा सदन' या संस्थेच्या आनंदीबाई या पहिल्या विद्यार्थिनी. लग्नापूर्वी 'शारदा सदना' मध्ये कर्वे त्यांना भेटले व म्हणाले, 'मी गरीब आहे. पंडिता रमाबाईंकडे आहे, तसे माझ्याकडे नाही. तुला जर माझी गरिबी पसंत असेल, तर तुझ्या वडिलांच्या म्हणण्याप्रमाणे तुझ्याशी लग्न करण्याची माझी तयारी आहे.'[६] हा संवाद महर्षी कर्व्यांच्या अंतःकरणावर प्रकाश पाडणारा आहे. एका थोर ऋषितुल्य समाज-सेवकाची सहचारिणी झालेली ही स्त्री पुढे अनेक अनाथ–अपंगांचा आधारस्तंभ बनली, त्यांची जीवनगाथा उलगडून दाखविणारे हे 'पुराण' त्यातील प्रांजल आत्मकथनामुळे नेहमीच रसिकप्रिय राहील.

महर्षी कर्वे यांनी स्त्री शिक्षणाच्या प्रसाराचे बहुमोल कार्य केले व त्यामुळे विद्यासंपन्न स्त्रिया आपली सुखदुःखे सांगण्यास सिद्ध झाल्या. इंग्रजी शिक्षणाने त्यांना मानसिक कोंडमाऱ्यातून मुक्ती मिळाली. फुले, आगरकर, कर्वे, शिंदे या समाज-सेवकांनी स्त्रियांना नवविचारांची दीक्षा दिली. आनंदीबाई कर्वे यांच्याप्रमाणेच डॉ. कमलाबाई देशपांडे या कर्व्यांच्या स्त्री शिक्षणकार्याशी निगडित होत्या. 'मुलींना अण्णा म्हणजे माय वाटे. अण्णांच्या आश्रमाच्या अभावी आपली काय स्थिती झाली असती ते विद्यार्थिनींना कळे व सुकून गेलेले, निर्माल्य झालेले फूल पुन्हा टवटवीत व्हावे त्याप्रमाणे आयुष्य अण्णांच्या प्रेरणेने पुन्हा विकसित होत आहे, त्यांनी आपणास जीवदान दिले आहे, असे वाटे.'[७] हे डॉ. कमलाबाईंचे मत तत्कालीन स्त्री जीवनात कर्वे यांच्या आश्रमाला किती महत्त्वाचे स्थान होते, हे दाखवून देते. 'स्मरण–साखळी' (१९४३) हे कमलाबाईंचे आत्मचरित्र स्त्री–शिक्षण संस्थेत त्यांना आलेल्या अनुभवांचे दर्शन घडविते. आरंभी काव्यमय स्वरूपाचे वाटणारे त्यांचे लेखन पुढे अहंकाराच्या दर्पाने व आत्मसमर्थनाच्या दोषाने कंटाळवाणे वाटू लागते. संस्थेतील राजकारणाचा व स्वतःवर झालेल्या अन्यायाचा अहवाल सादर केल्या-मुळे आपले निवेदन रूक्ष व नीरस ठरेल, याचे भान त्यांना राहिलेले नाही. त्यांच्या आत्मवृत्तातील पत्रे, परिशिष्टे, उतारे इ. कागदपत्रांकडे नजर टाकल्यास त्या आपली बाजू मांडण्यात कशा व्यग्र झाल्या आहेत, हे दिसून येते. अत्युच्च शिक्षण प्राप्त केलेल्या विदुषीच्या या आत्मचरित्राची अल्पशिक्षित अशा लक्ष्मीबाई टिळकांच्या 'स्मृतिचित्रां'शी तुलना केली म्हणजे वाङ्मयनिर्मितीसाठी शिक्षणाची मातबरी विशेष नाही, हे सहज पटते.

डॉ. कमलाबाई देशपांडे यांच्या मानाने कमी शिक्षण लाभलेल्या लीलाबाई पटवर्धन यांनी लिहिलेले 'आमची अकरा वर्षे' (१९४५) हे आत्मचरित्र मात्र खूपच सरस उतरले आहे. माधवराव पटवर्धनांसारख्या एका थोर कवीची पत्नी

होण्याचे भाग्य लाभल्याबद्दल लीलाबाईंना धन्यता वाटते. तथापि माधवरावांच्या व्यक्तिमत्त्वाचे यथार्थ व वस्तुनिष्ठ दर्शन घडविण्यात त्यांच्या पतिप्रेमाने कोणतीच बाधा आणलेली नाही, माधवरावांचा लहरी स्वभाव, त्यांच्या अंगात येणारा 'वेताळ', त्यांचा प्रारंभीचा एकलकोंडेपणा व घरात मुलांची चिवचिव सुरू झाल्यावर त्यात झालेले परिवर्तन, या सर्व लहान-लहान बाबीतून त्यांनी माधवरावांचे चित्र रेखाटले आहे. माधवरावांच्या काही कवितांचा जन्म कसा झाला, हेही त्यांनी सांगितले आहे. माधवरावांच्या सहवासात व्यतीत केलेल्या अकरा वर्षांची ही कहाणी अत्यंत हृद्य व वाचनीय आहे.

१९५० पर्यन्तच्या कालखंडात स्त्रियांनी लिहिलेल्या आत्मचरित्रांत अन्नपूर्णाबाई रानडे यांचे 'स्मृतितरंग' (१९४७) व ग्वाल्हेरच्या इंदिराबाई भागवत यांच्या 'या सदाशिव' (१९४८) या दोन अतिसामान्य आत्मचरित्रांचाही समावेश करावा लागेल.

मराठीतील पुरुषांनी लिहिलेल्या व स्त्रियांनी लिहिलेल्या आत्मचरित्र वाङ्मयाकडे नजर टाकली असता एक गोष्ट सहज लक्षात येते की पुरुषांचे अनुभव-विश्व हे स्त्रियांच्या अनुभव-विश्वापेक्षा व्यापक व विशाल आहे. ते अनेक पदरी आहे. स्त्रियांचे 'घर हेच जग' असल्याने पती हाच त्यांच्या जीवनातील केंद्रीभूत व्यक्ती आहे. व तिचे महत्त्व त्यांना स्वत:हूनही अधिक वाटते. म्हणूनच स्त्रियांच्या आत्मचरित्रांचे स्वरूप बव्हंशी पतिचरित्राचे आहे; असे दिसून येते. या आत्मचरित्रांच्या लेखिका पतिपरायण स्त्रिया होत्या व त्यांनी आपले जीवन आपल्या पतीच्या सुखदु:खात, त्यांच्या ध्येयवादात झोकून दिले होते. पतीबरोबर व्यतीत केलेल्या सहजीवनाच्या कथा रंगविताना रमाबाई, लक्ष्मीबाई, आनंदीबाई व लीलाबाई यशस्वी झाल्या आहेत व वाचकांच्या डोळ्यांसमोर न्या. रानडे- रमाबाई, रेव्ह. टिळक-लक्ष्मीबाई, महर्षी कर्वे, आनंदीबाई-माधव जुलियन-लीलाबाई या दंपती यामुळेच साकार झाल्या आहेत. केवळ स्वत:चेच जीवन रंगविण्याचा जेथे प्रयत्न झाला ती 'स्मरण साखळी,' 'माझी कहाणी' ही आत्मचरित्रे यशस्वी झालीं नाहीत.

पुरुषांच्या आत्मचरित्रांत समाजस्थितीचे चित्रणही अधिक आले आहे, स्त्रियांच्या आत्मचरित्रांत घरगुती. तात्यासाहेब केळकर, स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या आत्मचरित्रात हे दिसून येते.

जीवनातील सुखदु:खाशिवाय इतर वर्णने फारशी आढळत नाहीत. अर्थात याला संस्कृतीच कारणीभूत आहे. पुरुषप्रधान संस्कृतीत स्त्री बंधनात जखडली असून तिला दुय्यम स्थान प्राप्त झाले आहे. म्हणून पुरुषांच्या आत्मचरित्राचे स्वरूप मोकळ्या जागेतील वृक्षासारखे तर स्त्रियांच्या आत्मचरित्राचे स्वरूप कुंडीत लावलेल्या फुलझाडासारखे वाटते. ही फुलझाडे दिसावयास मोहक असली तरी त्यांचा जीव मात्र लहान असतो.

लक्ष्मीबाई टिळकांचे 'स्मृतिचित्रे' हे या कालखंडातीलच नव्हे तर एकंदर मराठी वाङ्मयातील आत्मचरित्राच्या दालनातील सर्वोत्कृष्ट आत्मचरित्र मानले जाते. 'स्मृतिचित्रे' म्हणजे साहित्य– 'लक्ष्मी' ने मराठीच्या आत्मचरित्रात्मक वाङ्मयाच्या अंगावर घातलेला एक बहुमोल दागिना आहे.' [८] असा 'स्मृतिचित्रां' चा गौरव अ. ना. देशपांडे यांनी केला आहे. पतिचरित्राबरोबरच स्वतःचेही चरित्र कथन करण्यात व इतर व्यक्तिरेखांबरोबरच स्वतःचीही अविस्मरणीय अशी व्यक्ति-रेखा अकृत्रिमपणे रंगविण्यात व आपले आत्मचरित्र सर्व रसांनी सिद्ध करण्यात केवळ लक्ष्मीबाईच यशस्वी झाल्या आहेत, असे म्हणावे लागेल.

स्मृतिचित्रांचे वाङ्मयीन स्वरूप

१. स्मृतिचित्रांची रचना

आपले पती रेव्ह. नारायण वामन टिळक यांच्या 'माझे चरित्र लिहायचे झाले तर ते घडले तसे लिहा' [९] या अंतिम इच्छेनुसार लक्ष्मीबाईंनी पतीचे चरित्र म्हणून स्मृतिचित्रांचे लेखन केले. ९ मे १९१९ रोजी टिळकांचे निधन झाले व १९२० साली बाईंनी स्मृतिचित्रांच्या लेखनास आरंभ केला. लक्ष्मीबाईंच्या शिरा-वरील संसाराचे ओझे त्यांच्या सुनेने आपल्या शिरावर घेतल्यामुळे त्यांना हे लेखन करण्यास उसंत मिळाली. फावल्या वेळातील विरंगुळा म्हणूनही या आठवणी लिहिल्या गेल्या. 'स्वतःच्या करमणुकीकरता मी माझ्या आठवणी लिहू लागले' [१०] असे लक्ष्मीबाई म्हणतात. देवदत्त टिळकांनाही आपल्या वडिलांचे चरित्र लिहावयाचे होते, म्हणून त्यांनीही आपल्या आईला–लक्ष्मीबाईंना या आठवणी लिहिण्यास प्रोत्साहन दिले. या आठवणी पुढे योगायोगाने श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांनी वाचल्या व त्यांना ते लेखन कादंबरीसदृश वाटले. 'या आठवणी अवश्य छापा. फारच सुंदर आहेत' [११] अशी त्यांनी बाईंना सूचना केली. तात्यासाहेब कोल्हटकरांचे पुत्र बापूराव कोल्हटकर यांनी 'संजीवनी' हे पत्र सुरू केल्यानंतर त्यात या आठवणी प्रसिद्ध होऊ लागल्या व हा अनमोल खजिना महाराष्ट्राच्या हाती लागला. लक्ष्मीबाईंनी 'स्मृतिचित्रां' मध्ये आपल्या बालपणापासून ते रे. टिळकांच्या मृत्यूपर्यंतची हकीकत आठवणीरूपाने सांगितली आहे. रेव्ह. टिळकांच्या धर्मान्तरापर्यंतची स्मृतिचित्रे पहिल्या भागात, त्यांच्या दीक्षेपर्यंतची दुसऱ्या भागात, त्यांच्या मृत्यूपर्यंतची तिसऱ्या भागात व लक्ष्मीबाईंच्या निधनाअगोदरपर्यंतची चौथ्या भागात अशी स्मृतिचित्रांची रचना आहे. लक्ष्मीबाईंनी चौथ्या खंडातील फक्त ११ प्रकरणे लिहिली असून त्यांच्या आत्मचरित्राला त्यांच्या मृत्यूपर्यंतच्या चरित्राची पुरवणी जोडून देवदत्त नारायण टिळक यांनी स्मृतिचित्रांना पूर्णता प्राप्त करून दिली आहे. १५ डिसेंबर १९३४ ला स्मृतिचित्रांचा पहिला भाग लिहून झाला. १५ डिसेंबर १९३५ पर्यंत तीन भागांचे लेखन झाले व १९३६ साली स्मृतिचित्रांचे लेखन पूर्ण झाले. स्मृति-

चित्रांच्या तिसऱ्या भागाच्या प्रकाशन समयीच म्हणजे १५ डिसेंबर १९३५ ला लक्ष्मीबाई टिळकांचा सत्कार आचार्य अत्रे यांच्या अध्यक्षतेखाली नाशिक येथील सर्कल थिएटरमध्ये झाला व आचार्यांनी त्यांना 'साहित्यलक्ष्मी' ही सार्थ पदवी दिली.

२. समाजदर्शन

'स्मृतिचित्रे' हा लक्ष्मीबाईंचा ना. वा टिळकांबरोबर व्यतीत केलेल्या सहजीवनाचा जसा इतिहास आहे तसाच तो १८७३ ते १९३६ या काळातील महाराष्ट्राच्या सामाजिक आणि सांस्कृतिक जीवनाचाही स्थूल इतिहास आहे. या कालखंडातील महाराष्ट्रातील कुटुंबसंस्था, शिक्षण, विवाहपद्धती, दांपत्य संबंध, सामाजिक जीवन व प्रबोधन यांच्या विकासाच्या अभ्यासासही हे आत्मचरित्र आधारभूत ठरू शकते.

गंगाधर गाडगीळ म्हणतात, 'तत्कालीन समाजस्थितीचेही तपशीलवार चित्रण स्मृतिचित्रात आढळते...तेव्हाचे कौटुंबिक जीवन, कुटुंबातील माणसांत असलेले अत्यंत जिव्हाळ्याचे संबंध, परस्परांच्या मदतीला उभे राहण्याची तेव्हाची वृत्ती, समाजातल्या वेगवेगळ्या वर्गाचे परस्परसंबंध आणि मुख्य म्हणजे त्या काळातील स्त्रीजीवन याविषयी कितीतरी माहिती अनेक बारकाव्यांसहित लक्ष्मीबाईंनी दिली आहे.'[१२] लक्ष्मीबाईंची तीव्र स्मरणशक्ती, त्यांचा परखड व प्रांजल स्वभाव यामुळे स्मृतिचित्रांचे इतिहास म्हणून मोल फार मोठे आहे. ख्रिस्ती धर्म व हिंदू धर्म यांच्यातील संघर्ष, तत्कालीन धार्मिक कल्पना, यांचे त्यांनी उद्‌बोधक चित्र रेखाटले आहे. आपल्या वडिलांना झालेल्या सोवळ्याची जी हकीकत त्यांनी सांगितली आहे तीतून तत्कालीन समाजमनावर वर्चस्व गाजविणाऱ्या सोवळ्या-ओवळ्याच्या कल्पनांचेही दर्शन घडते. नानांना-लक्ष्मीबाईंच्या वडिलांना हे सोवळे कसे झाले होते, हे त्यांच्या मुखातून ऐकणेच योग्य. 'मी तपोवनात गेलो होतो. तेथे एक महार तोंड धूत होता आणि त्याचा शितोडा माझ्या अंगावर उडाला. मला त्याचा विटाळ झाला.'[१३] १८५७-५८ साली नानांना झालेला हा विटाळ त्यांच्या अंतापर्यंत म्हणजे पंचवीस-सव्वीस वर्षे टिकला. बाहेरून घरात येणारी प्रत्येक जिन्नस, अगदी अन्नधान्य, तेल, तूप, मीठ, गूळ, साखर धुऊन घरात घ्यावी असा त्यांचा दंडक असे! या त्यांच्या जाचक नियमामुळे सर्व घरदारच काय पण सारा गावदेखील कसा त्रासून गेला होता, याचे हृद्य वर्णन लक्ष्मीबाईंनी केले आहे.

तत्कालीन एकत्र कुटुंबपद्धतीचे चित्रही स्मृतिचित्रात आढळते. त्या काळातील स्वस्ताई, अन्नधान्याची विपुलता यामुळे उपजीविका चालविणे कठीण पडत नसे. परगावी राहणाऱ्या व्यक्तीस दहा रुपये मासिक खर्च पाठविला, तर त्यात त्याचे सहज भागत असे. विपुल संतती किंवा कुटुंबनियोजनाचा अभाव हे त्या काळाचे एक वैशिष्ट्य मानावे लागेल. 'मला एकंदर पाच भावंडे होती. तशीं झाली पुष्कळ, पण जगली पाच.'[१४] हे लक्ष्मीबाईंचे विधान यादृष्टीने सूचक मानावे लागेल.

हिंदु समाजात असणाऱ्या हुंडा पद्धतीला विरोध करून टिळकांच्या लग्नात त्यांच्या वडिलांनी–वामनरावांनी हुंडा घेतला नाही. 'मी हुंडा घेऊन आपल्या मुलाला विकणार नाही' [१५] असे त्यांनी वधूपक्षाला कळविले होते. तथापि गणगोत्र–पत्रिका पाहणे, टिपण जुळणे याला ते फार महत्त्व देत. 'टिपण मात्र चांगले जुळले पाहिजे' [१६] असेही त्यांनी वधूपक्षाला कळविले होते व त्यानुसारच लग्न ठरले. लग्नात गोखले व टिळक यांच्या भिन्न गोत्रामुळे निर्माण झालेली अडचण शास्त्राधाराप्रमाणे दत्तकविधानाच्या मार्गाने सोडविण्यात आली. लग्नामध्ये गावजेवण देण्यात आले. सुपाऱ्या खेळणे, गुळण्या टाकणे, घास घालणे वगैरे रूढ प्रकार भोजनप्रसंगी पार पाडण्यात आले.

सासुरवासाचे विविध प्रकारही या आत्मचरित्रातून दिसून येतात. टिळकांचे वडील वामनराव यांनी लक्ष्मीबाईंना खूपच त्रास दिला. दुपारी पुरुषांची जेवणे झाली की लक्ष्मीबाई जेवायला बसत पण वामनराव त्यांना शेणगोळा टाकण्यासाठी, कचरा टाकण्यासाठी किंवा तुळशीला पाणी घालण्यासाठी पुनःपुन्हा उठवीत. ते म्हणत, 'तुम्हाला जेवणाची कशी आठवण राहते? जेवला नाही तर मराल का? आणि मेलात तर तुमच्यावाचून जग ओस पडेल का?' [१७] असा कार्यक्रम रोज, दुपारी होई. रात्रीही ते लक्ष्मीबाईंना लवकर जेवू देत नसत. लक्ष्मीबाई जेवायला बसल्या की वामनराव त्यांना हाक मारून बिछाना टाकायला लावीत. त्यानंतर त्या पुन्हा जेवायला बसत. एकदा त्यांनी घासलेल्या भांड्यांना डाग राहिले होते म्हणून वामनरावांनी भांडी खाली फेकली व आपल्या सुनेचा व मुलाचा पुढील शब्दांत उद्धार केला. 'माझी सून मेली तिचा आज बारावा आहे, माझा मुलगा मेला; त्याला तिलांजली देतो.' [१८] लक्ष्मीबाईंना कोकणातले पदार्थ करता येत नसत व त्यावरूनही वामनराव त्यांना खूप रागावत. आमटीला जिवंत फोडणी देता येत नाही किंवा तांदळाच्या भाकऱ्या व पेजबुडच्या भात करता येत नाही म्हणून त्यांचा लक्ष्मीबाईंवर कोप होत असे. वामनरावांनी आपल्या गर्भारशी पत्नीला लाकडे फोडायला लावली होती व तिचा शेवटही त्यांनी लाथ मारून खाली पाडल्यामुळे झाला होता, तेव्हा लक्ष्मीबाईंचा त्यांच्यापुढे काय पाड? पुढे पुढे तर ते आपल्या मुलाला दुसरी बायको कर म्हणून आग्रह करू लागले. यावरून त्या काळातील सासुरवाशिणी स्त्रियांच्या हालअपेष्टांची व त्यांना दासी मानून गुलामगिरीत ठेवणाऱ्या समाजाच्या प्रतिगामी दृष्टिकोणाची कल्पना येते. 'रांधा–वाढा उष्टी काढा' हेच स्त्रीच्या नशिबी लिहिलेले होते. समाजात पुरुष श्रेष्ठ व स्त्री कनिष्ठ अशी व्यवस्था असल्यामुळे स्त्रीच्या पदरी कष्टमय व अपमानित जिणे आले होते. सर्वस्वी पराधीन, अस्तित्वहीन, समर्पित जिणे हे स्त्रीचे लेणे!' [१९] अशा समर्पक शब्दांत सौ. प्रतिभा ठिपसे यांनी तत्कालीन स्त्री–जीवनाचे वर्णन केले आहे.

तत्कालीन समाजामध्ये रूढी व अंधश्रद्धा यांचे प्राबल्य आढळते. देवी अंगात

येणे, असे प्रकार लोकांच्या भाबडेपणामुळे व अज्ञानामुळे प्रचलित होते. लक्ष्मीबाईंचे सासरे वामनराव यांच्या अंधश्रद्धेवर प्रकाश टाकताना लक्ष्मीबाई म्हणतात, 'भुते खेते, जादूटोणा, अंगात येणे, पायगुण, ग्रह, टिपण, हातापायांच्या बोटांची लांबी-रुंदी, हचा गोष्टीवर त्यांची माणसाविषयीची आवडनिवड अवलंबून असे. त्यांच्या अंगात येणारी देवी तर त्यांचे फारच आवडते दैवत.[२०] एके दिवशी या देवीने त्यांना सांगितले, 'आता जी मुलगी सून झाली आहे ती फार वाईट पायगुणाची आहे. हिच्यामुळे घरात सुख व शांती नांदणार नाही.'[२१] देवीच्या या प्रलापामुळेच पुढे वामनरावांनी लक्ष्मीबाईंचा छळ केला.

हिंदुधर्माविषयीचा अभिमान हेही त्या काळाचे वैशिष्ट्य मानावे लागेल. या अभिमानापोटीच अन्य धर्मीय लोकांबद्दल विशेषत: ख्रिस्ती लोकांबद्दल तिरस्काराची भावना समाजात निर्माण झाली होती. टिळकांच्या आईकडे मिशनरी मडमा येत व त्या तिला शिवणकामाचे शिक्षण देत, हे वामनरावांना आवडत नसे. या मडमांनी तिला वाचायला दिलेले बायबलमधील नीतीचे पुस्तक वामनरावांनी जाळून टाकले. पुढे टिळकांनी धर्मांतर केले (१८९५) व सारा समाज ढवळून निघाला. टिळकांनी ख्रिस्ती व्हावे म्हणून ख्रिस्ती धर्मप्रचारक त्यांना प्रलोभने दाखवीत तर त्यांनी ख्रिस्ती होऊ नये म्हणून नागपूरकर आप्पासाहेब बुटी त्यांना 'मी तुम्हास शंभर रुपये तुमच्या हयातीपर्यंत देतो, घर देतो व दत्तूची विद्या करतो.'[२२] असे सांगून धर्मांतरापासून परावृत्त करण्याचा प्रयत्न करीत. ख्रिस्ती धर्मीयांची धर्मप्रसाराची व हिंदू धर्मीयांची धर्मरक्षणाची भूमिका येथे दिसून येते.

ख्रिस्ती धर्मीयांची टवाळी करणे, ख्रिस्ती धर्म व त्यातील विधी याबद्दल कुत्सितपणे बोलणे असे प्रकारही त्यावेळी हिंदुधर्माभिमानी लोकांच्या हातून घडत असत. वाईमध्ये गणेशोत्सवामध्ये व्याख्यान देणाऱ्या टिळकांना एकाने 'काय हो, तुमच्यात बाप तीस व मा एक असते नाही का ?[२३] असा प्रश्न बाप्तिस्मा' या शब्दावर कोटी करीत विचारला होता.

टिळक ख्रिस्ती झाल्यावर हिंदू समाजाने त्यांच्यावर जवळजवळ बहिष्कार टाकला होता. टिळक व लक्ष्मीबाई अहमदनगर येथे वेगळे बिऱ्हाड करून राहू लागल्यानंतर त्यांच्याकडे काम करणाऱ्या मोलकरणीला लोकांनी काम सोडायला लावले व त्यांच्याकडे पाणी भरणाऱ्या गुजराथ्याला तर प्रायश्चित्त घेण्यास भाग पाडले. त्यांच्या घरमालकिणीनेही त्यांना निरोप पाठविला की, तुम्ही आमच्या पायखान्यात जायचे नाही ! ...सार्वजनिक पायखान्यात जा.'[२४] धर्मांतरितांसाठी पायखानेही कर्मठ झाले ! शेवटी डॉ. हचूमसाहेबांनी फर्ग्युसन गेट कम्पाउन्डमधील ख्रिस्ती वस्तीत त्यांना जागा दिली. अशा प्रकारचे हाल सहन करीत टिळक दांपत्याला बराच काळ कंठावा लागला.

'स्मृतिचित्रा'तून अशाप्रकारे समाजस्थितीचे वर्णन आढळत असले तरी

लक्ष्मीबाईंनी ते जाणीवपूर्वक दिलेले नाही. समाजस्थितीविषयक लक्ष्मीबाईंनी दिलेली माहिती अगदी सहजगत्या या ग्रंथात आलेली आहे. गंगाधर गाडगीळ यांचे या संदर्भातील विधान अत्यंत मार्मिक आहे. ते म्हणतात, 'खरे म्हणजे लक्ष्मीबाईंनी जी दिली आहे ती मुळी माहिती नव्हेच ! त्यांचे सारे अनुभवाचे विश्वच स्मृति,-चित्रात प्रकट झाले आहे. आणि अनुभवात अपरिहार्यपणे माहिती विरघळलेली असते. म्हणूनच स्मृतिचित्रात माहिती देखील आहे.' [२५] 'स्मृतिचित्रा 'त आलेले समाजदर्शन उद्‌बोधक असले तरी त्यामुळे त्यांच्या कलात्मकतेला कोणतीही बाधा आलेली नाही, हे लक्ष्मीबाईंच्या लेखणीचे मोठेच यश मानावे लागेल. समाज-दर्शनाच्या या अभ्यासामुळे 'स्मृतिचित्रा 'तील व्यक्तींच्या मनोभूमिकेचे आकलन होण्यास बरीच मदत होते.

३. प्रसंगनिर्मिती

आत्मचरित्र ही वास्तव जीवनाची कहाणी असते. आत्मचरित्रकार आपल्या जीवनात घडलेल्या विविध प्रसंगांचे वर्णन करून आपल्या जीवन नाट्याची कल्पना वाचकास देत असतो. लक्ष्मीबाई टिळकांनीही त्यांच्या जीवनातील अनेकविध प्रसंग 'स्मृतिचित्रा' त वर्णिलेले आहेत. 'स्मृतिचित्रे' ही एका दृष्टीने अनेक प्रसंगांची मालिकाच आहे. जीवनातील नाट्य हेरण्याची प्रतिभा त्यांच्याजवळ असल्याने अनेक नाट्यपूर्ण प्रसंगाची निर्मिती त्यांनी आपल्या आत्मचरित्रात केली आहे. हे सर्व प्रसंग टिळक व लक्ष्मीबाई या दांपत्याच्या स्वभाव–वैशिष्ट्यातून निर्माण झालेले आहेत. या प्रसंगाचे चित्रण आपल्या ओघवती शैलीत व विनोदबुद्धीची जोड देऊन त्यांनी केले असल्यामुळे या सर्व प्रसंगनिर्मितीवर प्रसन्नतेचा व निरागसतेचा ठसा उमटलेला आहे.

आपल्या आयुष्यातील विचित्र व मजेदार योगायोगाचें एक उदाहरण म्हणून त्यांनी मैत्रिणीच्या घरी टिळकांनी आपणास कसा दम दिला (तंगडीच मोडीन), पुढे आपण त्याच घरात कसे पाय रोवून उभे राहिलो, याचें मिस्किलपणे वर्णन केले आहे. हा प्रसंग तसा साधाच आहे. पण लक्ष्मीबाई व रेव्ह. टिळक यांच्या जीवनाच्या संदर्भात तो पाहिला म्हणजे आशयघन बनतो. त्यांच्या सहजीवनाचे ते रूपकच आहे, असे वाटू लागते.

आपल्या सासूसासऱ्यांविषयी लिहितांना त्यांनी एका करुण प्रसंगाचे अत्यंत मोजक्या पण प्रभावी शब्दांत वर्णन केले आहे. आपला नवरा आजारी आहे म्हणून उन्हातान्हातून कित्येक मैल चालत आलेल्या टिळकांच्या आईस वामनराव लाथ मारतात व त्यानंतर आठ दिवस अंथरूणास खिळून तोंडात पाण्याशिवाय काही न घेता ती साध्वी प्राण सोडते, हा प्रसंग काळीज हेलावून टाकणारा आहे.

मुंबईत टिळकाबरोबर राहावयास गेलेली मनू (लक्ष्मीबाईचे माहेरचे नाव)

जरा काही आवाज झाला की धावत गॅलरीत जाऊन बाहेर टकामका पाहत असते व त्याचवेळी पत्ता माहीत नसल्यामुळे मनूचा शोध घेत मुंबईभर वणवण हिंडणाऱ्या गोविंदराव मामाशी तिची अचानक दृष्टादृष्ट होते, हा प्रसंग एखाद्या विनोदी चित्रपटात साजेसा असा आहे. त्याचबरोबर मनूच्या ओढीने गोविंदराव मामांना वणवण फिरावे लागते याचें वाचकांना दुःख होते

सोंगटयांच्या खेळाचेही त्यांनी मोठे बहारीचे वर्णन केले आहे. टिळकांवर डाव उलटू लागला की ते चिडत. अशावेळी लक्ष्मीबाईंना खूप हसू येई. टिळक रागावले की त्या जास्तच हसू लागत, अशा एका प्रसंगाचे वर्णन त्यांनी पुढील शब्दांत केले आहे. 'सोंगटया, पट, फासे थर थर कापू लागली. काहीनी खालील गटाराचा आश्रय केला. घातलेले बिछाने घरात सैरावैरा धावू लागले. सगळ्या सामानाने बंड पुकारले. जागच्या जागी काही राहिले असेल तर ते फक्त बायको व दिवा! प्रकरण इतके हातघाईवर आले, की शेवटी दिव्यानेही राम म्हटले. आगपेटी केव्हाच पासोडीचा आसरा करून बिछान्याच्या ढिगाऱ्यात तोंड लपवून बसली होती. तरी मला वाटत होती गंमत. मी आणखी जोरजोराने हसू लागले.

आता त्या युद्धकांडातील शेवटचा भाग. जिन्याला नव्हते दार! टिळकांनी मला अंधारात लोटले. मी जिन्यातून 'घालीन लोटांगण वंदीन चरण' करीत खाली तबकडीत येऊन पडले. टिळकांचा राग मावळला व माझे हास्य पळाले.' [२६] असे वर्णन करून शेवटी त्या अगदी सहजपणे म्हणतात, 'मला तो सातवा महिना होता.' ही शेवटची कलाटणी पती-पत्नींच्या पोरकट भांडणाला एक वेगळाच अर्थ प्राप्त करून देते. त्याबरोबर पती-पत्नीतील विकासशील संबंधातील एक महत्त्वाचा टप्पा म्हणूनही वाचक या प्रसंगाची नोंद घेतात.

लक्ष्मीबाईंच्या पेंडशांकडील मुक्कामात त्या उतरल्या त्या वाडयाची भुताखेतासाठी प्रसिद्धी होती. रात्रीच्या वेळी मनूचा शोध घेण्यासाठी अंधारात हातात दिवा घेऊन आलेली त्यांची बहीण भिकूताई व त्यावेळी तबेल्यातून ऐकू येणारा धपधप आवाज ऐकून लक्ष्मीबाईची भीतीने गाळण उडते, तो प्रसंग अत्यंत हास्यकारक आहे.

टिळक लक्ष्मीबाईंना शिकवीत असताना लक्ष्मीबाईंना 'शब्द म्हणजे काय?' [२७] या टिळकांच्या प्रश्नाचे उत्तर देता आले नाही. टिळक संतापले व त्यांनी सारी पुस्तके फाडून टाकली. या प्रसंगाचे वर्णन त्यांच्याच शब्दांत वाचण्यासारखे आहे–

"टिळक म्हणाले, शब्द म्हणजे काय?'

... "शब्द म्हणजे शब्द." मी उत्तर केले.

"पण शब्द म्हणजे काय?"

"शब्द म्हणजे शब्द!"

"पण शब्द म्हणजे काय?"

पुन्हा माझे आपले शब्द म्हणजे शब्दच ठेवलेले. झाले! टिळक खूप संतापले. ते संतापत तसतशी मी हसू लागे. तसतसे ते आणखी संतापत.

शेवटी संतापाग्नीने व माझ्या हास्याच्या वायूने मोठा भडका उडाला. तो भडका होताच पुस्तकांचा भडका उडाला ! टिळकांनी सारी पुस्तके टराटर फाडून टाकली, व त्या चिंध्याच्या ढिगाऱ्याला काडी पेटवून लावून दिली ! ' [२७] इतके वर्णन करून त्या म्हणतात, "हा आमचा पहिल्या दिवसाचा 'अभ्यास.'" या प्रसंगातून टिळकांना आपल्या पत्नीला शिकविण्याविषयी असलेल्या तळमळीचे व लक्ष्मीबाईंच्या निरागस मनाचे दर्शन होते. नेहमीच्या पद्धतीने लक्ष्मीबाईंनी या प्रसंगालाही विनोदाची डूब दिली आहे.

मृत्युशय्येवर असणाऱ्या टिळकांच्या मनःस्थितीचेही त्यांनी धीरोदात्तपणे चित्रण केले आहे. लक्ष्मीबाईंशी झालेल्या शेवटच्या भेटीत टिळक म्हणाले, ' मी आता बरा आहे. लौकरच बरा होईन. काळजी करू नको. मला माझी दोन मोठाली कामे अजून करावयाची आहेत. ख्रिस्तायन व देवाचा दरबार. माझे आवडते गाणे कोणते आहे सांग पाहू ? ' असे म्हणून त्यांनी– ' शत्रु गराडा घालून बसले ! बसोत त्यांना कोण पुसे ' या गीताची आठवण करून दिली. व ' १९१९ साल हे लक्षात ठेवण्यासारखे होणार आहे. ' असे सूचक उद्‌गार काढले. लक्ष्मीबाई म्हणतात, ' हा मला उपदेश आहे हे मी ओळखले. माझे अंतःकरण भडभडून आले. व माझे ओले डोळे त्यांच्या दृष्टीस पडू नयेत म्हणून मी हळूच बाहेर आले व मनसोक्त रडले. ' [२८] या करुण प्रसंगावर गांभार्याची व उदात्ततेची छाया पसरलेली आहे.

आईने मारुतीला वडयांची माळ अर्पण करावयास दिली असता ती स्वतःच खाऊन टाकणारे टिळक अखेर ईश्वराचे परमभक्त बनतात. मला आहो–जाहो का म्हणत नाही म्हणून भांडणारे बालकवी लक्ष्मीबाईंनी आपणास ' हत मूर्खा ' म्हणावे म्हणून हट्ट धरतात. आपली विहीण कोठे मेली ते मुद्दाम पाहून आलेली लक्ष्मीबाईंची आई तशाच दुखण्याने पुढे जवळच्या गावात निधन पावते. हे सर्व संवाद–विरोधाची नाती सांगणारे प्रसंग स्मृतिचित्रांना रंगत आणतात.

लक्ष्मीबाईंनी आपल्या जीवनातील सुखदुःखाचे, रागा–लोभाचे व हास्य–रूदनाचे प्रसंग उत्कृष्टपणे टिपले आहेत. या प्रसंगाचे वर्णन करताना त्या कुठेही भाष्य करीत नाहीत. ' झाले गेले आता काय त्याचे ' या दृष्टीनेच त्या गतायुष्यातील घटनांकडे पाहतात व म्हणूनच अगदी तटस्थपणे पण समरसून प्रत्येक प्रसंगाचे वर्णन करतात. आपल्या जीवनातील घटनांचा चित्रपट त्या वाचकांपुढे अगदी निःसंकोचपणे सादर करतात. या सर्व भावनोत्कट व नाट्यात्मक प्रसंगांच्या आधारे लक्ष्मीबाईंनी ' स्मृतिचित्रां 'तील व्यक्तिरेखांना जिवंत केले आहे.

४. भाषाशैली

एखाद्या कलाकृतीचे यश तीतील आशयाप्रमाणेच शैलीवरही अवलंबून असते. त्या त्या प्रसंगाला व रसाला अनुकूल असे अर्थवाहक व ध्वनिवाहक शब्द व वाक्ये यांची योजना लेखकाने केली म्हणजे शैलीचे माधुर्य निर्माण होते. हे शैलीचे माधुर्य आपणास लक्ष्मीबाईंच्या लेखनात आढळते, '...भाषाशैली', 'भाषाशैली', म्हणून ज्याला आपण म्हणतो ते दुसरे काही नसून भाषेतला सहजपणा होय,'[२९] हे प्रा. ना. सी. फडके यांचे विधान लक्ष्मीबाईंच्या भाषाशैलीस समर्पकपणे लागू पडते. 'स्मृतिचित्रां'तील भाषाशैली हे 'स्मृतिचित्रां'चे एक विलोभनीय वैशिष्ट्य असून त्यातील आशयाचे सौंदर्य लक्ष्मीबाईंच्या मार्मिक शैलीमुळे अधिक वाढले आहे. शैली ही लेखकाच्या व्यक्तिमत्त्वाचेच एक अंग असते म्हणून 'स्मृतिचित्रां'तून लक्ष्मीबाईंच्या व्यक्तिमत्त्वाचाच आविष्कार होतो.

लक्ष्मीबाईंनी आपल्या जीवनातील विविध आठवणी विविध प्रसंगांच्या आधारे सांगितल्या आहेत. 'स्मृतिचित्रां'तील प्रसंगनिर्मिती हा म्हणूनच लक्ष्मीबाईंच्या व्यक्तिमत्वाचाच एक विशेष आहे. नानांची खोडकी मोडण्यासाठी गंगेवर जीव देण्याचा बालपणातील प्रसंग जितक्या आकर्षकपणे त्या रंगवतात, तितक्याच व्याकूळतेने टिळकांच्या धर्मांतरानंतरच्या स्वतःच्या दयनीय अवस्थेचे चित्रण करतात. दत्तूसाठी दूध किंवा भात मागण्याचा अपमानास्पद प्रसंग व टिळकांनी धान्याऐवजी काचेची सुंदर दौत आणल्याचा उद्वेगजनक प्रसंग त्या तितक्याच उत्कटतेने रंगवितात– 'आता का ही दौत शिजत घालू!' या एकाच वाक्यातून त्यांच्या मनाची तगमग त्या सहजपणे अभिव्यक्त करतात.

निवेदनचातुर्य हा लक्ष्मीबाईंचा एक विशेष आहे. गतकाळातील गोष्टीकडे त्या अलिप्तपणाने पाहतात. आपल्या निवेदनाला त्या विनोदाची जोड देतात. त्यांचा विनोद हा दुखविणारा नसून सुखविणारा आहे. मामंजींच्या अंगात देवीचा संचार होत असे, हे सांगताना त्या म्हणतात, 'बहुत करून एखाद्या आठवड्यात मामंजींच्या मनाविरुद्ध आमच्यापैकी कोणाचे वर्तन घडले, की देवी त्या शुक्रवारी हटकून आमच्याविरुद्ध आकांडतांडव करायची.'[३०]

'जिवंत' फोडणीची त्यांनी सांगितलेली कथा अगदी चटकदार आहे. मामंजींच्या पूजेच्या उपकरणांना नेहमी डाग पडत. त्याचे कारण सांगताना त्या म्हणतात, 'उपकरणी होती तांब्याची, पाणी विहिरीचे, राख लाकडाची व दिवस पावसाचे.'[३१] अलंकारांची माहिती नसतानाही अशी अनुप्रासात्मक वाक्ये त्या सहज लिहून जातात. मामंजी संतापाने उपकरणी फेकू लागतात. व स्वतःच्या पायाची शपथ घेण्यास ते लक्ष्मीबाईंना सांगतात. त्याचबरोबर पायांना स्पर्श केल्यास 'तू जळून जाशील अशी भाषा ते वापरतात. त्यावर लक्ष्मीबाई म्हणतात, 'शेवटी पालथी

पडले व त्यांचे पाय गच्च धरले. मी काही जळून मेले नाही. मोठी निराशा झाली माझी. एकदाची मरून गेले असते तर बरे झाले असते, असे मलाही झाले होते. पण मामंजीची तेवढी तपश्चर्या नव्हती म्हणा, किंवा मी उपकरणी खरोखरच घासली होती म्हणा, मी त्या दिवशी जळाले काही नाही!'[३२] भिकूताईंकडे हडळ पाहिल्याचा प्रसंगही त्यांनी मोठ्या विनोदी पद्धतीने वर्णिला आहे.

अगदी साध्या व मोजक्या शब्दात आत्मकथन करण्याची त्यांची लेखनशैली त्यांच्या लिखाणाला नाट्यात्मकता प्राप्त करून देते. लक्ष्मीबाईंनी जातिभेद न पाळण्याचा निर्णय घेतल्यावर टिळकांची प्रतिक्रिया सांगताना लक्ष्मीबाई लिहितात, "थँक गॉड."[३३] या दोन शब्दांत त्या टिळकांच्या मानसिक जगाचे दर्शन घडवितात. टिळक व लक्ष्मीबाईंच्या सहजीवनावर प्रकाश टाकणारे पुढील वाक्यही असेच मार्मिक आहे. लक्ष्मीबाई लिहितात, "त्यांनी लग्नाच्या वेळी फिकिरीची माळ माझ्या गळ्यात घातली होती व मी बेफिकिरीची माळ त्यांच्या गळ्यात घातली होती."[३४] 'मी लंकेची पार्वती व टिळक कफल्लक शंकर' हे वाक्यही त्यांच्या प्रपंचाचे दर्शन घडविते. नाशिक स्टेशनवर टिळकांची गाडी चुकल्यावर 'मी आपली मिटी मिटी पाहत उभी राहिले' असे स्वतःचे त्यांनी केलेले वर्णनही अगदी यथार्थ व चित्रमय आहे. टिळकांच्या मृत्यूनंतर स्वतःच्या जीवनाला आलेल्या एकाकीपणाचे वर्णन त्यांनी 'टिळकांच्या अस्थी पेटीत जाताच माझे अस्तित्व जाणवू लागले."[३५] व 'आता माझा सूत्रधार गेला'[३६] अशा करुण-गंभीर वाक्यात अगदी समर्पकपणे केले आहे.

लक्ष्मीबाई टिळकांच्या भाषाशैलीविषयी कमलाबाई देशपांडे म्हणतात, "लांबलचक वाक्यापेक्षा वेचक शब्दांची त्रोटक वाक्ये लिहिण्यातच त्यांचा हातखंडा आहे."[३७] 'काळजी काय ती खाण्याची व नाण्याची', 'जन्मभर माझी वेरीज व टिळकांची वजाबाकी चालू असे', 'माणसाने दिलेले पुरत नाही व देवाने दिलेले सरत नाही', ही वाक्ये त्यांच्या अल्प शब्दात संपन्न आशय सांगणाऱ्या लेखनशैलीचा विशेष स्पष्ट करतात.

नाट्यपूर्ण संवाद, बोलीभाषेचा वापर, मधून मधून म्हणीचा वापर अशा त्याच्या लेखनशैलीच्या वैशिष्ट्यामुळे 'स्मृतिचित्रे' अधिकच उठावदार झाली आहेत. 'ताटावरोबर काठही गेला', 'बुवाचे तुरे लाल, बाईचे बुरे हाल', 'नानाजीचा पत्ता नसल्यावर अन्नाजी कोठून येणार?' यांसारख्या म्हणींच्या वापराने निवेदन अधिक आकर्षक झाले आहे.

'स्मृतिचित्रां'ची भाषा ही मध्यमवर्गीय स्त्रियांची घरगुती भाषा असल्यामुळे ती साधीसुधी व मनमोकळी आहे. ती त्यामुळेच पुस्तकी भाषा न वाटता जिवंत भाषा वाटते. साहित्यिक भाषेचा हव्यास न बाळगल्यामुळे तिच्यात कोणत्याही प्रकारची कृत्रिमता नाही, दिखावा नाही किंवा अलंकाराचा सोस नाही, बोली-

भाषेपासून दूर न जाता अनुभवांचे संपन्न विश्व शब्दांकित करता येते, हे इतरांना दाखवून देण्याची अवघड कामगिरी त्यांनी पार पाडली आहे. म्हणूनच गंगाधर गाडगीळ यांनी 'लक्ष्मीबाईंची भाषाशैली हा साहित्यिकांच्या दृष्टीने एक मानदंड झाला आहे. त्यांना बोलीभाषेकडे पुनःपुन्हा खेचून आणणारा लोहचुंबक झाला आहे. भाषेला मिळणाऱ्या इंग्रजी व संस्कृत वळणावरचा जबरदस्त उतारा झाला आहे'[३८] असा सार्थ अभिप्राय व्यक्त केला आहे.

लक्ष्मीबाईंचा कल्पनाविलास त्यांच्या लेखनशैलीत यथार्थपणे आविष्कृत झाला आहे. टिळकांच्या विसराळूपणाचे त्यांनी केलेले वर्णन यादृष्टीने पाहण्यासारखे आहे. टिळक क्लासला जायला निघाले की, 'बूट, कोट, मोजे, टोपी, कॉलर, पट्टा, छत्री, वहाणा ही सारी त्यांच्याशी लपंडाव खेळत व त्यांच्याबरोबर आमच्याही साऱ्यांच्या फुगड्या सुरू होत.'[३९] टिळकांची टोपी सापडेना तेव्हा चिडून त्यांनी खुंटीवरचे सारे कपडे खाली फेकण्यास सुरुवात केली. लक्ष्मीबाई म्हणतात, 'सर्पयज्ञात सर्पाची वेटोळीच्या वेटोळी येऊन अग्निकुंडात पडू लागली तशी आमच्या घरातील कपड्यांच्या चुंबळीच्या चुंबळी भराभर त्या ढिगावर पडू लागल्या.' सोंगट्यांच्या खेळाचे वर्णनही त्यांच्या कल्पना–विलासाचा अप्रतिम नमुना आहे.

आपल्या आयुष्यातील अनेक प्रकारच्या सुखदुःखात्मक आठवणी लक्ष्मीबाईंनी आत्मीयतेने उलगडून दाखविल्या आहेत. एकाचवेळी समरसतेने आणि पुन्हा तटस्थपणाने या आठवणांचे सहजसुंदर कथन त्यांनी केले आहे. आत्मचरित्रासारखा साहित्यप्रकार याच तंत्राने यशस्वी होऊ शकतो. आपण काहीतरी विशेष स्वरूपाचे सांगत आहोत, अशा प्रकारचा अहंभाव आत्मचरित्र लेखकाच्या मनात जेव्हा निर्माण होतो तेव्हा त्याची भाषा स्वाभाविकतेपासून दूर जाते. आपण एक साहित्यकृती निर्माण करीत आहोत या जाणिवेने लेखक मग लिहू लागतो. पण लक्ष्मीबाईंच्या मनात याप्रकारची किंचितही जाणीव नाही. ती एक चार–चौघींसारखी प्रापंचिक सुखदुःखांत गुरफटलेली पण आपल्या सुखदुःखांकडे काहीशा अंतरावरून पाहून अंगभूत रसिकतेने आणि विनोदबुद्धीने त्याचे मनमोकळे निवेदन करणारी गृहिणी आहे.म्हणून तर हे आत्मचरित्र कलादृष्ट्या मराठी अ–मराठीतल्या अन्य आत्मचरित्राहून अनेक अर्थांनी लक्षणीय ठरले. याची भाषा साहित्यिक भाषा नाही हेच या आत्मचरित्राचे वाङ्मयीन वैशिष्ट्य आहे. कारण साहित्य सुद्धा एक साहित्यकृती म्हणून समोर येण्याऐवजी वाचकाशी सहज संवाद करणारी एक स्वाभाविक कृती म्हणून जेव्हा पुढे येते तेव्हा ते रसिकप्रिय ठरते.

वास्तविक पाहता लक्ष्मीबाई या एक निरक्षर स्त्री पण या निरक्षर स्त्रीने 'स्मृतिचित्रां'च्या लेखनाद्वारे अक्षर वाङ्मय निर्माण केले व त्या 'साहित्यलक्ष्मी' बनल्या. त्यांच्या या वाङ्मयीन कर्तृत्वाचे श्रेय त्यांच्या लेखनशैलीस प्रामुख्याने द्यावे लागेल. अशोक देवदत्त टिळक म्हणतात, 'लक्ष्मीबाईंच्या लेखणीने एवढे अपार यश

मिळवून ठेविलेले आहे की त्यांनी जे लिहावे ते वज्रलेप होऊन जावे अशी 'वाचमर्थोनुधावति' सिद्धी त्यांना प्राप्त झाली आहे.'[४०] लक्ष्मीबाईंच्या व्यक्तित्वातील सारे विशेष त्यांच्या लिखाणात उतरले असल्याने 'स्मृतिचित्रे' लिहिण्यासाठी त्या स्वतःच जणू लेखणी बनल्या आहेत. लक्ष्मीबाईंच्या भाषाशैलीविषयी गंगाधर गाडगीळ यांचा अभिप्राय मननीय वाटतो. ते म्हणतात की, लक्ष्मीबाईंची भाषाशैली हे 'स्मृतिचित्रातल्या अनुभवांचे एक अविभाज्य अंग आहे आणि म्हणून लक्ष्मीबाईंच्या व्यक्तित्वाची जी वैशिष्ट्ये आहेत तीच त्यांच्या भाषाशैलीचीही आहेत.'[४१] लक्ष्मीबाईंच्या व्यक्तिमत्त्वाचा व लक्ष्मीबाईनी रेखाटलेल्या व्यक्तिरेखांचा अभ्यास करण्यासाठी 'स्मृतिचित्रा 'तील भाषाशैली उपयुक्त ठरणार आहे. 'स्मृतिचित्रां'च्या वाङ्मयीन स्वरूपाचा येथवर विचार केल्यानंतर आता त्यातील व्यक्तिचित्रण या महत्त्वपूर्ण घटकाचा विचार स्वतंत्रपणे करावयाचा आहे.

● ●

संदर्भ सूची

१. कुलकर्णी, भीमराव – 'नाना फडणिसांचे आत्मचरित्र'
(प्रस्तावना) महाराष्ट्र साहित्य पत्रिका– अंक २२१,
एप्रिल–मे–जून १९८२, पृष्ठ–१

२. देशपांडे अ. ना. आधुनिक मराठी वाङ्मयाचा इतिहास, भाग पहिला
व्हीनस प्रकाशन, पुणे २
आवृत्ती पहिली १९५४, पृष्ठ ११४.

३. फडके, भालचंद्र – मराठी लेखिका : चिंता आणि चिंतन
श्रीविद्या प्रकाशन, पुणे ३०. पहिली आवृत्ती १९८० पृष्ठ १४१.

४. तत्रैव, पृष्ठ १४४.

५. देशपांडे अ. ना. – आधुनिक मराठी वाङ्मयाचा इतिहास. भाग दुसरा
व्हीनस प्रकाशन पुणे २.
आवृत्ती पहिली १९५८, पृष्ठ ५५६.

६. कर्वे, आनंदीबाई – माझे पुराण
केशव भिकाजी ढवळे, मुंबई ४.
दुसरी आवृत्ती १९५१, पृष्ठ २६.

७. देशपांडे डॉ. कमलाबाई – स्मरणसाखळी
मनोहर ग्रंथमाला प्रकाशन पुणे, (१९४३) पृष्ठ ५६.

८. देशपांडे उनि, भाग दुसरा, पृष्ठ ५५६.

संग्रहालय

९. टिळक लक्ष्मीबाई – स्मृतिचित्रे – संपादक अशोक देवदत्त टिळक
न' गरिकछापखाना, नाशिक.
'स्मृतिचित्रांचा थोडा पूर्वेतिहास' अभिनव आवृत्ती, १९७३, पृष्ठ ३.
१०. तत्रैव, परिशिष्ट–३, पृष्ठ ३६.
११. तत्रैव,
१२. गाडगीळ, गंगाधर–साहित्याचे मानदंड
पॉप्युलर प्रकाशन, मुंबई. १९६२, पृष्ठ ७३
१३. टिळक उनि, भाग पहिला, पृष्ठ. ३.
१४. तत्रैव.
१५. तत्रैव, पृष्ठ ९.
१६. तत्रैव.
१७. तत्रैव., पृष्ठ ४३.
१८. तत्रैव, पृष्ठ ४४
१९. ठिपसे, सौ. प्रतिभा–हृद्‌गत
दास्ताने रामचंद्र आणि कंपनी, पुणे.
प्रथमावृत्ती १९८१, पृष्ठ १५३.
२०. टिळक उनि, पृष्ठ १६.
२१. तत्रैव, पृष्ठ १५
२२. तत्रैव, पृष्ठ १६२.
२३. तत्रैव, भाग दुसरा, पृष्ठ ७०.
२४. तत्रैव, पृष्ठ ५३.
२५. गाडगीळ उनि, पृष्ठ ७४.
२६. टिळक उनि, भाग पहिला, पृष्ठ ६२.
२७. तत्रैव, पृष्ठ ८१.
२८. तत्रैव, भाग तिसरा, पृष्ठ १५१–५२.
२९. फडके, ना. सी. प्रतिभा–साधन
देशमुख आणि कंपनी, पुणे. २.
दहावी आवृत्ती १९७०, पृष्ठ २३२.
३०. टिळक उनि, भाग पाहिला, पृष्ठ १६.
३१. तत्रैव, पृष्ठ ४४.

३२. तत्रैव, पृष्ठ ४५.

३३. तत्रैव, भाग दुसरा, पृष्ठ ६७.

३४. तत्रैव, पृष्ठ ६८.

३५. तत्रैव, भाग चौथा, पृष्ठ १.

३६. तत्रैव, पृष्ठ १०.

३७. टिळक लक्ष्मीबाई – स्मृतिचित्रे (संक्षिप्त)
संपादक देवदत्त नारायण टिळक
साहित्य अकादेमीतर्फे पॉप्युलर, प्रकाशन, मुंबई.
दुसरी आवृत्ती १९६८, प्रस्तावना, पान १५.

३८. गाडगीळ उनि, पृष्ठ ८८.

३९. टिळक उनि, अभिनव आवृत्ती, भाग तिसरा, पृष्ठ ३७.

४०. तत्रैव, प्रस्तावना, पृष्ठ, ३.

४१. गाडगीळ उनि, पृष्ठ ८६.

प्रकरण चौथे

'स्मृतिचित्रां'तील व्यक्तिचित्रण

१. लक्ष्मीबाईंचे 'स्व'भावचित्र

'स्मृतिचित्रे' ही एक अत्यंत श्रेष्ठ दर्जाची कलाकृती असून लक्ष्मीबाईंनी रेखाटलेली असामान्य व विविध व्यक्तिचित्रे हे 'स्मृतिचित्रां'च्या वाङ्मयीन थोरवीचे एक प्रमुख अंग आहे. त्यात टिळकांच्या व्यक्तिचित्राला मध्यवर्ती स्थान असले तरी स्वत: लक्ष्मीबाई, त्यांचे कुटुंबीय, आप्त-स्वकीय यांची व्यक्तिचित्रणेही 'स्मृतिचित्रा'त अत्यंत आकर्षक अशी उतरली आहेत. स्वत:चे व्यक्तिचित्रण त्यांनी जाणीवपूर्वक न करता अगदी सहजगत्या केले आहे. आपल्या जीवनाचा पट त्यांनी वाचकापुढे अगदी प्रांजलपणे उलगडून दाखविला आहे, व त्यातूनच त्यांचे व्यक्तिमत्त्व प्रतिबिंबित झाले आहे. आतले एक व बाहेरचे एक असा त्यांचा स्वभाव नसल्यामुळे व त्यांची स्मरणशक्ती अगदी तल्लख असल्यामुळे त्यांनी घडलेले सर्व घटना–प्रसंग जसे घडले तसे रेखाटले आहेत.

लहानपणापासून लक्ष्मीबाई त्यांच्या आत्याच्याच, रखमाबाई गोविंद खांबेटे यांच्या घरी वाढल्या. त्यांच्या वडिलांना–नानांना सोवळे झाले होते व त्यामुळे घरातील सर्व व्यक्तींना खूप त्रास सहन करावा लागे. एकदा चोरून पेरू खाताना आढळल्या व नानांनी त्यांना खूप चोप दिला हे त्या प्रामाणिकपणे सांगतात. नानांची खोडकी जिरविण्यासाठी त्या गंगेत जीव देण्याचा प्रयत्न करतात, पण तो प्रयत्न अयशस्वी होतो. लक्ष्मीबाई प्रामाणिकपणे व मिस्किलपणे सांगतात, "नानांची खोड मोडली नाही, पण माझी मात्र पुरी खोड मोडली.'[१]

बाहुल्यांचा खेळ लक्ष्मीबाईंना विशेष प्रिय होता. हा खेळ खेळण्यासाठी त्या आपल्या सखू नावाच्या मैत्रिणीच्या घरी दररोज जात. पण एके दिवशी तिच्या भावाने हातात काठी घेऊन त्यांचा मार्ग आडवला व 'खबरदार आमच्या घरात आलीस तर ! तंगडीच मोडीन !'[२] असा दम दिला. पण योगायोगाने त्याच्याशीच लग्न होऊन सर्व आयुष्य लक्ष्मीबाईंना त्याच्याबरोबर कंठावे लागले. टिळकांना आपण कसे पसंत पडलो याचे त्यांना आश्चर्य वाटते. त्या प्रांजलपणे म्हणतात, 'मला नवल वाटते मी टिळकांना कशी पसंत पडले त्याचे. माझे रूप, रंग अगदी

बेताचेच होते, बाकी नाक डोळे जरी रेखीव नव्हते तरी ते होते व अगदी जागच्या जागी होते.'[३] स्वतःच्या रूपाबद्दल विनोदप्रचुरही त्या लिहितात. स्वतःकडे पाहण्याची अलिप्त व काहीशी व्रात्य अशी वृत्ती असल्याने स्वतःच्या फजितीचे वर्णन करणे, स्वतःच्या चुका कबूल करणे, आपल्या अज्ञानाबद्दल उपहासाने लिहिणे हे लक्ष्मीबाई सहजपणे करू शकतात.

लग्न झाल्यावरही बाहुल्यांचा खेळ खेळायची त्यांची हौस कमी झाली नाही. भिकुताईंकडे राहत असताना या बाहुलीच्या खेळामुळे भिकूताईंना व शेजाऱ्यापाजाऱ्यांना खूप खर्च करावा लागला. शेवटी 'तू सोळा वर्षांची झालीस तरी बाहुल्या खेळतेस.'[४] अशी बोलणी त्यांना पेंडशांच्या घरी खावी लागली. अशा प्रसंगांतून 'प्रौढत्वी निज शैशवास जपणाऱ्या' व उत्सव-समारंभप्रिय अशा लक्ष्मीबाईंचे आपणास दर्शन होते.

लक्ष्मीबाई अत्यंत सोशिक व सहनशील होत्या. बालपणी त्यांना अनेकदा मार खावा लागला व पुढे लग्न झाल्यावर सासरी त्यांना शब्दांचा मार खावा लागला. मामंजींच्या अंगात आलेल्या देवीने घरात आलेली सून वाईट पायाची आहे, असे त्यांना सांगितल्यावर मामंजी त्यांच्याशी नीट वागेनासे झाले. टिळकही रागावून घर सोडून पळून जात. अशावेळी लक्ष्मीबाईंना पैठणी, पातळे विकण्याची वेळ येई, पण लक्ष्मीबाई हे सर्व निमूटपणे सहन करीत.

मुरबाडला असताना वामनराव पैठणीसाठी लक्ष्मीबाईंना खूप टोचून बोलत. त्यांच्या साडचा फाटल्या होत्या व त्यांना पुण्याच्या बांगडचा भरावयाच्या होत्या, पण 'पैठणी आणून द्या मग बांगडचा भरू...पैठणी आणून द्या मग लुगडी घेऊ.'[५] अशी त्यांची भाषा असे. लक्ष्मीबाईंना कोकणी पदार्थ करता येत नसत 'पेजबुडचा भात' किंवा 'जिवंत फोडणी' या गोष्टी त्यांना माहीत नव्हत्या. एकदा आमटीला जिवंत फोडणी देण्यास वामनरावांनी त्यांना सांगितले व अर्थातच ते लक्ष्मीबाईंना जमले नाही. तेव्हा, 'तू दगड झाली असतीस तर तुझा पायखान्याच्या पायरीला उपयोग झाला असता' [६] असे अनुदार उद्‌गार त्यांनी काढले व लक्ष्मीबाईंनी मूकपणे ते सहन केले. वामनरावांच्या देवपूजेची उपकरणी घासली तरी त्यावर डाग रहायचे. त्याबद्दलही त्यांना खूप बोलणी खावी लागत. इतका सासुरवास सहन करूनही लक्ष्मीबाईंनी आपल्या सासऱ्याबद्दल तिरस्काराची भावना कोठेही व्यक्त केली नाही. उलट त्या म्हणतात, 'मामंजी मला छळीत, पण दोन गोष्टींबद्दल मला त्यांचे गुण घ्यावेसे वाटतात. एक म्हणजे मला त्यांनी कधी अपशब्द वापरले नाहीत व कधी अंगाला बोट लावले नाही.'[७] त्यांच्या शुद्ध वर्तनाचीही त्यांनी स्तुती केली आहे. छळ सहन करूनही आपल्या सासऱ्याच्या एक-दोन चांगल्या गुणाबद्दल प्रशंसेचे उद्‌गार काढणारी ही गृहिणी किती उदारमनस्क, सौजन्यशील आणि निष्पाप मनाची

होती याची जाणीव होऊन वाचकाला लक्ष्मीबाईंबद्दलची एक विशेष प्रकारची आत्मीयता निर्माण होते.

पतिपरायणता किंवा पतिनिष्ठा हा लक्ष्मीबाईंच्या स्वभावाचा एक प्रमुख विशेष मानावा लागेल. त्यांचे हे आत्मचरित्र त्यांच्या पतीबरोबरील सहजीवनाचाच इतिहास आहे. त्यांच्या संसारात सदैव आसू आणि हासू यांचा खेळ चालत असताना त्यांनी आपल्या पतीला सावलीप्रमाणे साथ दिली. पण त्याचबरोबर पतीची केवळ सावली न बनता आपले स्वतंत्र व्यक्तिमत्त्वही कायम ठेवले.

मुरबाडहून टिळक मुंबईस निघून गेले व लक्ष्मीबाई एकट्याच राहिल्या. त्यावेळची त्यांची मनःस्थिती व टिळकांविषयीचे प्रेम त्यांच्या मामंजीबरोबर झालेल्या खालील संवादावरून दिसून येते.

मामंजी म्हणत–

'आज तुझ्या नवऱ्याचे पत्र आले.'

'हं.'

'त्याला सरदारगृहात धोतर धुण्याचं काम मिळालं आहे.'

'मग मी ती वाळत टाकीत जाईन.'

'तो तेथली पाने वाढतो.'

'मग मी उष्टी काढीन. मला तुम्ही मुंबईला नेऊन पोचवा.'[८]

नानासाहेब पेंडशांच्या मुलीचे–घारूताईचे – लग्न निघाले. ती लक्ष्मीबाईंची आवडती भाची. टिळकांनी लक्ष्मीबाईंना लग्नाला जाण्याची तयारी करावयास सांगितले. तथापि रिकाम्या हातांनी लग्नाला कसे जायचे याची चिंता लक्ष्मीबाईंना पडली. या प्रसंगीचे वर्णन करताना त्या म्हणतात, 'मी लंकेची पार्वती व टिळक कफल्लक शंकर. शंकर-पार्वतीच्या चरित्रातील अशाच एका प्रसंगाची आठवण होऊन मला हसूही आले व रडूही आले.'[९] घारूताईच्या लग्नात आपण गरीब म्हणून आपली उपेक्षा होते, असे त्यांना वाटले. अशा प्रसंगीच केवळ सर्दी झाली म्हणून तारा करून टिळकांनी लक्ष्मीबाईंना बोलावून घेतले. चार दिवस बहिणीकडेही धड राहू न दिल्यामुळे लक्ष्मीबाईंना खूप संताप आला. टिळकांच्या सहवासात त्यांना असे अनेक प्रसंग सहन करावे लागले.

टिळकांशी अनेक बाबतीत त्यांचे जमत नसले तरी टिळकांच्या मनाविरुद्ध त्या कधी वागल्या नाहीत. टिळकांशी त्या पूर्णपणे एकरूप झाल्या होत्या. राजनांदगावला टिळकांनी वक्तृत्वस्पर्धा आयोजित केली, त्यावेळी घरात पैसा नसतानादेखील लक्ष्मीबाईंनी या स्पर्धा यशस्वी होण्यासाठी टिळकांना पूर्ण सहकार्य दिले. आयुष्यभर अत्यंत कष्ट घेऊन व काटकसर करून टिळकांचा संसार चालवला. गरिबीमुळे दत्तूच्या दुधासाठी किंवा भातासाठी त्यांना इतरत्र तोंड वेंगाडावे लागले पण त्यांनी कधी धीर सोडला नाही की, कधी आपल्या चेहऱ्यावरचे हसू मावळू दिले नाही.

टिळकांची ख्रिस्ती धर्माकडे प्रवृत्ती होऊ लागल्यावर लक्ष्मीबाईंच्या मनाची एकच घालमेल सुरू झाली. लोक त्यांना टिळकांच्या पत्रव्यवहारावर नजर ठेवण्याचा व त्यांच्या टेबलावरील बायबल जाळण्याचा सल्ला देऊ लागले. तथापि लक्ष्मीबाई या बुद्धिवादी होत्या. त्या लोकांना विचारीत, 'बायबलची ही प्रत जाळली, तर साऱ्या जगातल्या प्रती नाहीशा होतील का ?'[१०] टिळकांची कागदपत्रेही त्या लोकांना दाखवत नसत. एकदा त्यांनी टिळकांना 'खरंच काहो तुम्ही ख्रिस्ती होणार ?' असा प्रश्न विचारला. टिळकांनीही 'मी ख्रिस्ती होत नाही' असे उत्तर दिले. लक्ष्मीबाई मात्र खोलीचे दार लावून रडत बसल्या व त्यांनी त्यांची पहिली कविता त्याचवेळी लिहिली–

'म्हणे जातो सांडून नाथ माझा
आता कवणाला बाहुं देव राजा'[११]

टिळकांसाठी तिळतिळ तुटणारे त्यांचे मन येथे जाणवते. टिळक ख्रिस्ती झाल्यावर लक्ष्मीबाईंना मोठा धक्का बसला. पण टिळकांचा खुशालीचा ऐकल्यानंतर त्या आपल्या भावास म्हणाल्या, 'कुठेही असले नि सुखरूप असले म्हणजे झाले. ते गेले तर त्यांनी काय माझ्या कपाळाचे कातडे थोडेच काढून नेले आहे !'[१२] त्यांच्या या उद्‌गारांत त्यांचे टिळकांविषयीचे प्रेम, चिंता व दुःख व्यक्त होते.

पुढे लक्ष्मीबाईंचा टिळकांशी पत्रव्यवहार सुरू झाला, त्यात त्यांनी कविता-रूपाने आपले मनोगत व्यक्त केले. आपल्या पतीचे त्यांना कधीही विस्मरण झाले नाही. पती परत यावा, म्हणून त्यांनी देवदेवतांना साकडे घालण्यास सुरुवात केली. त्याचे वर्णन वाचताना मनोरंजक वाटले तरी त्यांच्या दुःखार्त मनःस्थितीची त्यावरून कल्पना येते. त्या म्हणतात, 'जलालपुरास एक भला मोठा मारुती आहे. त्याच्या हातात मी काठी देत असे. हेतू हा की त्याने टिळकांच्या मागे लागून त्यांना परत आणावे.'[१३] गंगेपासून घरापर्यन्त त्या पावले काढीत, रोज देवीला तांबडे फूल वाहत व फूल मिळाले नाही त्या दिवशी उपवास करीत. संकटकाळात बुद्धी चालेनाशी झाल्यावर, लक्ष्मीबाई अंधश्रद्धेच्या कशा आहारी गेल्या होत्या, हे यावरून दिसून येईल.

१० फेब्रु. १८९५ ला टिळक ख्रिस्ती झाल्यानंतर जवळजवळ साडेचार वर्षे लक्ष्मीबाईंची पतीपासून ताटातूट झाली. १८९९ च्या जुलैमध्ये टिळकांसमवेत त्या नगरास गेल्या. टिळकांच्या सहवासात लक्ष्मीबाईंच्या विचारात बदल होत जाऊन त्या सुधारणावादी मताच्या बनल्या. टिळकांच्या घरीही कडक सोवळे पाळणाऱ्या लक्ष्मीबाईंना एकदा मुसलमानाच्या हातचे पाणी प्यालयानंतर वांती झाली. त्यांना सडकून ताप भरला व त्या आजारी पडल्या. डोक्यात विचारांचे काहूर माजले असतानाच त्यांना सूर्यप्रकाशासारखा प्रकाश पडल्याचा भास झाला व त्यांच्या मनाला जखडून टाकणाऱ्या जातिभेदाच्या साखळ्या खळाखळ तुटून पडल्या. 'देवाने जाती

केल्या का माणसाने ?... मनुष्यप्राण्यात जर देवाने जाती केल्या तर त्याच देवाने प्राणिसृष्टीत का निरनिराळ्या जाती केल्या नाहीत ?'[१४] असे प्रश्न त्यांच्या मनात उद्‌भवले व त्यांनी जातिभेदाचा त्याग करण्याचा निश्चय केला. यापुढे सर्वांच्या हातचे खाण्याचे त्यांनी ठरविले. पुढे भंगिणीच्या हातचे खातानाही त्यांना वाईट वाटले नाही. त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील विकसनशीलता व गतिमानताच या प्रसंगातून दिसून येते. एके दिवशी त्या डॉ. बालैंटाईन साहेबांच्या बंगल्यावर गेल्या व त्यांनी ख्रिस्ती होण्याची इच्छा व्यक्त केली. दुसऱ्याच दिवशी (८ जुलै १९००ला) त्यांचा रेव्ह. ओहळ यांच्या हस्ते बाप्तिस्म्याचा विधी राहुरी येथे पार पडला. लक्ष्मीबाईंच्या जीवनात हे क्रांतिकारक परिवर्तन घडले.

टिळक हे आधुनिक संत होते; त्यांना प्रपंचाची काळजी नसे. म्हणून टिळकांच्याबरोबर संसार करताना लक्ष्मीबाईची खूप तारांबळ उडे. टिळकांना पैशाची चिंता कधीच वाटत नसे. पैसा आला की तो कसा खर्च करायचा याचाच ते विचार करीत, टिळक बाहेरगावी गेले. की ते महिना महिना परत येत नसत व लक्ष्मीबाईना मोठ्या मुष्किलीने संसाराचा गाडा रेटावा लागे. नागपूरला असताना टिळक बाहेरगावी गेले व लक्ष्मीबाईंची त्यांनी कोणतीच तरतूद केली नाही. लक्ष्मीबाईनी कसेबसे दिवस काढले व शेवटी तार करून टिळकांना बोलावून घेतले. टिळक जेवायला बसल्यावर ताक, कण्या, मीठ व बागेतील मिरच्या ठेवल्या. 'हे काय ?' असे टिळकांनी विचारले. त्यावर लक्ष्मीबाई म्हणाल्या, 'तुम्ही गेल्यापासून मी जे खात होते ते !'[१५] स्पष्ट व परखडपणे बोलणे हे लक्ष्मीबाईच्या स्वभावातील एक वैशिष्ट्य होते.

टिळक ख्रिस्ती झाल्यावर सखारामभाऊजी लक्ष्मीबाईंना 'तुम्ही टिळकांना सूटपत्र द्या' असे सांगू लागले. त्यावेळी लक्ष्मीबाईनी त्यांना रीखठोकपणे उत्तर दिले–' 'आता कुठे ते बांधलेले आहेत ? सूटपत्र कशाचे देऊ ? मी का पळून गेले का निघून गेले ? जसे त्यांचे कोणी नाही, तसे माझे कोणी नाही. मला पैसा नाही. विद्या नाही. मूल लहान. मी काय करणार ? तुमची सगळ्यांची भांडीच घासणार की नाही ? तुमची ही शिष्टाई पुरे. त्यांना पत्र पाठवा. म्हणावे आधी येऊन बायकोचे लग्न नीटनेटके लावून द्या आणि मग स्वत:चे लग्न करा. तुम्हाला काही वाटत नाही आपण कोणाशी बोलतो ते ?'[१६] वेळप्रसंगी असे कडक प्रत्युत्तर लक्ष्मीबाई देऊ शकत. अशावेळी कोमल हृदयाच्या लक्ष्मीबाई याच का, असा प्रश्न पडतो. टिळक आपल्या औदार्यामुळे व भोळेपणामुळे अनेक लोकांना आपल्या घरी आश्रय देत. लक्ष्मीबाईच अशावेळी त्या माणसाची योग्य पारख करून त्याना हाकलून देत. प्रत्येकाशीच त्या स्पष्टपणे बोलायच्या. म्हणूनच बालकवी ठोंबरे त्यांना एकदा म्हणाले होते, 'लक्ष्मीबाई, तुमच्याकडे पंचम जॉर्ज आले तरी त्यांना तुम्ही सांगाल, की बाबा रे येताना तेवढे फाटक लोटून घे.'[१७]

संकटकाळी अत्यंत धीराने व आत्मविश्वासाने वागणे हे लक्ष्मीबाईचे वैशिष्टच होते. त्यांच्या जीवनात त्यांना अनेक कठीण प्रसंगांना सामोरे जावे लागले पण त्या कधी डगमगल्या नाहीत. टिळक ख्रिस्ती झाल्यावर जरी त्या खचून गेल्या तरी त्यांनी त्या प्रसंगातूनही मार्ग काढलाच. आपल्या या स्वभावाबद्दल त्या म्हणतात, 'शरीराचा त्याग करण्याचे प्रसंग मजवर कितीतरी वेळेस आले असतील पण मी तो कधीच केला नाही. व मला वाटते, तो कधी होणे शक्यही नव्हते. माझ्या मनाची ठेवणच अशी आहे की, सर्व निराशामय अंधःकारातून चाचपडत धडपडत का होईना, पण आपला मार्ग आक्रमायचा. मध्येच पडून प्राण सोडायचा नाही. थोडक्यात म्हणजे रबरी चेंडूप्रमाणे माझे आहे.' [१८] दुसऱ्या एका प्रसंगी त्या म्हणतात, 'तशी फार जिवट स्वभावाची व चिवट शरीराची आहे ' [१९] त्यांच्या अंगी हे धैर्य असल्यामुळेच त्या आपले जीवनानुभव अलिप्तपणे व संयमाने सांगू शकतात. सरोजिनी वैद्य म्हणतात, 'स्मृतिचित्रामागील लेखिका आपल्याला वृत्तीने कणखर वाटतात. त्या आपल्या अनुभवसृष्टीवर सहजपणे हुकूमत ठेवून असतात. भांबावलेल्या जीवनाची प्रतीती मुळीच न भांबावता त्यांना देता येते.' [२०]

लक्ष्मीबाईमध्ये आत्मपरीक्षणाची शक्तीही आढळते. टिळक त्यांना लिहिण्या-वाचण्यास शिकवू लागले पण लक्ष्मीबाईंना त्यांच्याजवळ बसून शिक्षण घेणे जमले नाही. याचे कारण सांगताना त्या म्हणतात, 'एक तर मी लहान नव्हते. दुसरे, मी परकी नव्हते. तिसरे, मला हसू फार येत असे.' [२१] पुढे त्या म्हणतात, 'बायकोने आपल्यासारखे व्हावे, असे टिळकांना वाटे. व मी पडले मठ्ठांतली मठ्ठ. तेव्हा ते व्हावयाचे कसे ?'[२२] यात जसा विनोद आहे, त्याचप्रमाणे स्वतःकडे कमीपणा घेण्याची तयारीही आहे. आपणास बेताचेच रूप लाभले असूनही टिळकांनी कसे पसंत केले, याबद्दल त्या आश्चर्यही व्यक्त करतात. आपणास 'मानसशास्त्र' समजत नाही, 'ॲप्रिसिएशन' नाही असे टिळकांचे मत होते, हेही त्या स्पष्टपणे सांगतात. टिळक ख्रिस्ती मिशनऱ्याकडे बायबल वाचायला जायचे त्यावेळी लक्ष्मी-बाई त्यांच्यावर पाळत ठेवायच्या व त्याबद्दल त्यांना मारही खावा लागला, ही गोष्टही त्या लपवून ठेवत नाहीत.

लक्ष्मीबाई स्वभावाने अत्यंत विनोदी व मिस्किल आहेत. आपल्या जीवना-तील सुखदुःखांचे प्रसंग रंगवून सांगताना बाईंची विनोदवृत्ती सदैव उचंबळून येत असते. मामंजींच्या पूजेच्या उपकरणांना डाग पडत. त्याबद्दल त्या म्हणतात, 'उप-करणी होती तांब्याची, पाणी विहिरीचे, राख लाकडाची व दिवस पावसाचे.' [२३]

लक्ष्मीबाई सोळा वर्षांच्या झाल्या असल्या तरी त्यांची बाहुलीच्या खेळाची आवड गेलेली नव्हती. भिकूताईकडे असताना या बाहुलीच्या खेळामुळे कशी फजिती झाली हे त्या विनोदी पद्धतीने सांगतात– 'बाहेर चौघडा बंद झाल्यावर माझ्या हृदयात चौघडा वाजू लागला. बहिणीने पंचपक्वानांचे ताट मजपुढे वाढून ठेवले.

त्यात कोणती, पक्वान्ने नव्हती ? गाल–गुरोळचा होत्या, चापटपोळचा होत्या' धम्मकलाडू होते, मुष्टिमोदक होते. मुरुडकानोले होते. ' [२४]

लक्ष्मीबाई एका वसतिगृहाच्या देखरेखीचे काम करीत असताना वसतिगृहातील काही मुली सहलीच्या वेळी समुद्रात वाहून गेल्या. लक्ष्मीबाईंना कोर्टात ज्यूरींच्या पुढे उभे राहावे लागले. त्यावेळच्या आपल्या स्थितीचे वर्णन करताना त्या म्हणतात, ' जणू काही लक्ष्मीबाई डेराच घुसळण्यास उभ्या आहेत. पुढे कठड्यावर मान आपटत आहे, आता ऊद–कापराचाच उशीर की हे वारे लागणार बोलायला! जबानीला सुरुवात झाली, पण त्या थाटात तोंडातून शब्दच निघेना. ' [२५] लक्ष्मीबाईंची विनोदबुद्धी त्यांना अगदी सावलीसारखी साथ देते, ती अशा करुण–गंभीर प्रसंगीही त्यांना सोडून जात नाही, हे दिसून येते. लक्ष्मीबाईंच्या विनोदबुद्धीबद्दल सरोजिनी वैद्य यांचे मत लक्षात घेण्यासारखे आहे. त्या म्हणतात, ' लक्ष्मीबाईंच्या विनोदाचे हे काही मासले पाहिले की आपल्या ध्यानात येते, हा विनोद उपरा नाही, तो स्वतःकडे बघण्याची एक क्रीडापूर्ण दृष्टीच आहे. ज्या दृष्टीने त्या स्वतःकडे बघतात, त्याच दृष्टीने एखाद्या व्यक्ती वा प्रसंगाकडे किंवा त्यांच्या परस्परसंबंधाकडेही त्या पाहतात...या गुणामुळे लक्ष्मीबाईचे सारे जीवनच क्रीडादृष्टीने खेळला गेलेला एक गंभीर सामना असल्यासारखे आहे, असे ' स्मृतिचित्रे ' खाली ठेवताना वाटू लागते. ' [२६] लक्ष्मीबाईंच्या याच वैशिष्ट्याबद्दल गंगाधर गाडगीळ म्हणतात, ' लक्ष्मीबाईंच्या विनोदाचा हा झरा सारखा झुळूझुळू वाहात असतो आणि त्यांच्या साऱ्याच स्मृतींना प्रसन्न, हसऱ्या करतो. अत्यंत दुःखाच्या गंभीर प्रसंगीदेखील त्यांची विनोदबुद्धी त्यांना सोडून जात नाही. या विनोदाने त्यांच्या अनुभवांना एक वेगळेच परिमाण प्राप्त करून दिले आहे, त्यांना अधिक अर्थपूर्ण केले आहे. ' [२७]

टिळक ख्रिस्ती झाले व त्यानंतर लक्ष्मीबाईंनीही ख्रिस्ती धर्म स्वीकारला. तथापि लक्ष्मीबाईंच्या धर्मांतराबद्दल एक गोष्ट लक्षात घेण्यासारखी आहे. ती म्हणजे लक्ष्मीबाई ख्रिस्ती झाल्या तरी त्यांच्यावरील हिंदू धर्माचे संस्कार काही पूर्णपणे पुसून गेले नाहीत. त्यांनी कधीच मांसाशन केले नाही. व त्याचा त्या ' आमच्या घरात कधी मांस शिजत नाही ' [२८] असा अभिमानपूर्वक उल्लेखही करतात.

देवदत्तांचे लग्न ३० एप्रिल १९१८ मध्ये झाले. ते चैत्र महिन्यात होऊ नये असे लक्ष्मीबाईचे मत होते. त्यामागची कारणमीमांसा टिळकांनी देवदत्तांना ३ एप्रिल १९१८ रोजी लिहिलेल्या पत्रातून कळण्यासारखी आहे. टिळक लिहितात, She is simply frightened to find that if you are married any day after the 11 th of this month your marriage will be performed in चैत्र which she believes to be the most unauspicious month for the ceremony and must cause in future some kind of harm.' [२९]

देवदत्तांचे लग्न शेवटी चैत्रातच झाले व त्यानंतरच्या वीस-बावीस महिन्यात वीस बावीस माणसे काळाने हिरावून नेली. प्रत्येक मृत्यूची बातमी येताच लक्ष्मीबाई प्रथम त्या चैत्रातल्या लग्नाचा उद्धार करीत. ख्रिस्ती होऊनही शुभ–अशुभाच्या, शकुन–अपशकुनाच्या दृढमूल झालेल्या कल्पना लक्ष्मीबाईंना सोडता आल्या नाहीत.

लक्ष्मीबाईंनी स्वतः आपल्या ख्रिस्ती धर्म स्वीकारामागील मानसिक विकासाचे वर्णन 'अगदी स्टेप बाय स्टेप' असे केले असले तरी डॉ. कमलाबाई देशपांडे यांनी मात्र 'शेवटी सतीला पतीवाचून देव नाही, ही हिंदू धर्माची शिकवणच ख्रिस्ती धर्म स्वीकारताना त्यांच्या पाठीशी उभी होती' असे प्रतिपादन केले आहे. मुंबई दूरदर्शनवर 'स्मृतिचित्रे' हा चित्रपट सौ. विजया मेहता यांनी सादर केल्यानंतर 'लोकप्रभा' साप्ताहिकातील वाचकांच्या प्रतिक्रियांना उत्तर देताना अशोक देवदत्त टिळकांनी या मुद्द्याचा परामर्श घेऊन लक्ष्मीबाईंच्या विकासाच्या सात पायऱ्या स्पष्ट केल्या आहेत.[३०] तथापि टिळक जर ख्रिस्ती झाले नसते तर लक्ष्मीबाईही ख्रिस्ती झाल्या नसत्या, ही गोष्ट सहज लक्षात येण्यासारखी आहे.

ख्रिस्ती समाजात गेल्यामुळे व टिळकांच्या स्वभावामुळे लक्ष्मीबाईंचे कार्यक्षेत्र वाढले. त्यांचा जीवनाविषयीचा आत्मविश्वास वाढला. टिळक ख्रिस्ती आल्यावर भाऊ, दीर, बहीण यांच्या आश्रयाने जगणाऱ्या, लक्ष्मीबाई पुढे स्वतः अनेकांच्या आश्रयदात्या बनल्या. टिळकांनी उत्तेजन दिल्यामुळे काव्य–लेखन–वक्तृत्वात त्यांची प्रगती होऊ लागली. टिळक ख्रिस्ती झाल्यावर त्यांनी प्रथम कविता लिहिली व टिळकांच्या चिरवियोगानंतर त्यांनी त्यांचे 'ख्रिस्तायन' पूर्ण केले. पुढे पुणे–लोणावळ्यास त्यांची कीर्तने होऊ लागलीं. नाशिकला १९३३ साली भरलेल्या कविसंमेलनातील त्यांचे स्वागताध्यक्षीय भाषण तर महाराष्ट्रभर गाजले. १९३६ साली नागपूर येथे झालेल्या ख्रिस्ती साहित्य संमेलनातील त्यांच्या भाषणासही खूप प्रसिद्धी मिळाली. पतित स्त्रियांना न्याय मिळावा म्हणून भाषणे व लेख लिहून लोकमत बनविण्याचा त्यांनी प्रयत्न केला. 'स्मृतिचित्रां'च्या लेखनात तर त्या इतक्या रमून गेल्या की आपल्या सत्कार–समारंभास उत्तर देताना त्यांनी 'ज्या दिवशी मला पूर्ण विराम मिळेल त्याच दिवशी माझ्या स्मृतिचित्रांना पूर्णविराम मिळेल.'[३१] असे निर्धारपूर्वक सांगितले व लक्ष्मीबाईंचा 'फुलस्टॉप' अजून झालेला नाही हे स्पष्ट केले.

लक्ष्मीबाई टिळकांचा जीवन प्रवास मुलगी–बहीण–आई–आजी आदी नात्यांनी झाला व त्यांना सर्वांचीच सेवा करण्यात धन्यता वाटली. त्यांच्या ज्येष्ठ भगिनी भिकूताईंचा (पेंडसे जानकी नारायण) त्यांच्यावर फार लोभ होता. लक्ष्मीबाई व भिकूताई यांच्या वयात जवळ जवळ पंधरा–सोळा वर्षांचे अंतर होते.

त्यामुळेच कदाचित त्या लक्ष्मीबाईवर मातृवत् प्रेम करीत. लक्ष्मीबाई घारूताईच्या-भिकूताईच्या एकुलत्या एक मुलीच्या विवाहास गेल्या असताना बहिणीने आपली चौकशी केली नाही कारण आपण गरीब, आपल्या अंगावर गोठतोडे नाहीत, असा विचार त्यांच्या मनात आला व त्यांना रात्री झोप येईना. पण भिकूताईंनी त्यांचा गैरसमज दूर केला व आपल्या अंगावरचे सर्व दागिने काढून लक्ष्मीबाईंच्या अंगावर घातले. या लग्न सोहळ्यानन्तर लक्ष्मीबाईंना महिना-दोन महिने ठेवून घेण्याचा त्यांचा विचार होता, परन्तु टिळकांनी तार करून बोलावल्यामुळे पेंडशांनी लक्ष्मीबाईंना स्वगृही पाठवून दिले.

लक्ष्मीबाई व भिकूताई यांच्यामध्ये इतके प्रेम होते की कधीही घराबाहेर न पडणाऱ्या, अगदी माहेरीसुद्धा न जाणाऱ्या भिकूताई लक्ष्मीबाईंच्या बाळंतपणासाठी जलालपुरात दोन–तीन महिने राहिल्या होत्या.

टिळकांची प्रवृत्ती, ख्रिस्ती धर्माकडे होत असताना त्यांनी लक्ष्मीबाईंना भिकूताईकडे पाठवून दिले. लक्ष्मीबाईची अवस्था पाहून 'मने, काय तुझी ही दशा झाली आहे!'[३२] असे म्हणून त्यांनी लक्ष्मीबाईंना मिठी मारली.

टिळक ख्रिस्ती झाल्यावर लक्ष्मीबाईंना खूपच दुःख झाले व आत्महत्येचे विचारही त्यांच्या मनात येऊ लागले. एकदा घरी निजानीज झाल्यावर त्या सुंदर-नारायणच्या डोहात उडी टाकण्यास निघाल्या होत्या. पण बाहेर राऊन्डची अलबेल कानी पडताच घरातील आडातच जीव द्यावा असा त्यांनी विचार केला. पण नाना-साहेबांची अप्रतिष्ठा होईल असा विचार करून त्यांनी तो बेत तडीस नेला नाही. भिकूताईंनी या काळात लक्ष्मीबाईंची खूप काळजी घेतली. त्या वेडचासारखे करू लागल्या म्हणजे दत्तूसाठी तरी नीट वागण्याचा त्या उपदेश करीत. टिळकांनी पुन्हा स्वधर्मात परत यावे, यासाठीही त्या उत्सुक होत्या. तथापि ख्रिस्ती झालेल्या पतीकडे लक्ष्मीबाईनी जाऊ नये यासाठी त्या दक्ष होत्या त्यासाठी त्यांनी लक्ष्मी-बाईना जलालपूरला आणून ठेवले. त्यांना उद्देशून 'मैना, तुझा ग पिंजरा मायेचा' हे गाणे त्या म्हणीत. लक्ष्मीबाई पुढे टिळकांबरोबर निघून गेल्यावर मात्र त्यांना मोठा धक्का बसला व त्यांनी अंथरूण धरले. पुढे त्यांचा मृत्यू झाला. लक्ष्मीबाई म्हणतात, 'माझ्यामुळे तिला कष्ट, आजार व शेवटी मृत्यू आला, तेव्हा मला तो बातमी ऐकून काय वाटले असेल ह्याची शब्दापेक्षा कल्पनेनेच चांगली जाणीव होईल.'[३३]

लक्ष्मीबाई एक वत्सल माता होत्या. आपल्या मुलांच्या संगोपनात त्या अगदी दक्ष असत. त्यांची पहिली दोन अपत्ये वारली व त्यानंतर दत्तू (देवदत्त नारायण टिळक) झाला. बाईंना अतिशय हलाखीत दिवस काढावे लागत असल्याने दत्तूला देण्यासाठी भातही नसायचा. अशावेळी लक्ष्मीबाई पैशाच्या साळीच्या लाह्या आणून त्या दुधात भिजवून दत्तूला खाऊ घालायच्या. दत्तूला दूध देण्याचीही त्यांना

विवंचना असायची. अशावेळी त्यांना आपल्या माहेरच्या संपन्नतेची आठवण यायची. भिकूताईंची श्रीमंती आठवायची. पण त्या कधीही माहेरी गेल्या नाहीत. अत्यंत धैर्याने त्यांनी आपल्या मुलाचे पालन–पोषण केले. टिळक खिस्ती होण्यासाठी मुंबईस निघाले असताना त्यांच्या कामात अडथळा यावा म्हणून त्यांनी दत्तूला बरोबर घेऊन जाण्यास सांगितले टिळकांनी दत्तूला नाशिक मुक्कामी पेंडशांच्या घरी सोडले व स्वतः एकटेच मुंबईस गेले. त्यावेळी दत्तू अवघा दोन वर्षांचा होता. पेंडशांच्याकडे तो राहीना तेव्हा जलालपुरास त्याच्या मामाकडे त्याची रवानगी करण्यात आली. तेथे त्याला गोवर झाला. पुढे सव्वा महिन्यानंतर लक्ष्मीबाईंची व दत्तूची भेट झाली तेव्हा दत्तूला पाहून लक्ष्मीबाईना रडू कोसळले.

दत्तूचे चिमखडे बोल लक्ष्मीबाईंना कसे हृदयस्पर्शी वाटायचे याचे एक उदाहरण पाहण्यासारखे आहे. लक्ष्मीबाई आपल्या भावाकडे (केशवराव मामा) असताना पिकापाण्याच्या गोष्टी निघाल्या. त्यावेळी त्यांच्या भावाची मुले दत्तूला म्हणू लागली– 'दत्तू, वघ आमची शेते कशी आहेत. आमचे बैल, नांगर कसे आहेत.' त्यावेळी लक्ष्मीबाईंच्या भावाने आपल्या मुलांना तसे न बोलण्यास बजावले. मुले त्यांचे ऐकेनात तेव्हा दत्तू आपली पाटी पुढे करीत म्हणाला, 'हे पहा माझे शेत. ही पेन्सिल माझा नांगर आणि ही बोटे माझे बैल आहेत.' 'पण तुझ्या या शेतात दाणे काही उत्पन्न होत नाहीत.' असे त्यांनी म्हटल्यावर दत्तू म्हणाला, 'ही अक्षरे माझे दाणे आहेत.'[३४] मुलांविषयी वात्सल्य निर्माण करणाऱ्या या प्रसंगाचे वर्णन करताना लक्ष्मीबाईंच्या वात्सल्याला भरते येते व त्यातून त्यांच्या मातृत्वाचे दर्शन घडते.

दत्तूचा आजार, दत्तूचे शिक्षण, दत्तूची मुंज, दत्तूचे लग्नप्रसंगी हरवणे अशा विविध प्रसंगांतून लक्ष्मीबाईंचे आपल्या अपत्याविषयीचे प्रेम व्यक्त होते.

लक्ष्मीबाईचे केवळ आपल्या अपत्यावरच प्रेम होते असे नव्हे. त्यांच्या विशाल अंतःकरणात अनेक अनाथांना स्थान मिळत गेले. हौशी, दया, चिकी, चंपा अशा अनेक मुलींचा त्यांनी सांभाळ केला व त्यांना मातृप्रेम दिले. 'देवाच्या दयेने मला बरेच मानसपुत्र व मानसकन्या आहेत.'[३५] असे उद्‌गार काढताना त्यांना धन्यता वाटते. बालकवींचाही त्यांनी मातेप्रमाणे सांभाळ केला.

नगरला प्लेग झाल्यावर लक्ष्मीबाईंनी सेग्रिगेशन कॅम्पवरही सेवाकार्य केले. रोग्यांचे खाणे पिणे, औषधपाणी, त्यांची तोंडे धुणे, त्यांना स्पंजबाथ देणे व वेळ पडली म्हणजे त्यांचा शेणगोठा करणे, ही कामे त्यांनी टिळकांच्या बरोबरीने केली. इतकेच काय पगार वाढवावा म्हणून भंग्यांनी संप केल्यावर टिळकांनी व बाईंनी भंग्याचे कामही केले. समाजसेवेच्या या कार्यात टिळक हेच त्यांचे गुरू होते.

लक्ष्मीबाईच्या एकंदर व्यक्तिमत्त्वावरच टिळकांची अमिट अशी छाप उमटलेली आहे. 'डेक्कन क्वीनच्या मागे एखादा खटारा बांधावा' त्याप्रमाणे

टिळकांशी बांधले गेलेले त्यांचे आयुष्य नंतर डेक्कन क्वीन इतकेच गतिमान झाले. टिळकांच्या सहवासाने स्वतःच्या जीवनात घडलेल्या या परिवर्तनाबद्दल त्या म्हणतात, 'महाराचा नुसता शिंतोडा अंगावर उडाल्याचा भास झाला तर साऱ्या जन्मभर स्वतःला व घरातील सगळ्यांना माझ्या वडिलांनी घासून पुसून घेतले होते. त्याच पित्याची मी कन्या वाईस भंग्याच्या घरचे अन्न खाते काय नि नगरच्या दवाखान्यात हलकी समजलेली कामे करायला धावते काय? पण यात वाणाचे झाले तर ते टिळकांनाच वाणले पाहिजे. ते माझे या बाबतीत गुरू होते.'[३६] लक्ष्मीबाईनी भगिणीच्या हातचा फराळ खाल्ला तेव्हा तर 'तू माझ्याही पुढे गेलीस'[३७] अशी टिळकांनी त्यांची प्रशंसा केली.

१९१९ ला टिळक निधन पावले व लक्ष्मीबाईंना आपला सूत्रधार गेल्याची जाणीव झाली. टिळकांनंतरही त्यांना खूप हाल-अपेष्टा सहन कराव्या लागल्या, नोकरी करावी लागली. कराची सारख्या सुदूर शहरात वास्तव्य करावे लागले. तथापि त्यांचे धैर्य त्यांना कधीच सोडून गेले नाही. त्यांनी प्रेमाने सांभाळ केलेल्या बेबीने धर्मान्तर करून हेमचन्द्र जोशी यांच्याशी विवाह केला, त्याचा जबर आघात लक्ष्मीबाईंच्या मनावर झाला. ज्या बेबीने 'ख्रिस्तायन' पूर्ण करावे अशी टिळकांची इच्छा, तिनेच ख्रिस्ती धर्म सोडल्यावर लक्ष्मीबाईनी स्वतःच ख्रिस्तायन पूर्ण करण्याचा निर्णय घेतला व अहोरात्र त्या प्रयत्नात स्वतःला झोकून दिले. टिळकांनी अपूर्ण ठेवलेल्या अकराव्या अध्यायापासून सुरुवात करून ६३ अध्यायांपर्यंत ख्रिस्तायनाचे लेखन त्यांनी केले. 'ख्रिस्तायन' पूर्ण केल्यावरच त्यांना आपले ख्रिस्ती होणे सार्थकी लागले, असे वाटले.

देवदत्त टिळकांनी त्यांच्या शेवटच्या आजारपणाचे हृदयस्पर्शी वर्णन केले आहे. शेवटपर्यंत त्यांची खेळकर विनोदबुद्धी त्यांना सोडून गेली नव्हती. त्यांना काही स्त्रिया भेटायला आल्या तेव्हा लक्ष्मीबाई म्हणाल्या, 'अग, तुम्ही माझा सत्कार-सभारंभ केलात ना? तेव्हा मला लागली आहे दृष्ट. थोड्याशा मीठ-मोहऱ्या ओवाळून टाका माझ्यावरून.'[३८]

पांगारकर बुवा त्यांना भेटायला आले. त्यांना पाहून त्या म्हणाल्या, 'या बुवासाहेब! आत्मा व कुडी यांचा झगडा चालला आहे. पाहू या आता कोण जिंकते ते.'[३९] समोर मृत्यू दिसत असताना देखील त्यांनी काढलेले हे उद्गार त्यांच्या निस्संग, व उदात्त अशा जीवनदृष्टीचे दर्शन घडवितात.

ऑपरेशनलाही त्या अगदी सहज तयार झाल्या. स्ट्रेचरवर घालून त्यांना ऑपरेशन रूममध्ये नेताना ऊन लागू नये म्हणून डॉक्टरांनी त्यांच्या तोंडावर चादर घातली. ती त्यांनी दूर सरकावून दिली व आपण भित्रे नसल्याचे सांगितले. ऑपरेशन चालू असतानादेखील त्या डॉक्टरांशी गप्पा मारीत होत्या, थट्टा-विनोद करीत होत्या.

ऑपरेशन यशस्वी झाले तरी त्यांच्या प्रकृतीचा धोका टळला नाही. शेवटी २४ फेब्रु. १९३६ ला त्यांची प्राणज्योत निमाली. टिळकांचे पुढील गीतच भजनी मंडळीने त्यांच्या अंत्ययात्रेच्या वेळी म्हटले–

जिंकुन मरणाला मरणाला
जीव कुडीतून गेला
अक्षयतेचा अधिकारी हा
इकडुन तिकडे झाला
... ...
प्रभुने ह्याला किती दयेने
अजरामर हो केला[४०]

'स्मृतिचित्रा'च्या लेखिका म्हणून व 'स्मृतिचित्रां'तील एक मनोवेधक व्यक्तिरेखा म्हणून लक्ष्मीबाई खरोखरच अजरामर झाल्या आहेत !

२. रेव्ह. ना. वा. टिळक

'स्मृतिचित्रे' ही लक्ष्मीबाई टिळकांची आत्मकथा असली तरी ती त्यांनी आपल्या पतीचे चरित्र सांगण्याच्या हेतूने लिहिलेली आहे. त्यामुळे हा अमोल ग्रंथ लक्ष्मीबाई व रे. टिळक यांच्या सहजीवनाचा चित्रपट दर्शवितो, असे म्हणावे लागेल. त्यामुळे लक्ष्मीबाई इतकेच रे. टिळकांचे व्यक्तिचित्रही यात अत्यंत प्रभावीपणे साकार झालेले आढळते. टिळकांच्या व्यक्तिचित्रणाला 'स्मृतिचित्रा'मध्ये मध्यवर्ती स्थान मिळाले आहे.

टिळकांशी लक्ष्मीबाईंचा विवाह अगदी बालपणीच झाला. त्यामुळे लक्ष्मीबाईंनी टिळकांच्या अगदी बालपणापासूनची हकीकत येथे सांगितली आहे. लग्नापूर्वी सखू नावाच्या मैत्रिणीच्या घरी त्यांची व टिळकांची पहिली भेट झाली व ती देखील टिळकांच्या कोपिष्टपणाचे दर्शन घडविणारी अशी. 'खबरदार आमच्या घरात आलीस तर ! तंगडीच मोडीन !'[४१] अशा शब्दात टिळकांनी त्यांचे स्वागत केले होते, पण याच टिळकांशी त्यांचा विवाह झाला व त्यांच्या घरी त्या पाय रोवून बसल्या.

लग्नप्रसंगातील टिळकांविषयीची एक हकीकत सांगताना त्या म्हणतात, 'स्वभावत: टिळकांना कधीच रुसता येत नसे. ते रागावत वाटेल तितके पण रुसणे फुगणे त्यांना मुळीच ठाऊक नव्हते.'[४२] टिळकांच्या स्वभावाचा हा पैलू त्यांनी अगदी सहजपणे स्पष्ट केला आहे.

टिळक हे मातृभक्त होते. त्यांना आपल्या वडिलांविषयी कधीच ओढ वाटली नाही व त्याचे कारणही तसेच सबळ होते. टिळकांच्या जन्मानंतर त्यांच्या वडिलांचे काम गेल्याने त्यांना आपल्या मुलाचा पायगुण अशुभ वाटत असे व ते त्यांना

नतद्रष्ट समजत. टिळकांच्या वडिलांनी–वामनरावांनी–टिळकांच्या आईला कधीच चांगली वागणूक दिली नाही, त्यामुळेही टिळकांना आपल्या वडिलांविषयी विशेष प्रेम नव्हते.

टिळकांच्या आई कविता रचीत हे वामनरावांना आवडत नसे. त्या कविता ते जाळून टाकीत. टिळकांच्या आईला एका ख्रिस्तीबाईने दिलेले बायबलमधील नीतीचे पुस्तकही वामनरावांनी जाळून टाकले, या घटनेचाही टिळकांच्या मनावर परिणाम झाला. रागाच्या आवेगात त्यांनी आपल्या वडिलांची खोड मोडण्याचे ठरविले व त्यांची चुन्याची डबी विहिरीत फेकून दिली. अर्थात त्यांना वामनरावांनी फोकाने मार दिला. या मारहाणीमुळे टिळक घरातून पळून गेले व सहा महिने बेपत्ता झाले. आपल्या आईला दुःख होऊ नये म्हणून ते पळून जाईपर्यंत मात्र अत्यंत शांत राहिले. टिळक घरी परतल्यानंतरही त्यांच्या वडिलांनी आपल्या वागणुकीत काहीच बदल केला नाही. त्यामुळे वामनरावांची मोरवाडचास बदली झाली तेव्हा त्यांना आनंद वाटला व ते आपल्या आईस म्हणाले, 'आई, घरात दादा नसले म्हणजे बरे वाटते. ते नेहमी बाहेर राहिले तर किती छान होईल, मग आपल्याला काहीच त्रास नाही.'[४३]

टिळक लहानपणापासून बुद्धिवादी कसे होते याचे एक उदाहरण लक्ष्मीबाईनी दिले आहे. लहानपणी टिळक हरवले होते त्यावेळी त्यांच्या आईने मारुतीला नवस केला होता की टिळक सापडल्यास आपण मारुतीला वडयाची माळ घालू. टिळक सापडल्यावर त्यांनी वडयांची माळ केली व टिळकांना ती माळ मारुतीस घालण्यासाठी दिली. पण टिळक तळ्यावर गेले आणि तेथे त्यांनी माळेतील सर्व वडे स्वतःच खाऊन टाकले व घरी परत आल्यावर ही हकीकत आपल्या आईस सांगितली. आईला वाईट वाटले तेव्हा टिळकांनी, 'तू सांगतेस ना की देव लांब नाही. तो आपल्या अंतःकरणात आहे.'[४४] असे सांगून तिची समजूत काढण्याचाही प्रयत्न केला.

एकदा वामनरावांनी स्वतःच्या आजारपणाची खोटी वार्ता देणारे पत्र लिहून टिळकांच्या आईला मोरवाडचास बोलावून घेतले. आईशिवाय टिळकांना करमत नसे. म्हणून तेही बरोबर गेले. भर उन्हामध्ये मोरवाडचाचा दुर्गम मार्ग आक्रमून ही मायलेकरे जेव्हा मोरवाडचास गेली तेव्हा वामनराव चक्क गप्पा मारीत बसलेले त्यांच्या दृष्टीस पडले. टिळकांच्या आईला आनंद झाला व त्या थोडया वेळाने धुणे धुऊन डोक्यावर हंडा घेऊन वामनरावांच्या पुढे आल्या व हंडा खाली उतरविण्यास त्यांनी त्यांना सांगितले. त्याबरोबर वामनरावांनी त्यांची मान धरून कमरेत लाथ मारली. जानकीबाई (टिळकांच्या आई) ज्या जमिनीवर पडल्या त्या पुन्हा उठल्याच नाहीत. तोंडात पाण्यावाचून काहीही न घेता राम राम म्हणत आठ दिवसांतच त्या निधन पावल्या. टिळकांच्या मनावर या घटनेचा विलक्षण परिणाम

झाला. 'न मातुः परं दैवतम्' अशी त्यांची वृत्ती होती. मातृवियोगाने दुःखी झालेले टिळक नाशकास पळून गेले. 'टिळकांच्या डोळ्यांसमोर आपल्या आईची मूर्ती एकसारखी दिसत होती व कानात तिचे राम राम हे शब्द गुणगुणत होते.'[४५] असे टिळकांच्या त्यावेळेच्या मनःस्थितीचे वर्णन लक्ष्मीबाईंनी केले आहे. नाशिक येथे टिळकांनी आपला विद्याभ्यास सुरू केला. वेदशास्त्रसंपन्न गणेशशास्त्री लेले यांच्याकडे त्यांनी संस्कृतचे अध्ययनही केले. परंतु त्यांना आपल्या आईचे विस्मरण कधीच झाले नाही. पुढे 'गंगा' नामक स्वरचित काव्य त्यांनी आपल्या आईस 'जिने स्वतः रचलेली गाणी म्हणून दाखवून मला कविताप्रिय केला व माझ्या अंगी रसिकता आणली.'[४६] असा गौरवपूर्ण उल्लेख करून अर्पिले आहे. दुसऱ्या एका प्रसंगी ते आपल्या आईसंबंधी लिहितात, 'माझी आई फार भाविक व प्रेमळ होती... मातृपणाच्या पवित्र कर्तव्यासंबंधाने माझ्या आईसारखी परिपूर्ण बाई माझ्या पाहण्यात दुसरी आली नाही.'[४७] ही विधाने त्यांच्या मातृप्रेमाची साक्ष पटवितात.

लग्नानंतर कुटुंबाची जबाबदारी अंगावर पडल्यानंतर टिळक जलालपूरला सासूरवाडी राहू लागले. जलालपुराहून जवळच असणाऱ्या गंगापूरास त्यावेळी दशावतारी नाटके होत. आपल्या मित्रांच्या आग्रहाने व स्वतःच्या आवडीने टिळक त्यात चोरून कामे करीत. या नाटकात ते स्वतः रचलेली पदे म्हणत.

टिळकांच्या स्वभावाचा एक विशेष असा की 'दृष्टीसमोर असेल ते त्यांना जीवन की प्राण असे एकदा का एखादी व्यक्ती किंवा काम दृष्टीआड झाले, की मग त्याची त्यांना पुष्कळदा आठवणही राहत नसे.'[४८] 'पांखरा येशील का परतून?' ही त्यांची कविता कोणी त्यांनाच उद्देशून म्हटली असती तर त्यात वावगे झाले नसते. मनात एखादा विचार आला की ते त्याची तडक अंमलबजावणी करीत. वडिलांनी मारहाण केली म्हणून ते घरातून पळाले. पुढे आईचे निधन झाल्यावरही ते मोरवाडचाहून पळाले व जलालपुरात सासूरवाडीला राहत असताना सासूबाईंनी तक्रार केल्यावर ते तेथूनही पळाले. अशा वेळी त्यांचा सर्वत्र शोध घेतला जाई व लक्ष्मीबाई घरी रडत बसत. 'वाऱ्यावरचा तरंग चंचल जाशिल तू भडकून' असे टिळकांविषयी त्यांना म्हणावेसे वाटे.

टिळकांचे आपल्या पत्नीवर मात्र निस्सीम प्रेम होते. आपले वडील आपल्या पत्नीस खूप त्रास देतात, हे त्यांच्या लक्षात आले होते म्हणून मुरबाड येथे लक्ष्मीबाईंविरुद्ध वडिलांनी केलेल्या तक्रारीकडे त्यांनी अजिबात लक्ष दिले नाही व ते लक्ष्मीबाईंना घेऊन तडक मुंबईस गेले. टिळकांच्या सहानुभूतीचा व प्रेमाचा आधार होता म्हणून लक्ष्मीबाईंना संसाराचे दुःख व यातना सुसह्य झाल्या.

नानासाहेब पेंडशांच्या घरी असताना टिळकांनी 'माझी भार्या' हे काव्य लिहिले. या काव्यातही टिळकांच्या लक्ष्मीबाईविषयींच्या प्रेमाचे दर्शन घडते. राजनांदगांव सोडून लक्ष्मीबाई जातात त्या प्रसंगाचा टिळकांनी आपल्या डायरीत

केलेला काव्यमय उल्लेख पाहण्यासारखा आहे.

जेव्हा जेव्हा प्रिय मम सखी सोडुनी दूर जाते
तेव्हा तेव्हा स्थिती मम अशी फार वाईट होते
जी जी गावे त्यजुनि रिघलो चाकऱ्या सर्व ती ती
सोडी भार्याविरहविकला होऊनी चित्तवृत्ती [४९]

टिळकांचे व लक्ष्मीबाईचे एकमेकांशी पटत नसले तरी त्यांना एकमेकांशिवाय करमतही नसे. हे टिळकांनी आपल्या काव्यात मोकळ्या मनाने कबूल केले आहे.

जवळी असता एक दिवस नच कलहावाचुन गेला।
जाता दूरी सदा चिंतितो आता मी भार्येला॥ [५०]

टिळक ख्रिस्ती झाल्यावर त्यांना दुसरे लग्न करता आले असते पण लक्ष्मीबाईवरील त्यांचे प्रेम तिळभरही कमी झालेले नव्हते. लक्ष्मीबाईनी दत्तूबरोबर आपल्याकडे यावे याचीच त्यांना ओढ लागलेली असे. पंढरपुरात पेंडशांच्याकडे लक्ष्मीबाई असताना टिळक व लक्ष्मीबाई एकमेकांना भेटले व टिळकांनी आपल्या पत्नीस तिचे कुशल विचारले. त्यानंतर लक्ष्मीबाईस लिहिलेल्या पत्रात ते म्हणतात, '... परमेश्वर तुला बुद्धि देईल तेव्हा मुलाला घेऊन ये. मी मात्र तुझी नेहमी वाट पाहीन. तुम्हाला त्रास होईल असे मी येथून पुढे काही करणार नाही. मी एकपत्नी व्रताने राहीन. त्याची मुळीच काळजी करू नको.' [५१]

लक्ष्मीबाईना एकदा पैशाची गरज होती. भावाबहिणींच्या नकळत त्यांना ते मागायचे होते. त्यावेळी त्यांनी टिळकांना लिहिले, 'मी तुम्हाला एक गुप्त गोष्ट लिहिणार आहे. तरी मला वचन द्या की कुणाला सांगणार नाही म्हणून.' यावर टिळकांनी उत्तर दिले, 'माणूस चुकणारा प्राणी आहे. मोठमोठ्या ऋषिमुनींच्या हातून चुका घडल्या आहेत. झाले त्याबद्दल काहीच वाईट वाटून घेऊ नको. तुला जरी तुझ्या सर्व नातलगांनी किंवा जगाने सोडले तरी मी तुला कधी सोडणार नाही. तू म्हणत असशील तर मी तुला नेण्यास येतो. प्रकृतीला जपत जा.' [५२] लक्ष्मीबाई हे पत्र वाचून हतबुद्ध तर झाल्याच पण टिळकांचे त्यांच्यावरील उत्कट प्रेम पाहून त्यांना अत्यंत समाधानही वाटले.

लक्ष्मीबाईनी आपल्याकडे यावे म्हणून टिळकांचे प्रयत्न अखंडित चालूच होते. लक्ष्मीबाई पंढरपुरास बहिणीकडे गेल्यावर टिळकांची तार तेथे आली.– 'गो सेज फादर कमिंग.' टिळकांना परमेश्वरी कौल मिळाला होता की त्यांची पत्नी त्यांच्याकडे येईल. म्हणून ते पंढरपुरास बाईच्याकडे येण्यास निघाले होते. त्यांच्या डायरीत पुढील हृदयस्पर्शी उल्लेख सापडतो.–'रात्री दारावरून बग्गी गेली की माझे कुटुंब आले आहे म्हणून मी खिडकी उघडून पहावे! यात एक वाजेपर्यंत जागलो! देवा! हचा दीन दासावर व त्या दीन दासीवर आणि त्या अज्ञ अर्भकावर दया कर. तुझ्याच गौरवार्थ आम्हाला एकत्र कर. माझा विश्वास आहे हचा आठवड्यात

माझ्या प्रार्थनेचे मला उत्तर मिळेल.' [५३] यावरून पत्नीविरहाने तिळतिळ तुटणाऱ्या टिळकांच्या अंतःकरणाची कल्पना येते. एकदा त्यांना कोणीतरी दुसऱ्या विवाहाची गळ घातली व त्यांच्यासाठी एक चांगली सुंदर मुलगीही दाखविली. त्यावेळी त्यांनी 'माझे मला द्या' ही कविता लिहिली–

ताऱ्यांची माला । नको मज द्या त्या सुमनाला !

असे टिळकांनी आपले हृद्‌गत त्या कवितेत व्यक्त केले आहे निसर्गात विविध प्रकारची फुले असली तरी मला माझे श्यामल फूलच आवडते. त्या फुलाला उद्देशून ते म्हणतात–

सख्या फुला ! मी गाणी गाइन सदैव रे तुजला । मधुरशी
जीव असे तो अश्रु वाहुनी करिन पूजनाला । तुझ्या मी
विरही तुझिया जळून मरावे हेच पुरे याला । यापुढे
हाच सुखाचा परमावधि झाला.

या कवितेखाली त्यांनी खालीलप्रमाणे टीपही दिली आहे–

एका एकनिष्ठ पतीस, आपल्या विरहांतरित पत्नीचा त्याग करून दुसरा संबंध करण्याविषयी एका गृहस्थाने सूचना केली. या सूचनेला हे त्या विरहव्याकुल दीन व प्रेमळ पतीचे उत्तर आहे. [५४]

लक्ष्मीबाई टिळकांकडे परतल्यावरही टिळकांनी त्यांना दिलासा दिला, 'मी तुला कधीच जुलमाने खिस्ती करणार नाही. मला तो धर्म आवडला म्हणून मी तो स्वीकारला. तुला आवडला व तू खिस्ती झालीस तर मला आनंद वाटेल. पण मी कधी जुलूम करणार नाही.' [५५] यावरून टिळकांचे विशाल अंतःकरण व पत्नीबद्दल असणारी त्यांची अपार सहानुभूती यांचे दर्शन घडते.

आपल्या बायकोने लेखिका, कवयित्री, वक्ती व्हावे अशी त्यांची इच्छा होती. 'वक्तृत्व, कवित्व, कीर्तन, फार काय पोहणेसुद्धा टिळकांनी त्यांना शिकविले आहे.' [५६] अशी माहिती अशोक देवदत्त टिळकांनी दिली आहे. कीर्तनकार लक्ष्मीबाईंचा निर्देश ते 'बोवा' म्हणून करायचे. 'गुरू तो गुडही रहे चेला शक्कर भये' या शब्दांनी ते नेहमी त्यांचे कौतुक करायचे.

टिळकांचे लक्ष्मीबाईंवर इतके प्रेम होते की त्यांनी आपल्या मृत्युपत्रात त्यांना आवडणाऱ्या माणसांची जी यादी दिली आहे तिचा आरंभच मुळी 'मला आवडणारी माणसे १ माझी बायको' [५७] असा केला आहे.

लक्ष्मीबाई टिळकांनी सांगितलेल्या आठवणीतून टिळकांच्या स्वभावाचे विविध पैलू दृष्टोत्पत्तीस येतात. टिळकांना बोलण्याचा फार नाद असे. आपल्या मित्रमंडळीबरोबर बोलत असताना त्यांना वेळेचे भान राहत नसे. एकदा नाशिक रोड स्टेशनवरून गाडी धरण्यासाठी टिळक व लक्ष्मीबाई स्टेशनवर आले. लक्ष्मीबाईंना सामानासह प्लॅटफॉर्मवर बसवून ते तिकीट आणावयास निघून गेले. गाडी आली,

लक्ष्मीबाई गाडीत बसल्या. गाडीने शिट्टी दिली तेव्हा त्या भराभर सामान फेकून उडी मारून खाली उतरल्या. गाडी निघून गेली, तेव्हा टिळक पलीकडच्या प्लॅट-फॉर्मवर कोणाशी वादविवाद करण्यात गर्क झालेले त्यांना दिसले !

टिळकांच्या विसराळूपणाचेही काही किस्से लक्ष्मीबाईंनी सांगितले आहेत. टिळकांच्या चीजवस्तू नेहमी हरवत. दात, आगपेटी, टोपी, चष्मा, पट्टा या चार-पाच जिनसा नेहमीच त्यांच्या हातातून निसटत. या वस्तू जणू त्यांच्याशी लपंडाव खेळायच्या व त्या हुडकण्यासाठी घरातील लोकांच्या फुगडया सुरू व्हायच्या. कित्येकवेळा टिळकांना टोपीवाचून जावे लागे. पट्टयाऐवजी दोरखंड कमरेला गुंडाळावे लागे. 'माझी व्यवस्था कोणीच ठेवीत नाही. जे ते आपल्याच व्यवसायात दग ! माझी कोणाला पर्वाच नाही !' असे ते म्हणायचे. एकदा त्यांचे दात हरवल्या-वर सारे सरपण उपसून त्यांनी ते कंपाउंडच्या बाहेर फेकावयास लावले. शेवटी दातांचा डबा सापडला टेबलावर ! एकदा त्यांची टोपी हरवली तेव्हा चिडून त्यांनी त्यांचा कोट रागाने जमिनीवर आदळला व त्यावर घरातील इतर कपडयांचा ढीग केला. शेवटी या ढिगाखाली फेकलेल्या कोटातच त्यांची टोपी सापडली !

टिळकांच्या कोपिष्ट स्वभावाचेही लक्ष्मीबाईंनी काही प्रसंगांतून दर्शन घडविले आहे. एकदा सोंगटया खेळताना टिळकांवर डाव उलटू लागला व लक्ष्मी-बाई हसू लागल्या. तेव्हा चिडलेल्या टिळकांनी त्यांना जिन्यातून खाली ढकलून दिले होते. दुसऱ्या एका प्रसंगी टिळक, लक्ष्मीबाई, बालकवी ठोंबरे इ. सोंगटया खेळत असताना टिळकांना सरशी होण्यासाठी 'दोन' पडावयास हवे होते. त्यांनी कवडया टाकल्या, पण एक कवडी पडली उताणी व एक पडली कुशीवर. टिळक म्हणू लागले, 'दोन' पडले व लक्ष्मीबाई म्हणू लागल्या, 'दहा' पडले. टिळकांनी बालकवींना विचारले, 'काय आहेत रे हे ?' ठोंबरे म्हणाले, 'हे दोनही नाहीत आणि दहाही नाहीत, दीड आहे !'[५९] टिळकांनी शेवटी सोंगटया, पट, कवडया ही सारी घरासमोरील कंपाउंडांत फेकून दिली.

एकदा त्यांनी तांदळाच्याऐवजी एक सुंदर काचेची दौत विकत आणली व लक्ष्मीबाई रागावल्यावर ती दौत फेकून दिली व वर 'तुला मानसशास्त्र समजत नाही'[६०] असा शेरा मारला. टिळकांनी खिस्ती झाल्यावर व लक्ष्मीबाई त्यांच्या-कडे परतल्यावर काचेचे खूपच सामान विकत घेतले. त्याबद्दल लक्ष्मीबाईंनी-नापसंती व्यक्त केली. तेव्हादेखील लक्ष्मीबाईंना 'तुला' 'ॲप्रिसिएशन' नाही'[६१] असा शेरा मिळालाच.

राहुरी येथे असताना एकदा रात्री पुस्तकांच्या कपाटावर ठेवलेला सायकलचा दिवा भडकून मोठा जाळ झाला. सर्वजण तेथे धावून गेले. लक्ष्मीबाईंनी दत्तूला दिव्यावर राख टाकण्यास सांगितले, तर टिळक पाणी टाकण्यास सांगत होते. शेवटी दत्तूने दिवा खाली पाडला व त्यावर राख टाकून तो विझविला.

टिळकांना यात आपला अपमान झाल्यासारखे वाटले व ते दत्तूला खूप रागावले. 'माझे घर जळेल. मी मालक आहे.' [६२] असे उद्‌गारही त्यांनी रागाच्या भरात काढले. शेवटी त्यांची चूक त्यांना उमगली व 'तोंवरि संताप, संताप। जोंवरि पदरी पाप' असे काव्य त्यांनी लिहिले.

राहुरी सोडून नगरास आल्यावर टिळकांना वेब्स्टरच्या डिक्शनरीची आठवण झाली टिळकांना वाटू लागले की दत्तूनेच डिक्शनरी गहाळ केली. पण दत्तू म्हणू लागला की ती राहुरीमध्येच राहिली. टिळक संतापले व त्यांनी दत्तूवर खोटे बोलण्याचा आळ घेऊन त्याच्या पाठीवर पुस्तके फेकण्यास सुरुवात केली. व तोंडाने बडबड करू लागले की, 'मी–तुझ्या–हातात–डिक्शनरी–पाहिली–होती. मला खोटे ठरवितोस? तुम्ही सर्वांनी मिळून विचारच केला आहे का की माझा पाणउतारा करायचा?' [६३] मात्र दोन महिन्यांनी राहुरीस गेल्यावर त्यांना ती डिक्शनरी तेथेच असल्याचे आढळले व नगरास परत आल्यावर त्यांनी दत्तूची क्षमा मागितली. त्यानंतर दत्तूच्या अंगाला शेवटपर्यंत त्यांनी कधी बोट लावले नाही.

महादेवभाऊजी व टिळक यांच्या स्वभावाबद्दल लक्ष्मीबाई म्हणतात, 'राग, प्रेमळपणा, दयालुत्व व थोडासा विक्षिप्तपणा ही सारी हचा दोघाही भावांच्या अंगी होती.' [६४] सबंध 'स्मृतिचित्रा' मध्ये टिळक व लक्ष्मीबाईच्या परस्पर–विरुद्ध स्वभावाचे अनेक दाखले सापडतात. म्हणून प्रभाकर पाध्ये म्हणतात, 'नारायण वामनांचा तालेवार संतापीपणा आणि लक्ष्मीबाईंचा सोशिक विनोद यांच्या संसाराची संघर्षचित्रे म्हणजेच ही स्मृतिचित्रे प्रामुख्याने होत.' [६५] –टिळक व लक्ष्मीबाई यांच्यात खटके उडत असले तरी त्या उभयतांच्या प्रेमात कधीच अंतर पडले नाही. अनेकदा अशा कलहातून टिळकांचो कविता जन्मली आहे. टिळक दांपत्याच्या लहान–सहान भांडणामागे परस्परानुरति आणि क्रोडावृत्तीच दिसून येते.

टिळकांची विनोदाबद्दल विशेष ख्याती नव्हती. लक्ष्मीबाईच त्यांच्या विनोद-बुद्धीविषयी प्रसिद्ध होत्या. 'ते विद्वान मी विनोदी. पण त्यांची विद्वत्ता माझ्या विनोदाच्या आड येत नसे व माझा विनोद त्यांना त्रास देत नसे.' [६६] हे लक्ष्मीबाईंचे विधान त्या दृष्टीने अर्थपूर्ण आहे. तथापि टिळकांना विनोदाचे वावडे नव्हते, हे 'स्मृतिचित्रा' तून दिसून येते.

राहुरीस राहत असताना लक्ष्मीबाईंची बापू नामाजी आढाव या ख्रिस्ती गृहस्थाशी भेट झाली. त्यांचे वागणे, कपडे वगैरे अगदी शुचिर्भूत ब्राह्मणासारखे असे. लक्ष्मीबाईनी टिळकांना विचारले. 'हे कोण ब्राह्मण आहेत हो?' टिळकांनी सांगितले, 'हे गुडशस्त ब्राह्मण आहेत!' [६७] लक्ष्मीबाईनी देशस्थ, कोकणस्थ, कऱ्हाडे वगैरे ब्राह्मणांच्या पोटजाती ऐकल्या होत्या पण हो जात मात्र कधी ऐकली नव्हती. त्यामुळे त्यांना टिळकांचे बोलणे त्यावेळी पटले. गुडशस्त ब्राह्मणाचा अर्थ पुढे

कित्येक वर्षांनी त्यांना कळला. गुडसा म्हणजे जनावराचे नळीचे हाड– या शब्दावरून टिळकांनी गुडशस्त हा शब्द तयार केला होता. गुडशस्त म्हणजे हाडे ठोकणारे !

पेंडशांच्या घरी असताना एका ज्योतिषीबुवाने टिळकांचा हात पाहिला व 'विद्येच्या नावाने शंख ! पैसा मुळीच नाही ! लग्न होणार नाही' असे भविष्य वर्तविले. त्या अगोदर टिळकांनी घारूताईवर एक कविता लिहून तिला हवे असणारे दागिने काव्यरूपाने अर्पण केले होते. त्यावर घारूताईला समाधान वाटले तरी भिकूताई मात्र फार दुःखी झाल्या व उद्वेगाने, 'इतका शिकला पढला, पण पदरी एक रुकासुद्धा नाही, एखाद्या नगडदरवेशाप्रमाणे बायकोला घेऊन दारोदार फिरतात ! घरात नेहमी नकार घंटा असते, करायचे काय ? बांगड्या भरा त्याला !'[६८] असे उद्‌गार काढले... टिळकांनी ते ऐकले व रात्री कीर्तन करीत असताना ज्योतिषी व भिकूताईंना उद्देशून पदे म्हणून दोघांची फजिती केली. त्यांनी 'माझे ग्रह फिरले ग्रह फिरले' हे पद ज्योतिषीबुवाना उद्देशून तर 'वेडा झालो खरा गडचांनो वेडा झालो खरा' हे पद भिकूताईंना उद्देशून म्हटले.

राहुरीस वास्तव्य असताना एकदा टिळक पती–पत्नीचे खटके उडाले व लक्ष्मीबाईनी अबोला धरला. त्या रात्री टिळक लिहीत बसले व लक्ष्मीबाई रडत बसल्या. सकाळचा चहाही मुकाटचाने झाला. त्यानंतर टिळक सायकल घेऊन बाहेर पडले व त्यांनी घरोघर जाऊन बायांना लक्ष्मीबाईंच्या नावाने चहाला आमंत्रण दिले. दुपारी बाया जमा झाल्या तरी लक्ष्मीबाई झोपलेल्याच होत्या. त्या उठून बघतात तो बायांचा घोळका. त्यांना कळेना हा काय प्रकार आहे. शेवटी सावित्रीबाई ओहोळांनी त्यांना चहाच्या निमंत्रणाचे सांगितले व नंतर लक्ष्मीबाईंनी सर्व कार्यक्रम उरकला. टिळक आल्यावर लक्ष्मीबाई म्हणाल्या,

'का हो बायांना बोलावले ?'

'मग तू अबोला धरलास तर तुला बोलायला कसे लावायचे ?'[६९] टिळक उत्तरले. त्यानंतर त्यांचा अबोला सुटला.

वरील प्रसंगातून टिळकांच्या विनोदबुद्धीचे दर्शन घडते. म्हणूनच 'टिळकांपाशी विनोदबुद्धी नव्हती, कारण विनोदबुद्धीचे त्यांच्या अहंकाराशी पटणे शक्यच नव्हते,'[७०] या प्रभाकर पाध्ये यांच्या मताशी सहमत होणे कठीण आहे.

टिळकांच्या जीवनाचा प्रवास संतत्वाच्या दिशेने चालू होता. त्यामुळे त्यांना संसाराचा मोह तसा नव्हताच. पैशाचीही त्यांना पर्वा नसायची. 'निःस्पृहस्य तृणं जगत्' अशी त्यांची वृत्ती होती. ते नेहमी प्रार्थना करीत, 'देवा, मला नेहमी दरिद्री ठेव. मला पैसा नको.'[७१] 'हचा पैशाचे नकोत अमुच्या करांस हृदया चटके' अशी एक कविताही त्यांनी लिहिली आहे. पैसे आले की ते इतरांसाठी खर्चून टाकत. लक्ष्मीबाई मात्र व्यवहारी होत्या. 'देवा, मला कर्ज नको' ही त्यांची प्रार्थना

असे. देव दोघांच्याही प्रार्थना ऐकत असे.

साताऱ्यास दुष्काळाच्या मागोमाग दुखणे सुरू झाले. मानमोडीचा रोग पसरला. त्यावेळी टिळकांनी अल्प दवाखाना व स्वल्प अन्नछत्र खुले केले. औषध व अन्नपदार्थ गोरगरिबांना वाटून त्यांनी त्यांचा दुवा घेतला. अशा प्रसंगातून टिळकांची मानव जातीबद्दलची कणवच दिसून येते.

नगरला प्लेग झाल्यावर टिळक सपत्नीक सेग्रिगेशन कँपमध्ये राहून रोग्यांची सेवा करीत. रोग्यांचे 'खाणे–पिणे, औषधपाणी, त्यांची तोंडे धुणे, त्यांना स्पंजबाथ देणे व वेळ पडली म्हणजे त्यांचा शेणगोठा करणे,' ही कामे ते करीत. अशावेळीही त्यांच्यावर टीका करणारे काही निंदक होते पण 'कामाच्या आवडीपुढे त्यांना मानापमानाची पर्वा नसे तशीच कीर्तीचीही पर्वा नसे'[७२] असे लक्ष्मीबाई सांगतात.

राहुरी येथे मि. फेअर बँक यांच्या सहाय्याने टिळकांनी घर बांधले. तेथे टिळकांनी शेतीचे प्रयोग केले. हरबरा चांगला पिकला पण तो लोकांनीच खाल्ला. दोन पायली हरबरा पेरून दोन शेर हरबरा घरी आला. याठिकाणीच टिळकांनी देवाचे काम पैसे घेऊन करायचे नाही, असे ठरविले व मिशनचे काम सोडून दिले. 'व्हालंटियर्स' जमा करून त्यांनी एक संघ स्थापण्याचे ठरविले. 'या व्हालंटियर्स' साठीही त्यांना खूप झीज सोसावी लागली. टिळकांच्या या अव्यवहारी स्वभावाचा त्रास लक्ष्मीबाईंना होत असे. मिशनच्या वार्षिक सभेला येणाऱ्या सर्व मंडळींना तीन वेळेचे जेवणाचे व चहाचे आमंत्रण टिळकांनी दिले. त्यापूर्वी घरात काय कमी-जास्त आहे याची चौकशीही केली नाही अशावेळी लक्ष्मीबाईंशी त्यांचे खटके उडत. टिळकांच्या मागे 'गोसावी, बैरागी, बोकेसन्यासी' नेहमी गोळा होत व ते टिळकांच्या मानवतावादी व निष्कपट वृत्तीचा फायदा घेऊन त्यांना लुबाडीत. अशा लोकांना वठणीवर आणण्याचे काम लक्ष्मीबाईना करावे लागे.

टिळक फार उदार वृत्तीचे होते. वणोस असताना देवीचे धर्मशाळेत जाऊन जाऊन टिळक सापडतील त्या भुकेल्या माणसांना अन्नपाणी आणून द्यायचे, कोणाला कपडे तर कोणाला औषधपाणी द्यायचे. नागपूरला त्यांनी फटाक्याचे दुकान काढले पण बालमित्रांसमवेत सर्व फटाके उडवून टाकले. राहुरीस बांधलेले घर, शेत–विहिरीसह त्यांनी विकून टाकले व आलेली रक्कम एका गृहस्थाला त्याचे कर्ज फेडण्यास दिली. लक्ष्मीबाईंच्या मनाची खूप तगमग झाली. त्या लिहितात– घर गेले. घर बांधून देणारे गेले. घेणारे गेले. डोळ्यांचे पाणी गेले. आठवणी मात्र पाणीदार अजून आहेत.'[७३] टिळक वारंवार स्थलांतर करीत. अशावेळी घर बदलणे भाग असे. पण घर सोडताना टिळक घरातील सामान कुणालाही देऊन टाकीत.

टिळकांच्या लहरी, विक्षिप्त स्वभावाचे नमुनेही लक्ष्मीबाईंनी वाचकापुढे ठेवलेले आहेत. राहुरीचे घर विकल्यानंतर टिळकांनी एक म्हैस घेतली. तिच्या शेणाच्या गोवऱ्या वाळत टाकल्या की चोरीला जात. टिळकांनी त्यावर युक्ती

सुचविली. एक मोठे चुलंगण करून त्यावर पत्रा ठेवून गोवऱ्या भाजाव्यात. यावर सर्वजण हसू लागले. टिळकांना मात्र खूपच राग आला. घराच्या दारासमोर खड्डा खणला आणि त्यावर पत्रावळ टाकून तो झाकला म्हणजे चोर त्यात पडेल अशी भाबडी कल्पनाही त्यांना एकदा सुचली होती.

धर्मांतर ही टिळकांच्या आयुष्यातील तसेच तत्कालीन महाराष्ट्राच्या सामाजिक जीवनातील एक महत्त्वाची घटना होय. विविध धर्मतत्त्वांचा अभ्यास करीत असताना ख्रिस्ती वाङ्मयाने त्यांच्या मनाला शांती लाभू लागली. त्यामुळे त्यांच्या मनाचा कल ख्रिस्ती धर्माकडे होऊ लागला. 'हिंदुधर्मांचा यथानुशक्ति शोध करीत असता वेद वेदांत वगैरेने किंवा महमदी धर्माची माहिती मिळवीत असता अत्यंत आवेशी मुसलमानांच्या भाषणाने जो आनंद झाला नाही तो ही ख्रिस्ती पुस्तके वाचीत असता मला होत आहे.' [७४] असे टिळकांनी आपल्या डायरीत लिहून ठेवले आहे. नानासाहेब पेंडसे, श्रीमंत आप्पासाहेब बुटी व इतर अनेकांनी त्यांचे मन वळविण्याचा प्रयत्न केला, पण तो व्यर्थ ठरला. द्रव्याचा, इस्टेटीचा वा कुटुंबाला तहहयात पोसण्याचा त्यांचा देकार टिळकांना धर्मान्तरापासून परावृत्त करू शकला नाही. १० फेब्रु १८९५ रोजी त्यांनी मुंबईस अमेरिकन मिशनच्या भजनालयात बाप्तिस्मा घेतला व ते ख्रिस्ती झाले. 'टिळक संत होण्याच्या प्रयत्नांतली एक पायरी म्हणून ख्रिस्ती झाले' [७५] असे टिळकांच्या धर्मान्तराबर गंगाधर गाडगीळ यांनी भाष्य केले आहे. आपण ख्रिस्ती झालो तरी आपली उत्कट स्वदेश भक्ती कायमच राहील याची ग्वाही त्यांनी 'स्वदेशाभिमान' या कवितेत दिली आहे–

रविप्रकाशे कमल वाढते परि नच सोडि जलाला।
ख्रिस्त यशोरत झालो तरि मी सोडि न जन्मधरेला ॥[७६]

आपल्या मृत्युपत्रातही त्यांनी 'मी जितकी आपल्या देशावर प्रीति करतो तितकी मी आपल्या आईबापांवर, बायकोवर, लेकरांवर, मित्रांवर फार काय स्वतःवरही केलेली नाही...' [७७] असे लिहून ठेवले आहे.

टिळक हे तसे 'मुला–फुलांचे कवी' म्हणून ओळखले जातात. पण त्यांनी ख्रिस्ती झाल्यावर पुष्कळ भजने व अभंग लिहिले. पुढे 'अभंगांजलि' म्हणून ते पुस्तकरूपाने प्रसिद्ध झाले. अनेक कवींच्या भक्तीपर कवनांचा एक संग्रह 'उपासना-संगीत' या नावाने त्यांनी संपादित केला. भजन–कीर्तनाप्रमाणे पुराण सांगणे ख्रिस्ती समाजात रूढ व्हावे म्हणून त्यांनी 'ख्रिस्तायन' लिहिण्यास आरंभ केला. टिळकांच्या भजनांचा एक संग्रह 'भजनसंग्रह' या नावाने पं. रमाबाईंनी प्रसिद्ध केला. याशिवाय 'ज्ञानोदय' या ख्रिस्ती पत्राचे संपादनही टिळकांनी सतत आठ वर्षे केले. टिळकांच्या धर्मान्तराने त्यांच्या जीवनाप्रमाणे त्यांच्या लेखनाचीही दिशा बदलली.

टिळक ख्रिस्ती झाले तरी त्यांची स्वतंत्रबुद्धी त्यांना सोडून गेली नाही. वेळ-प्रसंगी गोऱ्या मिशनऱ्यांना देखील त्यांची परखड मते ऐकून घ्यावी लागत. टिळक ख्रिस्ती झाले तेव्हा 'मी हिंदी माणसाच्या हातून बाप्तिस्मा घेणार' असा आग्रह त्यांनी धरला व गोऱ्या मिशनऱ्यांना तो मान्य करावा लागला. देवाचे काम पैसे घेऊन करायचे नाही, असे ठरवून त्यांनी 'व्हालंटियर्स' संघटना सुरू केली. ही देखील मिशनऱ्यांवर अप्रत्यक्षपणे टीकाच होती. पण टिळकांपुढे ते निमूटपणे गप्प बसले. मद्रास येथे ते उपासना चालवायला गेले असताना त्यांना अस्पृश्य ख्रिस्ती चर्चबाहेर बसलेले दिसले तेव्हा तेही त्यांच्यामध्ये जाऊन बसले. हा त्यांचा निषेधही मिशनऱ्यांना खपवून घ्यावा लागला. हिंदी ख्रिस्ती लोकांच्या दुर्गुणांची व मिशनरींनी त्यांना आणलेल्या पांगळेपणाची त्यांना चीड येई. यावर एकदा आवेगाने बोलताना टिळकांनी मूठ आपटल्यामुळे टेबल फुटले होते.

ख्रिश्चन लोक दफनविधीच्या वेळी काळा पोषाख करतात; पण ही पद्धतही टिळकांना रुचलेली नव्हती. 'काळी गाडी, काळा घोडा, काळी पेटी, काळे लुगडे, काळचा फिती, पत्राभोवती काळी बॉर्डर! हे आहे काय? देवाकडे जाणे हे का अशुभ आहे?' [७८] असे ते म्हणत. मृत्यूनंतर 'मला सर्व शुभ्र असू द्या' अशी सूचना त्यांनी लक्ष्मीबाईना देऊन ठेवलेली होती. टिळक अंगात भगवी कफनी घालीत हातात चिपळ्या व पायात चाळ बांधून नाचत व इतरांनाही आपल्याबरोबर नाचवीत. हा सर्व प्रकार तत्कालीन ख्रिस्ती धर्मीयांना नवीन व चमत्कारिक वाटला असेल, पण आपल्या बुद्धीचा कौल मिळाल्यावर टिळक इतर गोष्टींची पर्वा करीत नसत. अगदी लहानपणीसुद्धा देशातील जातिभेदाची चीड येऊन 'एकंदर दानधर्माचा मक्ता ब्राह्मणांकडेच का?' [७९] या विषयावर ते बोलले होते.

टिळकांचे मृत्युपत्र त्यांच्या धीरोदात्त मनोवृत्तीचे दर्शन घडविते. कालमर्यादा ही जीविताची व्याख्या नसून उपयुक्त कार्यकर्तृत्व ही आहे, असे प्रतिपादन त्यांनी आपल्या मृत्युपत्रात केले आहे. आप्तमित्रांनी आपली कबर उभारल्यास त्यावर 'पुष्कळ अजुनी उणा। प्रभु, मी पुष्कळ अजुनी उणा॥' हा चरण कोरावा; आपले नाव मराठीत लिहावे व त्याच्या अगोदर रेव्हरंड अगर मि. अगर रा. रा. असे उपपद लावू नये, अशा सूचना त्यांनी दिल्या आहेत. त्यातून त्यांच्या ऋजू स्वभावाचे दर्शन घडते. मृत्यूबद्दलची त्यांची कल्पनाही अत्यंत भव्योदात्त अशी आहे. ते म्हणतात, "देवाज्ञेला मी कधीही 'मृत्यु' म्हणणार नाही; कारण ती देवाची आज्ञा आहे. ती नवजीवनजागृती आहे.' [८०] मृत्यूनंतर आपले दहन करावे, अशीही सूचना त्यांनी केली आहे. ९ मे १९१९ रोजी टिळक ख्रिस्तवासी झाले. त्यांच्या अंत्ययात्रेला भजनी मंडळीने टिळकांचेच भजन– भय काय तया प्रभु ज्याचा रे – म्हटले. 'त्याचे सूर व शब्द आज सोळा वर्षे झाली आहेत, तरी माझ्या कानात तसेच घुमत आहेत असे वाटते,' [८१] अशा हृदयद्रावक शब्दांत लक्ष्मीबाईनी या

प्रसंगाचे वर्णन केले आहे.

टिळकांच्या स्वभावातील, वागण्यातील आंतरविरोधाचे चित्रण लक्ष्मीबाईनी अगदी सहजपणे केले आहे. एका संतापी, नादिष्ट, अव्यवहारी पण कविहृदयी पुरुषाच्या संतत्वाच्या दिशेने चाललेल्या प्रवासाचे चित्रण यथातथ्य करण्यास लक्ष्मीबाईंच्या लेखणीस अपूर्व यश मिळाले आहे.

रेव्ह. टिळक व लक्ष्मीबाई यांच्या व्यक्तिरेखा हे 'स्मृतिचित्रां'चे मुख्य आकर्षण आहे. 'स्मृतिचित्रे' वाचीत असताना लक्ष्मीबाई व ना. वा. टिळक यांच्या व्यक्तिरेखा साक्षात् आपल्या डोळ्यांसमोर उभ्या राहतात इतके त्यांचे चित्रण जिवंत झालेले आहे, [८२] हा अ. ना. देशपांडे यांचा अभिप्राय लक्ष्मीबाई टिळकांच्या व्यक्तिचित्रण कौशल्याची साक्ष देणारा आहे. आत्मचरित्रामध्ये केवळ चरित्रनायकाचे वा चरित्रनायिकेचे चित्रण येणे उपयोगाचे नसून त्यांच्या जीवनाशी संबंधित असणाऱ्या त्यांच्या आप्त–स्वकीयांचे, मित्रमंडळीचेही चित्रण असावयास हवे. त्यामुळे आत्मचरित्र–लेखकाचेच व्यक्तिमत्व अधिक उजळून निघाल्याशिवाय राहत नाही. या संदर्भात लक्ष्मणराव चिपळूणकरांनी आपले ज्येष्ठ बंधू विष्णुशास्त्री चिपळूणकरांच्या चरित्र लेखनानिमित्ताने व्यक्त केलेले विचार महत्त्वाचे वाटतात. ते म्हणतात, 'ज्याप्रमाणे फोटोग्राफमध्ये एखाद्या प्रसिद्ध पुरुषाचे एकट्याचेच चित्र न काढता त्याच्या भोवतालील मंडळी काही त्याच्या शेजारी बसलेली, काही मागे अंमळ दूर व काही त्याहीपेक्षा मागे उभी राहिलेली अशी– दाखविल्याने मूळ मुख्य पुरुषाचे चित्र अधिक खुलते, त्याप्रमाणे चरित्रनायकाच्या आप्त, स्नेही वगैरे मंडळींच्या थोड्याबहुत वर्णनाने मूळ पुरुषाचा स्वभाव, त्याचे गुणावगुण वगैरे गोष्टी अधिक चांगल्या लक्षात येतात.'[८३]

'स्मृतिचित्रे' ही केवळ ना. वा. टिळक व लक्ष्मीबाई यांच्या सहजीवनाची कहाणी नसून एका विशिष्ट काळातील समाज व त्यातील भिन्न भिन्न प्रकृतीचे स्त्रीपुरुष यांचे दर्शनही त्यात घडते. लक्ष्मीबाई या बहिर्मुख वृत्तीच्या असल्याने सहवासात आलेल्या प्रत्येक व्यक्तीचे गुणदोष त्यांनी आपल्या तीव्र निरीक्षणशक्तीने टिपून घेतले आहेत, व त्यांचो छोटी छोटी स्वभावचित्रे समजुतीने व प्रभावीपणे चितारून त्यांना अविस्मरणीय करून ठेवले आहे.

३. नाना गोखले

लक्ष्मीबाईनी आपली आत्मकथा बालपणापासून सांगावयास सुरुवात केल्याने साहजिकच त्यांच्या वडिलांचे– नाना गोखल्यांचे– व्यक्तिचित्रण प्रथम लक्ष वेधून घेते. संसाराच्या ऐन भराच्या काळात त्यांना सोवळे झाले होते. आपल्या सासऱ्यांना ते पितृस्थानी मानीत व त्यांचे सासरेही (वासुदेव भगवंत जोगळेकर) त्यांच्यावर पुत्रवत् प्रेम करीत. सत्तावन सालच्या बंडात त्यांना फाशी झाल्यावर नाना पंच-

वटी तपोवनात गेले. ते जे सकाळी गेले, ते संध्याकाळीच ओलेत्याने परत आले. त्याचे कारणही त्यांनी सांगितले, 'मी तपोवनात गेलो होतो; तेथे एक महार तोंड धूत होता. आणि त्याचा शितोडा माझ्या अंगावर उडाला. मला त्याचा विटाळ झाला आहे.'[८४] १८५७-५८ साली नानांना झालेले हे सोवळे शेवटपर्यंत म्हणजे पंचवीस-सव्वीस वर्षे कायम राहिले. त्यांचे सोवळे हे त्यांच्या कर्मठपणाचेच निदर्शक होते.

त्यांचे हे सोवळे फार कडक असे. त्यामुळे केवळ घरदारच नव्हे तर सारा गाव त्रासून गेला होता. त्यांना ब्राह्मणांचा सुद्धा विटाळ व्हायचा. सकाळी बाहेर गेलेले नाना संध्याकाळीच परत यायचे. व त्यानंतर सायंसंध्या, जपजाप्य व देव-पूजा करायचे. स्वयंपाक घरावर ते करडी नजर ठेवून असायचे. बाहेरून येणाऱ्या सर्व जिनसा ते धुऊन घेण्यास लावीत. तिखट-मीठसुद्धा धुऊन घ्यावे लागे. लक्ष्मी-बाई म्हणतात, 'मीठ, साखर धुण्याचे काम जोपर्यंत आई किंवा आजीकडे असे तोपर्यंत ती कधी विरघळली नव्हती !'[८५] परंतु मुलांनी नानांची खोड मोडण्याचे ठरविले. त्यांनी मीठ एका पंचात घालून चांगले भिजविले व तो पंचा खुंटीला टांगून ठेवला. थोड्या वेळात मीठ विरघळून गेले. नाना झोळीत पाहतात तो मिठाचा पत्ता नाही. तेव्हापासून मीठ, गूळ, साखर, तेल, तूप या गोष्टी धुऊन घरात घेण्याची आवश्यकता उरली नाही.

शेतातून आलेली धान्याची रास सुद्धा साठविण्याआधी धुऊन घेतली पाहिजे, असा नानांचा नियम होता. वीस वीस मण धान्य धुणे अशक्यप्राय काम होते. त्यामुळे घरातील स्त्रिया 'लबाडी' करीत. त्या थोडेसे धान्य धुऊन त्याचा थर सर्व राशीवर घालीत. नाना घरी आल्यावर मुलांच्या जबान्या घेत. मुलांनी जर का खरे सांगितले की घरात गोंधळ सुरू व्हायचा. न धुतलेल्या वस्तू पुन्हा धुऊन काढाव्या लागायच्या व मुलांना नानांचा यथेच्छ मार बसायचा. मुलांना मारल्या-मुळे नानांचा विटाळ व्हायचा व ते पुन्हा आंघोळ करायचे.

एकदा नाशिक येथे विक्रीस पाठविण्यासाठी जांबाच्या तीन पाट्या घरी ठेवल्या होत्या. त्या धुतल्या नसल्यामुळे नानांच्या दृष्टीने विटाळल्याच होत्या. मुलांनी ती फळे चोरून खाण्याचे ठरविले. यावेळी लक्ष्मीबाई जांब खात असताना घरी आलेल्या नानांच्या दृष्टीस पडल्या व त्यांना खूप मार खावा लागला. दुसऱ्या एका प्रसंगी लक्ष्मीबाईच्या हातून बाहुलीच्या लुगड्याचा गव्हाच्या राशीस स्पर्श झाला तेव्हा देखील गहू 'विटाळले' म्हणून नानांनी लक्ष्मीबाईस मारले होते. या त्रासाला कंटाळून लक्ष्मीबाईंनी नानांची खोड मोडण्यासाठी गंगेत जीव देण्याचे ठरविले. त्याप्रमाणे त्यांनी गंगेत उडी मारलीही. तथापि जवळच असणाऱ्या एका सदगृहस्थाने लक्ष्मीबाईंना ओढून बाहेर काढले म्हणून त्या वाचल्या. या प्रसंगावर मार्मिक भाष्य करताना लक्ष्मीबाई म्हणतात, 'नानांची खोड तर मोडली नाहीच.

माझी मात्र पुरी खोड मोडली.'[८६]

नानांच्या सोवळचाची पराकाष्ठा त्यांच्या आईच्या मृत्यूप्रसंगी दिसून आली. मृत्युशय्येवर पडलेली आई, 'नाना, नाना' म्हणत असताना त्यांनी तिला निरोप पाठविला की, 'थांब्न. माझी स्नानसंध्या होईपर्यंत मरू नको !'[८७]

नानांच्या सोवळचाच्या हकिकतीतून नानांचे व्यक्तिचित्र जसे साकार झाले आहे, त्याचप्रमाणे लक्ष्मीबाइचे बालपणही साकार झाले आहे.

४. भिकूताई

भिकूताई ही लक्ष्मीबाईची थोरली बहीण. लक्ष्मीबाई तिच्याहून पंधरा-सोळा वर्षांनी लहान होत्या. भिकूताईचे नानासाहेब पेंडशांशी लग्न झाले होते. नानासाहेब पेंडसे मामलेदार असल्याने भिकूताईना कोणत्याही गोष्टीची ददात नव्हती. भिकूताईचे लक्ष्मीबाईवर खूप प्रेम होते. भिकूताई सहसा घराबाहेर पडत नसे. इतकेच काय माहेरीसुद्धा जात नसे. पण ती लक्ष्मीबाईच्या बाळतपणासाठी जलालपुरास दोन-तीन महिने राहिली होती.

भिकूताईची एकुलती एक मुलगी घारूमाई लक्ष्मीबाईंना आपल्या बहिणीप्रमाणे वाटे, तिच्या लग्नात लक्ष्मीबाई व टिळक अगत्याने गेले पण टिळकांच्या विपन्नावस्थेमुळे लक्ष्मीबाई रिकाम्या हातानेच आलेल्या होत्या. आपण गरीब असल्यामुळे आपणाकडे कोणी लक्ष देत नाही असे लक्ष्मीबाईना वाटू लागले रात्री सगळीकडे निजानीज झाल्यावर भिकूताई त्यांना शोधत आल्या. लक्ष्मीबाई रुसून त्यांना म्हणाल्या, 'मी तुझी बहीण नाही. तू कशाला आलीस ? माझ्या अंगावर गोठतोडे थोडेच आहेत ? ' यावर भिकूताईने दिलेले उत्तर तिच्या समंजस व सहृदय स्वभावावर प्रकाश पाडणारे आहे. ती म्हणाली, 'मने, अग वेडे ! तू मला गोठतोड्याहून अधिक मोलाची नाहीस का ? नाना–आई वारल्यापासून आज दोन–तीन वर्षांत प्रथमच तू मला भेटत आहेस. मला कसे तुझ्याशी बोलवेल ? काम टाकून पाहुण्यांसमोर मी तुझ्यावरोबर रडत बसले, तर ते करणे मला शोभेल का ? '[८८] त्यानंतर तिने तिच्या अंगावरचे सर्व दागिने काढून लक्ष्मीबाईंच्या अंगावर घातले.

भिकूताईचे घर म्हणजे लक्ष्मीबाईना माहेरच वाटे, त्याठिकाणी आपल्या बाहुल्या खेळण्याचा छंद त्यांनी मोठ्या थाटामाटाने पूर्ण केला होता. अर्थात त्याचा सर्व खर्च भिकूताईनाच सोसावा लागला.

आपल्या लाडक्या बहिणीचा पती काहीही द्रव्यार्जन न करता एका गावाहून दुसऱ्या गावाकडे भटकत असतो, त्याचे संसारात लक्ष नाही, याचे भिकूताईला फार वाईट वाटे. अशा पुरुषाला बांगड्या भरल्या पाहिजेत, असे मत एकदा तिने व्यक्त केले होते.

टिळक खिस्ती झाल्यावर लक्ष्मीबाईना तर धक्का बसलाच पण भिकूताईलाही

जबरदस्त धक्का बसला. वास्तविक पाहता टिळकांच्या धर्मांतराची बातमी कळली तेव्हा ती आजारी होती पण लक्ष्मीबाईची दुरवस्था पाहून तिचा आजार पळाला. लक्ष्मीबाईची रात्रंदिवस ती काळजी घेऊ लागली. लक्ष्मीबाईचे दातसुद्धा ती घासत असे. लक्ष्मीबाई वेड्यासारखे करू लागल्या म्हणजे दत्तूसाठी तरी त्यांनी नीट वागावे, असा तिचा उपदेश असे. टिळकांचे बंधू सखाराम भाऊजी टिळकांना खर्चासाठी महिना शंभर रुपये पाठवितात पण लक्ष्मीबाईकडे लक्ष देत नाहीत हे पाहून भिकूताईने त्यांची चांगलीच कानउघाडणी केली. यावरून तिच्या स्पष्ट-वक्तेपणाची कल्पना येते.

ख्रिस्ती झालेले टिळक पत्नीस भेटावयास येतात पण ते नेहमीप्रमाणे भिकू-ताईकडे उतरू शकत नाहीत. त्यांचा मुक्काम धर्मशाळेत असतो. त्यांचा जेवणाचा डबा मात्र भिकूताई पाठविते. त्यावेळी ज्या टिळकांना आपण आपल्या हाताने घरात प्रेमाने जेवायला वाढले, त्यांना दुसऱ्याच्या हातून जेवण पाठवायचे व तेही धर्म-शाळेत या विचाराने दुःख होऊन तिच्या डोळ्यांतून गंगा-यमुना बाहू लागतात. टिळकांवर तिचे प्रेम होते पण ते ख्रिस्ती झाले म्हणूनच तिला त्यांचा राग यायचा

नानासाहेब पेंडशांची नगरास बदली झाल्यावर भिकूताईने लक्ष्मीबाईची व्यवस्था आपल्या भावाकडे जलालपुरास करण्याचे ठरविले. सोने नाणे, दागदागिने, खणलुगडी वगैरे सामानाने गच्च भरलेली एक ट्रंक तिने आपल्या भावजयीच्या स्वाधीन केली व लक्ष्मीबाईना मनस्ताप घडेल असे वर्तन त्यांच्याहातून घडू नये नये म्हणून बजावले. 'दत्तूचे दूध बंद करू नका'[८९] हे तिचे उद्‌गार तिचे वात्स-ल्यच प्रकट करणारे आहेत. टिळकांनी स्वधर्मात परत यावे याबद्दल भिकूताई उत्सुक असली तरी ख्रिस्ती झालेल्या पतीकडे लक्ष्मीबाईनी जाऊ नये यासाठी ती दक्ष होती. म्हणूनच लक्ष्मीबाईना उद्देशून 'मैना तुझा ग पिंजरा मायेचा'[९०] गाणे ती म्हणत असे. बहिणीसाठी तिचा जीव कसा तिळतिळ तुटत असे, याचा प्रत्यय येथे येतो.

लक्ष्मीबाई ख्रिस्ती झाल्यावर मात्र भिकूताईचे सर्व अवसान गळून पडते. ती बिछान्याला खिळून राहते. आपल्या प्रेमाची, वात्सल्याची व आपण दिलेल्या आधा-राची लक्ष्मीबाईने अशी फेड करावी, याचा तिला धक्का बसला. तिच्या स्वभावात कडवटपणा निर्माण झाला. कारण ती जित की प्रेमळ तितकीच स्वाभिमानी व रागीट होती. नगरला आल्यावर लक्ष्मीबाई तिच्या घरी जातात तेव्हा 'तिला खोगीर द्या निजायला'[९१] अशा कठोर उद्‌गारांनी ती त्यांचे स्वागत करते. भिकूताईशी लक्ष्मीबाईची पुन्हा एकदा भेट होते. त्यावेळी लक्ष्मीबाई भिकूताईची प्रकृती पाह-ण्यास आलेल्या होत्या. भिकूताई त्यांच्याशी बोलली नाही पण लक्ष्मीबाई जाण्यास निघाल्या, तेव्हा 'त्या महारणीच्या पदरात टाका काहीतरी'[९२] एवढेच ती म्हणाली.

बहिणीस खोगिरावर निजावयास लावणारी भिकूताई पुढे मात्र लक्ष्मीबाईंशी नीट वागू लागली. त्यांना निजावयाला नुसते जाजम दिले म्हणजे ती म्हणे, ' का ? ती का वाटेवरची चोर आहे ? तिला चांगला बिछाना द्या निजायला, '[९३] लक्ष्मीबाईविरुद्ध कोणी काही बोलले तरी तिला खपत नसे. लक्ष्मीबाई आपल्या पतीकडे परत गेल्या हेही चांगलेच झाले, असेही ती शेवटी शेवटी म्हणू लागली. भिकूताईंचा मृत्यू नाशिक येथे झाल्यावर ' माझ्यामुळे तिला कष्ट, आजार व शेवटी मृत्यू आला.' [९४] हे लक्ष्मीबाईंचे आर्त उद्‌गार यथार्थ वाटतात.

बहिणीसाठी खस्ता खाणारी, बहिणीवर आईसारखी मायेची पाखर घालणारी एक अत्यंत प्रेमळ, मायाळू पण तितकीच रागीट स्पष्टवक्ती स्त्री भिकूताईच्या व्यक्तिचित्रणातून लक्ष्मीबाईंनी साकार केली आहे.

५. वामनराव उर्फ मामंजी

हे टिळकांचे वडील व लक्ष्मीबाईंचे सासरे. वामनराव टिळक व्यवसायाने तलाठी होते. टिळकांच्या लग्नाच्या वेळी ' हुंडा घेऊन मी मुलाला विकणार नाही ' असे त्यांनी गोविंदराव मामांना सांगितले होते. यावरून त्या काळातही त्यांची याबाबतीत किती पुरोगामी दृष्टी होती, हे दिसून येते. तथापि टिपण जुळले पाहिजे त्याशिवाय लग्नास संमती देणार नाही, असेही त्यांनी कळविले होते. यातून त्यांचा स्पष्टवक्तेपणा दिसून येतो.

वामनरावांची नीतिमत्ता चांगली होती. बायको मेल्यावर त्यांनी दुसरा विवाह केला नाही व परस्त्रीस नेहमी मातेप्रमाणे मानले. ते स्वयंपाक स्वतः करीत व इतका प्रमाणशीर की जेवणानंतर एक शीतही शिल्लक राहत नसे.

मामंजींच्या अंगात देवी येत असे. त्यांच्या मनाविरुद्ध एखादी गोष्ट घडली की त्या शुक्रवारी देवी त्यांच्या अंगात यायची व लक्ष्मीबाई, ' टिळक व महादेव भाऊजी यांच्याविरुद्ध आकांडतांडव करावयाची. या तिघांबद्दल त्यांचे मत चांगले नव्हते, म्हणून हा प्रकार व्हायचा. दांभिकपणा हाही त्यांचा एक गुण असल्याचे यावरून दिसून येते. दांभिकपणाच्या जोडीलाच त्यांच्या स्वभावात अंधश्रद्धाही बरीच होती. ' भुतेखेते, जादूटोणा, अंगात येणे, पायगुण, ग्रह, टिपण, हातापायांच्या बोटांची लांबीरुंदी हचा गोष्टीवर त्यांची माणसांविषयीची आवडनिवड अवलंबून असे. '[९५] टिळकांच्या जन्माच्या वेळी त्यांचे काम गेले होते तर सखारामभाऊजींच्या जन्माच्या वेळेस त्यांना नवीन नोकरी लागली होती. त्यामुळे सखारामभाऊजी त्यांना प्रिय तर टिळक अप्रिय ठरले. व टिळकांना सावत्र मुलाप्रमाणे त्यांनी वागविले.

इतरांवर हुकूमत गाजविण्याची त्यांना आवड होती. व नवरेपणाची हुकूमत त्यांनी आपल्या पत्नीवर खूप गाजविली होती. बायको म्हणजे कःपदार्थ ! तिने म्हणेल तसे राबले पाहिजे असा त्यांचा दृष्टिकोण ! या दृष्टिकोणातूनच ' एवढा

हांडा उतरावयाचा होता' ' ' ही आपल्या पत्नीची विनंती त्यांना अपमानास्पद वाटली व त्यांनी चवताळून जाऊन तिला कमरेत लाथ मारली. ती साध्वी त्यानंतर आजारी पडून आठवड्यातच मरण पावली. तिच्या मृत्यूचे पाप त्यांच्याच कपाळी होते. नवरेशाहीच्या दुष्ट प्रवृत्तीतूनच हे निर्दय कृत्य त्यांच्या हातून घडले. लक्ष्मीबाईंचा पायगुण चांगला नाही व त्यामुळे घरातील सुख–शांती नष्ट होणार आहे असे अंगात आलेल्या देवीने त्यांना सांगितल्यापासून लक्ष्मीबाईंना सासुरवास सुरू झाला. वास्तविक पाहता लक्ष्मीबाईंनी आपल्या सासूबाईंना पाहिलेही नव्हते, पण सासरेच सासुरवास करीत ! लक्ष्मीबाईंना माहीत नसणारे कोकणस्थ पद्धतीचे जेवण ते त्यांना करावयास सांगायचे व ते करता आले नाही म्हणजे त्यांचा उपहास व अपमान करायचे. लक्ष्मीबाईंना थोडाही निवांतपणा मिळू नये म्हणून एकामागून एक काम ते सांगायचे. इतके की जेवतानादेखील त्यांना कामे सांगून जेवण करणे अशक्य करून सोडायचे. टिळकांचे मत लक्ष्मीबाईविषयी कलुषित व्हावे, असेही प्रयत्न त्यांनी केले. लक्ष्मीबाईंची एकही हौस पूर्ण होऊ नये व सदैव तळमळत रहावे यातच त्यांना आनंद वाटे. नाही म्हणावयास त्यांनी लक्ष्मीबाईंच्या अंगाला कधी बोट लावले नाही की त्यांना उद्देशून कधी अपशब्द वापरले नाहीत, हा त्यांचा चांगुलपणा. लक्ष्मीबाईंच्या प्रापंचिक जीवनातील आरंभाच्या काळातील यातनांचे श्रेय प्रामुख्याने वामनरावांनाच आहे. तथापि लक्ष्मीबाईंनी त्यांच्या दोषाबरोबरच त्यांच्या गुणांचाही उल्लेख मोठ्या मनाने केला आहे.

६ महादेवभाऊजी

महादेवभाऊजी हे टिळकांचे धाकटे बंधू व वामनरावांचे टिळकांप्रमाणेच नावडते चिरंजीव; लक्ष्मीबाई व टिळक या दोन 'दुष्ट ग्रहां' नंतरचा वामनरावांचा तिसरा दुष्ट ग्रह ! महादेव भाऊजींच्या जन्मानंतर लक्ष्मीबाईंच्या सासू वारल्या होत्या. त्यामुळे वामनरावांच्या दृष्टीने ते नतद्रष्ट ठरले. टिळकांप्रमाणेच महादेवभाऊजींनाही वामनरावांकडून सापत्नभावाची वागणूक मिळाली.

टिळकांप्रमाणेच महादेवभाऊजीही तऱ्हेवाईक व विक्षिप्त. विद्यार्थी म्हणून ते बुद्धिमान असले तरी आपल्या अतिरेकी औदार्यामुळे नेसूचे सोडून देण्याची त्यांची तयारी असे. त्यांच्या प्रेमळपणामुळे सारे जगच त्यांना आपले वाटे. एखादा चिंध्या पांघरलेला गरीब मनुष्य दिसला की आपला सदरा त्याला देऊन उघडे बोडके ते शाळेस जात. एकेदिवशी महादेवभाऊजी जलालपुरास गेले तेव्हा एका धोतराखेरीज त्यांच्या अंगावर चिंधीसुद्धा नव्हती. डोक्यावर टोपी व पायात वहाणाही नव्हत्या. हे सर्व त्यांनी कोणाला तरी दान करून टाकले होते. पण घरी येऊन आगगाडीत झोपलो असता चोरी झाली, हे खोटेच कारण सांगितले. कोणी अडचणीत दिसला की जवळ असेल ते सर्व देऊन टाकायचे व वर अशा थापा मारायच्या, हा त्यांचा

स्वभावच होता. नागपुरास लक्ष्मीबाईंनी त्यांच्या सांगण्यावरून त्यांना रेशीमकाठी धोतर घेऊन दिले तर ते त्यांनी दोन–चार दिवसांतच नाहीसे करून टाकले. सर्व घर शोधले तरी ते सापडेना. दुसऱ्या दिवशी एक गोंधळी घरी आला, त्यांच्या अंगावर ते धोतर होते. तेव्हा कुठे महादेवभाऊजींनी त्याला धोतर दिल्याचे कबूल केले. एकदा घरातील तांब्याही त्यांनी एका गरिबाला देऊन टाकला. लक्ष्मीबाईंनी दिलेली धाबळीही त्यांनी दान करून टाकली होती. या प्रकारामुळे लक्ष्मीबाई त्यांना रागावत म्हणून महादेवभाऊजी लक्ष्मीबाईंना भिऊन असत.

नागपुरास असताना टिळक घरी नसल्यामुळे लक्ष्मीबाईंनी महादेवभाऊजींना दोन रुपये देऊन काही सामान आणण्यास सांगितले. महादेवभाऊजींनी बाजारातून दोन रुपयांची फक्त तूपसाखरच आणली. लक्ष्मीबाई फार संतापल्या व 'आता का नुसती तूपसाखर खाऊन दिवस काढायचे ! जा, मी जेवच देते,' [९७] असे रागा-रागाने म्हणाल्या. त्यानंतर त्या माडीवर जाऊन बसल्या. लक्ष्मीबाई कोठे दिसेनात तेव्हा ते बागेतील विहिरीत डोकावून पाहू लागले, व त्यांचा तेथेही पत्ता न लागल्यावर 'अग वहिनी ! तू कसा ग जीव दिलास ! आता टिळकांना मी काय सांगू ? कोठे ग तू जीव दिलास ?' [९८] म्हणून मोठमोठ्याने रडू लागले. असा त्यांचा स्वभाव भोळा व हळवा होता. लक्ष्मीबाई समोर येताच त्यांचे पाय धरून आपण पुन्हा असे करणार नाही म्हणून त्यांना वचन दिले. तथापि त्यांचा मूळे स्वभाव काही गेला नाही.

वडिलांच्या बाराव्या दिवशी भूक लागली म्हणून त्यांनी बाजारास नेलेल्या पैशातून दोन आण्याची जिलबी घेऊन खाल्ली. 'तुमचे वडील वारलेले; तुम्ही गोड हो कसे खाल्ले ?' [९९] असे लक्ष्मीबाईंनी रागावून विचारताच 'ते दूर वारले वहिनी !' असे त्यांनी उत्तर दिले. त्यांच्या अशा वागण्याचा लक्ष्मीबाईंना काही अर्थच कळत नसे.

लक्ष्मीबाईंनी एक पोपट पाळला होता. तो 'भो भो महादेव' इतकेच म्हणत असे. एके दिवशी तो पाहता पाहता उडून गेला. मधून मधून तो परत येई व झाडावर बसून 'भो भो महादेव' असे म्हणे. तो पोपट जसा उडून गेला तसाच हा पोपटही एके दिवशी निघून गेला. लग्नाचा विषय काढताच, 'वहिनी, तुम्ही उगीच कशाला काळजी लावून घेता ?' [१००] असे म्हणणाऱ्या महादेवभाऊजींना जणू आपल्या मरणाची पूर्वकल्पनाच आली होती. 'अशी माणसे देव आपल्याकडे लवकर नेतो' [१०१] असा समर्पक अभिप्राय त्यांच्या निधनानंतर लक्ष्मीबाईंनी व्यक्त केला आहे.

आपल्या सौम्य, हळव्या, दयाळू स्वभावामुळे प्रिय वाटणारे हे व्यक्तिमत्त्व त्यांच्या ऐन तारुण्यात झालेल्या निधनामुळे मनाला चुटपूट लावल्याखेरीज राहत नाही.

७. सखारामभाऊजी

सखारामभाऊजी आपल्या वडिलांचे लाडके चिरंजीव होते. कारण त्यांच्या जन्माच्या वेळेस वामनरावांना नवीन नोकरी लागली होती. त्यामुळे ते चांगल्या पायगुणाचे ठरले व वामनरावांकडून त्यांना चांगली वागणूक मिळाली. वामनराव त्यांना सख्ख्या मुलाप्रमाणे व टिळकांना आणि महादेवभाऊजींना सावत्र मुलांप्रमाणे वागवीत. घरात चहा झाला तर वामनराव सखारामभाऊजींना जवळ बसवून तो घेत.

टिळक व सखारामभाऊजी दोघे बरोबर शाळेस जात. एकदा सखारामभाऊजींनी चहाडी केल्यामुळे टिळकांना वामनरावांनी खूप मारले. त्यामुळे टिळक घर सोडून पळून गेले. टिळक नंतर परत आले तेव्हा मात्र ते त्यांच्या चहाडचा कमी सांगू लागले. कारण आपल्यामुळेच टिळक पळून गेले याची त्यांना जाणीव झाली. याचवेळी दोघांनाही नारू झाला, तेव्हा वामनराव टिळकांना म्हणत, 'चांगले झाले. तू लंगडा झालास तर मला आनंद वाटेल' [१०२] मात्र सखारामभाऊजींची ते प्रेमाने शुश्रूषा करीत, त्यांना पेढा आणून देत. अर्थात यात सखारामभाऊजींचा काहीच दोष नव्हता वामनरावांच्या मत्सरी स्वभावामुळेच हे घडत असे.

मोठेपणी मात्र सखारामभाऊजींचे बंधुप्रेम वृद्धिगत झाले. टिळक ख्रिस्ती झाल्यावर लक्ष्मीबाईचा मुक्काम पंढरपुरास भिकूताईकडे होता. त्यावेळी सखारामभाऊजीही पंढरपुरासच होते. ते रोज लक्ष्मीबाईना भेटावयास येत. ते टिळकांना खर्चासाठी दरमहा शंभर रुपये पाठवून देत. मात्र भावजयीची–लक्ष्मीबाईची–लुगडी फाटली तरी त्याबद्दल काही बोलत नसत. म्हणून भिकूताईनी त्यांची खूप खरडपट्टी काढली होती. त्यानंतर त्यांनी लक्ष्मीबाईसाठी एक लुगडे व दत्तूसाठी दोन कुडती पाठवून दिली. आपल्या ख्रिस्ती झालेल्या भावाबद्दल त्यांचे प्रेम कायमच होते.

टिळकांची मुंबईस काळजी घेणारा कोणी नाही म्हणून लक्ष्मीबाईनी त्यांना सूटपत्र द्यावें म्हणजे ते दुसरे लग्न करण्यास मोकळे होतील, अशी सूचना त्यांनी लक्ष्मीबाईना केली होती. यातून त्यांचे बंधुप्रेम दिसून येत असले तरी लक्ष्मीबाईबद्दल त्यांना विशेष आपुलकी नव्हती हे स्पष्ट होते. अर्थात लक्ष्मीबाईनी त्यांची सूचना साफ धुडकावून दिली व त्यांची चांगलीच हजेरी घेतली.

टिळक लक्ष्मीबाईना नगरास घेऊन जाण्यासाठी पंढरपुरास आले. लक्ष्मीबाईनी सखारामभाऊजींना जावे का म्हणून विचारल्यावर त्यांनी कानावर हात ठेवले. लक्ष्मीबाईसंबंधी स्वतःवर कोणतीच जबाबदारी घेण्याची त्यांची तयारी नव्हती.

टिळक राहुरीस असताना सखारामभाऊजीही राहुरीस येऊन वकिली करू

लागले. एकदा टिळकांना त्यांच्या भावजयीने तवा, कढई वगैरे जिनसा आणावयास सांगितल्या होत्या. टिळकांनी त्या घरी नेऊन दिल्यावर त्यांनी त्या जिनसांची किंमत विचारली. त्यावर टिळकांना राग आला व दोघांचे भांडण झाले. त्यावेळी त्यांनी आपल्या भावास 'हेच तुला माझे शेवटचे पत्र. ह्यापुढे तुला माझे तोंड दृष्टीस पडणार नाही.'[१०३] असे पत्र लिहिले. त्याबरोबर सखारामभाऊजी टांग्यातून लगोलग आले. त्यावेळी ते अगदी घामाघूम झाले होते, व त्यांच्या तोंडावर सहा महिन्यांच्या दुखणेकऱ्याची कळा आली होती. सर्व प्रकार कळल्यावर त्यांना हायसे वाटले व ते घरी गेले. या प्रसंगातून त्यांचे बंधुप्रेम दिसून येते.

टिळकांच्या मृत्यूची बातमी सखारामभाऊजींना प्रवासात कळली. त्यावेळी त्यांची भयंकर स्थिती झाली. मुंबईतील टिळकांच्या घराचा पत्ताही त्यांना माहीत नव्हता. पोटात चहाच्या कपाशिवाय अन्नाचा एक कणही नसताना ऐन उन्हाळ्यात त्यांना टिळकांचे घर शोधीत हिंडावे लागले. भावाच्या मृत्यूचा त्यांच्या मनावर जो आघात झाला तो शेवटपर्यन्त टिकला. टिळकांच्या अस्थींची पेटी चर्चमध्ये आल्यावर इतर अनेकांबरोबर सखारामभाऊजींनीही भाषण केले.

सखारामभाऊजींच्या अखेरच्या काळाचे लक्ष्मीबाईंनी फार हृदयस्पर्शी वर्णन केले आहे. भावाच्या मृत्यूने त्यांच्या मेंदूवर परिणाम झाल्याने शेवटी शेवटी ते वाटेल त्याला वाटेल ते बोलू लागले आपल्या भावाच्या मृत्यूस आपली भावजयच कारणीभूत झाली असेही त्यांना वाटू लागले. एकदा लक्ष्मीबाईंच्या घरातून रागारागाने ते स्टेशनवर गेले. त्यावेळी त्यांची समजूत काढल्यावर पुन्हा ते परत आले. त्यावेळी त्यांचे व लक्ष्मीबाईंचे भांडण झाले. लक्ष्मीबाई म्हणतात, 'आमच्या दीरभावजयांचे हे पहिले व शेवटचे भांडण'[१०४] त्यानंतर ते पुन्हा निघून गेले व त्यांची व लक्ष्मीबाईंची नंतर गाठ पडली नाही. ते वारल्याची बातमीच त्यांना काही दिवसांनी समजली.

वामनरावांनी प्रेमाने वाढविलेला हा त्यांचा आवडता सुपुत्र वामनरावांकडून सापत्नभावाची वागणूक मिळालेल्या त्यांच्या नावडत्या पुत्रामागोमागच देवाघरी गेला.

८. डॉ. हचूम

अहमदनगरचे ख्रिस्ती मिशनरी डॉ. हचूम हे टिळकांचे जिवाभावाचे स्नेही व सहकारी होते. टिळकांच्या संसाराला त्यांचा मोठाच हातभार लाभला. टिळक ख्रिस्ती झाल्यावर हचूमसाहेबांनी त्यांना जवळ जवळ आपल्या घरीच ठेवले होते.

लक्ष्मीबाई टिळकांकडे राहण्यास आल्यावर टिळक ख्रिस्ती झाल्याने त्यांना नगरास कोठेच जागा मिळेना. त्यावेळी हचूम साहेबांनी ख्रिस्ती लोकांच्या वसाहतीत त्यांना जागा दिली. लक्ष्मीबाई अजून ख्रिस्ती झाल्या नव्हत्या, तेव्हा त्यांना ख्रिस्ती

लोकांच्या शेजारी राहावयाचे नव्हते. त्यांची अडचण लक्षात घेऊन हचूमसाहेबांनी ख्रिस्ती लोकांना घर बदलण्यास सांगितले. त्यांच्या स्वभावातील प्रेमळपणामुळे व सहिष्णुतेमुळेच त्यांनी लक्ष्मीबाईंची सोय करून दिली. नगरमध्ये प्लेग सुरू झाल्यावर त्यांनी टिळक दाम्पत्याला आपल्या बंगल्यावर राहाण्यास बोलाविले. अर्थात तिथे सोवळे पाळता येण्यासारखे नसल्याने लक्ष्मीबाई जाऊ शकल्या नाहीत, टिळक मात्र गेले.

टिळकांच्या खचिक स्वभावामुळे त्यांना बऱ्याच वेळा पगार पुरत नसे. अशावेळी डॉ. हचूम त्यांना पुढील महिन्याच्या पगारातून 'ॲडव्हान्स' देत असत. लक्ष्मीबाईना ही 'आगाऊ' बँक वाटे व ही 'आगाऊ' बँक डॉक्टर हचूमच्या बंगल्यात होती.' [१०५] असे त्या मिस्किलपणे म्हणतात.

दुष्काळात मिशनने काढून टाकलेली मुले टिळकांनी पोसायचे ठरविल्यावर डॉ. हचूमसाहेबांना टिळकांची फारच काळजी वाटू लागली कारण त्यांची आर्थिक स्थिती त्यांना ठाऊक होती. लक्ष्मीबाई लिहितात, 'टिळकांच्या संसारासंबंधी मला जशी इतके दिवस काळजी, कळकळ वाटे तशी आता आमच्या दोघांच्या संसारासंबंधी डॉ. हचूम यांना वाटू लागली.' [१०६] त्यामुळेच टिळकांनी मुले सांभाळणे त्यांना मुळीच आवडले नाही. अर्थात टिळकांवरील निष्कपट प्रेमामुळेच हचूमसाहेबांना असे वाटे. त्यामुळे हचूम साहेबांनी टिळक दाम्पत्याच्या संसारात ढवळाढवळ केली तरी त्यांना राग येत नसे.

डॉ हचूम यांच्या बोलण्यात 'आता भावा' असे शब्द फार असत. विशेषत: हताश होऊन बोलण्याचा प्रसंग आला म्हणजे ते या शब्दांनी संभाषणाची सुरुवात करीत. त्यांनी टिळक व लक्ष्मीबाईना मुले सोडून द्या, असे टुमणे लावले. लक्ष्मीबाईंशी झालेल्या त्यांच्या संभाषणातील काही मजेदार वाक्ये पुढीलप्रमाणे. हचूम म्हणायचे,

'आता भावा– पण तुम्हाला खर्च फार होतो आहे.'

'पण भावा,तुमची अडचण होईल.'

'आता बहिणी, तुम्ही काय म्हणता ते मला समजले नाही.'

'बरं भावा... तुम्ही या गोष्टीचा चांगला विचार करा.' [१०७]

इंग्रजी भाषेच्या वळणाप्रमाणे मराठी बोलण्याची त्यांची ही पद्धत पाहून मोठी गंमत वाटते. त्याचप्रमाणे या भाषेच्या वैशिष्ट्यामुळे त्यांचे व्यक्तिमत्त्व वाचकांपुढे साकार होते.

अकरा महिने ही मुले टिळकांनी सांभाळली. पण रोज डॉ. हचूम लक्ष्मीबाईंच्या पुढे उलटी टोपी धरून म्हणायचे. 'आता बहिणी, माझ्या हचा टोपीत तुमची मुले टाका. मला भीक घाला.' लक्ष्मीबाई नकार द्यायच्या. हा फार्स रोज व्हायचा. टिळकांची भजने शब्दांची उलटापालट करून ते म्हणत व गातगातच

टिळकांच्या घरात प्रवेश करीत. यातून त्यांच्या प्रसन्न व्यक्तिमत्त्वाचे दर्शन होते. टिळकांच्या आर्थिक विवंचना दूर करण्यासाठी हचूमसाहेबांनी शेवटी ही मुले स्वत:च्या बोर्डिगमध्ये ठेवली.

लक्ष्मीबाईनी मिरजेस जाऊन नर्सिगचे शिक्षण घेण्याचे ठरविले. पण डॉ. हचूमना हे पसंत नव्हते. ते लक्ष्मीबाईस म्हणाले, 'आता बाई, तुमचे खरे शिक्षण म्हणजे आपल्या नवऱ्याचा व मुलांचा सांभाळ करणे, मला वाटते तुम्ही मिरजेस जाऊ नये.'[१०९] पण लक्ष्मीबाईनी आपला हट्ट सोडला नाही. लक्ष्मीबाई मिरजेस गेल्या म्हणजे टिळकांची व मुलांची गैरसोय होईल म्हणून त्यांनी मिरजेस डॉ. वान्लेस यांना गुप्तपणे पत्र लिहून लक्ष्मीबाईंना परत पाठवण्याची व्यवस्था केली. टिळकांनी मिशनचे काम पगार घेऊन करायचे नाही, असे ठरवून मिशनची नोकरी सोडली व व्हालेंटिअर्स संघटना काढली. नोकरी असताना टिळकांना पगार पुरायचा नाही, तेव्हा नोकरी सोडल्यावर त्यांचे कसे भागणार, हे लक्षात घेऊन हचूमसाहेबांनी ट्रॅक्ट सोसायटीकडे खटपट करून शंभर रुपये मासिक वेतनाचे संपादकीय काम टिळकांना मिळवून दिले.

टिळकांनी एखाद्या शांत स्थळी जाऊन ख्रिस्तायन पूर्ण करण्याचे ठरविले. तेव्हा देखील डॉ. हचूमसाहेबांचीच त्यांना मदत झाली. डॉ. हचूम यांनी ताबडतोब सातारा येथील आपल्या मुलीला पत्र लिहून एक मोठा बंगला टिळकांना मिळवून दिला. ख्रिस्तायन लिहिण्यास त्यांनी एक कारकूनही पाठविला. भिकूताई व पेंडसे यांचा अपवाद करता डॉ. हचूम इतके निर्मळ व सक्रिय प्रेम टिळक दाम्पत्यावर कोणी केले नसेल. म्हणूनच टिळकांनी आपल्या मृत्यूपत्रात आपल्या आवडत्या व्यक्तीच्या यादीत आपल्या कुटुंबियांनंतर डॉ. हचूमसाहेबांचाच प्रथम उल्लेख केला आहे. याशिवाय नगरच्या ईश्वरविद्येच्या वर्गात स्वत:चे व डॉ. हचूमचे चित्र शेजारी शेजारी लावून डॉ. हचूमच्या चित्राखाली 'हचाने' व स्वत:च्या चित्राखाली 'हचाला सांभाळिले' असे शब्द लिहावे, अशीही सूचना त्यांनी केली आहे. टिळकांनी इतकी कृतज्ञता व्यक्त करावी, अशी पात्रता डॉ. हचूम यांच्या ठायी निश्चितपणे होती.

टिळकांच्या मृत्यूनंतरही टिळक कुटुंबीयांची डॉ. हचूम साहेबांनी काळजी घेतली. हे देवदत्तांच्या निवेदनावरून दिसून येते. लक्ष्मीबाई कराचीत राहत होत्या, त्यांना महाराष्ट्रात आणण्याचे प्रयत्न डॉ. हचूम यांनीच केले. त्यांनीच लक्ष्मीबाईंच्या सुनेला– रूथला नगरास सरकारी शाळेत काम लावून दिले. टिळक व टिळक कुटुंबीयांचा त्यांनी अगदी मित्रत्वाने व मिशनरी कळकळीने सांभाळ केला, म्हणून टिळकांचा संसार सुरळीत चालू शकला. ते अमेरिकेत वारल्यावर त्यांच्या अस्थी नगरच्या कबरस्थानात आणून ठेवण्यात आल्या. त्या योगायोगाने टिळकांच्या जवळच ठेवण्यात आल्या, हा योगायोगही बोलकाच नाही का ?

९. बालकवी

त्र्यंबक बापूजी ठोंबरे ऊर्फ बालकवी यांच्या निरागस व निष्पाप बाळपणाच्या 'स्मृतिचित्रा'त येणाऱ्या आठवणी अत्यंत हृद्य आहेत.

जळगावच्या कवि–संमेलनातून बालकवींचा उदय झाला. केवळ सतरा वर्षे वयाच्या या कवीचे शीघ्रकवित्व तेथे जमलेल्या मंडळींस पहावयास मिळाले. टिळकांवर तर त्यांच्या काव्यशक्तीचा खूपच प्रभाव पडला व त्यांच्यासाठी आपण काहीतरी केले पाहिजे अशी तळमळ त्यांना लागून राहिली. त्यांनी कर्नल कीर्तीकरांशी पत्रव्यवहार सुरू केला. कर्नल कीर्तीकरच त्या कविसंमेलनाचे अध्यक्ष होते. त्यांनी ठोंबऱ्यांना महिना दहा रुपये देण्याचे कबूल केले. पण त्यांनी नगरास येऊन टिळकांच्या देखरेखीखाली राहावे, अशी अट घातली. त्याप्रमाणे ठोंबरे टिळकांच्या घरी येऊन दाखल झाले.

लक्ष्मीबाईंनी बालकवी आल्यावर त्यांना अहोजाहो म्हटले ते तेवढेच. त्यानंतर उभयतांतील परकेपणा नाहीसा झाला व त्या त्यांना अरेतुरे म्हणू लागल्या. आरंभी बालकवी उदास दिसायचे. कारण ते ख्रिस्ती माणसांत येऊन पडले होते. ख्रिस्ती माणसे म्हणजे कोणी राक्षस किंवा भुते असावीत अशी त्यांची भावना होती. पण एक–दोन दिवसांतच त्यांचे टिळक कुटुंबाविषयीचे पूर्वग्रह दूर झाले व ते घरातील मुलाप्रमाणे वागू लागले. दत्तूशी व त्याच्या मित्रांशीही त्यांची छान गट्टी जमली. त्यांच्या निष्पाप स्वभावामुळेच ते टिळक कुटुंबाशी इतके एकरूप होऊ शकले.

बालकवी विनोदी व खेळकर स्वभावाचे होते. ते प्रथम घरी आले त्यावेळी लक्ष्मीबाई झोपलेल्या होत्या, त्यांनी बालकवींना सांगितले, 'बाळ, ते कपाट उघड नि त्यातून दूध काढून घे.' बाळाने दूध घेऊन कप तेथेच ठेवला. तेव्हा त्या म्हणाल्या, 'बाळ, तेवढा कप उचलून ठेव बरं.'[१०] या प्रसंगावरून बालकवी पुढे लक्ष्मीबाईंची चेष्टा करीत. ते म्हणत, 'लक्ष्मीबाई, पंचम जॉर्ज तुमच्याकडे कधी आले तर त्यांनासुद्धा तुम्ही सांगाल की, बाळ, तेवढे फाटक लावून घे बरे येताना.'[११] ठोंबऱ्यांचा हा विनोदी स्वभाव लक्ष्मीबाईंना फार आवडे.

कधी कधी मात्र ते चटकन रागाला यायचे. तसे ते तापट स्वभावाचेही होते. सखारामभाऊजी त्यांना लक्ष्मीबाईप्रमाणे एकेरी नावाने हाका मारू लागले, हे त्यांना रुचले नाही. ते लक्ष्मीबाईकडे तक्रार करू लागले. लक्ष्मीबाईंनी त्यांची समजूत घालण्याचा प्रयत्न केला. पण बालकवी ऐकेनात. लक्ष्मीबाईनी अरेतुरे म्हटलेले त्यांना चाले कारण लक्ष्मीबाईना ते आईच्या ठिकाणी मानीत. टिळकसुद्धा 'अहोजाहो' म्हणतात तिथे इतरांना अरेतुरे म्हणण्याचा काय अधिकार असा त्यांचा प्रश्न होता. शेवटी लक्ष्मीबाईंनीही त्यांना 'अहोजाहो' म्हणावयास सुरुवात केल्यावर

मात्र त्यांना ते आवडेना. 'लक्ष्मीबाई, आता किती दिवस हे असे चालायचे ? मला एकदा तुम्ही दिलेल्या नावाने हाक मारा पाहू !'[१२] असे ते म्हणू लागले. लक्ष्मीबाईनी 'चल मूर्खा' असे म्हटल्यावर ते हसले व त्यांचे समाधान झाले. लक्ष्मीबाईपासून त्यांना असा मातृसुखाचा लाभ होई.

बालकवी टिळकांकडे रहावयास आल्यावर त्यांना विषमज्वर झाला होता. लक्ष्मीबाईनी रात्र-रात्र जागून त्यांची सेवा-शुश्रूषा केली व टिळकांनी पैसा खर्चला म्हणून ते बरे झाले. लक्ष्मीबाईचा त्यांना फार ओढा होता. त्यांच्यासमोर ते मुलाप्रमाणे वागायचे पण टिळकांसमोर ते गांभीर्याचा आव आणायचे.

कविता लिहिली की, प्रथम ते लक्ष्मीबाईना म्हणून दाखवीत. लक्ष्मीबाईनी ऐकण्यात थोडे दुर्लक्ष केले की, ते रागाला यायचे व लक्ष्मीबाईपुढे कविता फाडून टाकायचे असा त्यांचा हळवा स्वभाव होता. अशावेळी दत्तू व बेबी त्यांना चिडवत-

-अरसिक किती हा मेला
हा कविता फाडुन बाहिर गेला- '[१३]

मग हसून पुन्हा ते कविता लिहून काढीत. मात्र त्यांना कविता फाडायचा बराच नाद होता. टिळकांच्या घरी येण्यापूर्वीची त्यांची बरीच कविता अशा प्रकारे नष्ट झाली आहे. त्यातील काही कविता ते पाठ म्हणून दाखवीत. त्यातील वर्णने चित्रमय असायची.

लक्ष्मीबाईच्या मागे 'गोष्ट सांगा' असा त्यांचा नेहमीच लकडा असायचा. गोष्ट ऐकणे त्यांना फार आवडायचे. एकदा लक्ष्मीबाईंच्या विहिणीने त्यांना एक प्रदीर्घ कथा सांगून त्यांची चांगलीच खोड मोडली. सकाळी उशिरा उठल्यावर बालकवींनी आपली फजिती मनमोकळेपणे मान्य केली व लक्ष्मीबाईपुढे साष्टांग नमस्कार घातला. 'तुमची विहीण मोठी कादंबरीकर्ती बनणार होती पण कोठे माशी शिकली कोण जाणे.'[१४] असा मिस्किल अभिप्रायही त्यांनी व्यक्त केला. आपल्या फजितीकडे खेळकरपणे पाहण्याची त्यांची वृत्ती येथे दिसून येते.

लक्ष्मीबाईना काव्य करण्याची स्फूर्ती आली की, त्या कवितेच्या ओळीच्या ओळी खडूने जमिनीवर उतरून ठेवायच्या. हा प्रकार बहुधा रात्री घडायचा. सकाळी बालकवी त्या ओळी कागदावर नोंदवून ठेवायचे. एकंदर पावणे-तीनशे ओळींची कविता बालकवींनी लिहून ठेवली. लक्ष्मीबाईच्या प्रेमापोटीच त्यांनी हे श्रम घेतले.

बालकवींना दुसऱ्याची नक्कल करण्याची सवय होती. एकदा लक्ष्मीबाईच्या घरी आलेल्या रावसाहेबांची त्यांनी चांगलीच नक्कल केली. त्यावेळी लक्ष्मीबाई त्यांच्यावर खूप रागावल्या रात्री सर्वांनी बालकवींशी अबोला धरला. बालकवी फार खिन्न झाले, तेव्हा लक्ष्मीबाईनी त्यांना त्यांची चूक दाखवून दिली व पुन्हा असे करणार नाही म्हणून वचन देण्यास सांगितले. कोमल अंतःकरणाच्या बा-

कवींना खूप वाईट वाटले व त्यांच्या डोळ्यांतून अश्रू ठिपकू लागले. त्यांनी लक्ष्मीबाईंच्या पायाची शपथ घेऊन कोणाही वडील माणसाचा उपमर्द करणार नाही, असे वचन दिले. तेव्हा लक्ष्मीबाईंनी त्यांना पोटाशी धरले. बालवृत्तीचे बालकवी पुन्हा हसू खेळू लागले. त्यानंतर त्यांनी कोणाचाही उपमर्द केला नाही. या प्रसंगावर भाष्य करताना लक्ष्मीबाई म्हणतात, 'ठोंबरे बालकवी होता. पण कवीपेक्षाही तो बाल अधिक होता.'[११५] त्यांचे हे विधान बालकवींच्या व्यक्तिमत्त्वाचा अचूक वेध घेणारे आहे.

लक्ष्मीबाईंनी एक सामाजिक कादंबरी लिहावयास घेतली होती. त्यावर बालकवींनी लक्ष्मीबाईंच्या भाषेतच त्या संबंधी जो अभिप्राय दिला आहे, तो त्यांच्या मार्मिक विनोदबुद्धीचे द्योतक आहे. बेबीच्या विनंतीनुसार बालकवींनी तिला पाठवलेले लांबलचक पत्र त्यांच्या 'प्रॅक्टिकल जोक'चा एक नमुनाच म्हणावे लागेल. कागदाला कागद चिकटवून लांबविलेले ते पत्र बेबीच्या डोक्यापासून तिच्या पायापर्यंत पुरेल इतके मोठे होते.

टिळकांच्या घरात बालकवी नेहमी आनंदी, खेळाडू व आशावादी वृत्तीचे असायचे. याचे कारण टिळक कुटुंबीयांचे त्यांना लाभत असलेले प्रेम व टिळकांच्या घरचे उदार व मुक्त वातावरण हे होय. नगर सोडून गेल्यावर मात्र त्यांची ही वृत्ती बदले. नगरास ते परत आले की त्यांची बालवृत्तीही परतायची.

टिळक कुटुंबीयांचे आपणावर इतके प्रेम का याचे कधी कधी त्यांना कोडे पडायचे. अंतर्मुख होऊन त्यावर ते विचार करायचे. आपण खिस्ती व्हावे म्हणूनच या सर्वांचे आपणावर प्रेम आहे, असे त्यांच्या मनाने घेतले. लक्ष्मीबाईंनी त्यांचा हा समज दूर केला, तेव्हा ते पूर्ववत वागू लागले.

बालकवींनी काही रक्कम लक्ष्मीबाईंजवळ ठेवली होती. टिळकांचे कर्ज फेडण्यासाठी लक्ष्मीबाईंनी बालकवींच्या संमतीने ती रक्कम वापरली. त्यानंतर बालकवी पुण्यास गेले. थोड्या दिवसांनी त्यांचा भाऊ बाबू आला. व पैसे मागू लागला. त्यावेळी लक्ष्मीबाईंजवळ पैसे नसल्याने त्यांना बाबूला पैसे देता आले नाहीत. बाबू रागारागाने निघून गेला. बालकवींना हे कळल्यावर फार दुःख झाले. कारण त्यांनी बाबूला मुळी पाठविलेच नव्हते. ते पुण्याहून रडत रडतच लक्ष्मीबाईंकडे आले. लक्ष्मीबाईंनी त्यांची समजूत घातली तरी बरेच दिवस हा विषय त्यांच्या मनातून गेला नाही. मनाने हळवे असल्यामुळे बालकवी चटकन दुःखी होत.

लक्ष्मीबाईंच्या घरात अनेक माणसे आली व गेली. पण बालकवींनी मात्र त्यांच्या हृदयातच घर केले होते. त्यांचा स्वभाव प्रेमळ, मनमिळावू, आनंदी, थट्टेखोर आणि थोडासा खोडकरही होता. मधून मधून ते भांडण करीत पण त्यांच्यात कपट किंवा द्वेषाचा लवलेशही नव्हता. लक्ष्मीबाईंच्या घरी त्याचे बालपण सुरक्षित

राहिले होते. ते घरी आले की काही ना काही गमती करायचे. 'दंगामस्ती, झाडावर चढणे, घरावर धुडचा मारणे, भांडणे, कागद घरभर करणे, कविता लिहिणे, त्या वाचून दाखविणे... घरात सभा भरविणे, जादूचे खेळ करणे... माझ्या लिहिण्याची चेष्टा करणे, रात्री अंगणात निजले म्हणजे चांदण्यांची मोजदाद करणे...'[११६] अशी या गमतींची लक्ष्मीबाईंनी यादीच दिली आहे.

बालकवींच्या शेवटच्या भेटीचे भावनोत्कट वर्णन लक्ष्मीबाईंनी केले आहे. टिळक व लक्ष्मीबाई साताऱ्याहून नगरला आल्यावर बालकवी त्यांना भेटण्यास धावतच आले. त्यावेळी ते आपल्या कुटुंबीयांबरोबर नगरासच होते. टिळक व लक्ष्मीबाईंना कडकडून भेटल्यावर ते म्हणाले, 'आज इतके दिवसांनी मला माझे हितचिंतक पुन्हा भेटले. तुम्ही येथे नव्हता तेव्हा मला किती चुकल्या-चुकल्यासारखे वाटत होते.'[११७] त्या रात्री टिळक व लक्ष्मीबाई बालकवींच्याकडेच राहिले. दुसऱ्या दिवशी स्टेशनवर टिळकांना निरोप देताना बालकवींच्या डोळ्यांत अश्रू आले. लक्ष्मीबाईंनीही डोळ्यांस पदर लावला. कधीही न रडणाऱ्या टिळकांच्या डोळ्यांतही अश्रू आले

बालकवींना अपघाती मृत्यू येईल, हे एका ज्योतिष्याचे भविष्य काळाची चूक सोडता खरे ठरले. सर्वांना दुःखसागरात लोटून शांतस्थळी काव्य करण्यासच जणू बालकवी निघून गेले. त्यांची आठवण येताच–

ये आता घे शेवटले हे अश्रू दोन पिऊन
पांखरा येशिल का परतुन ?[११८]

ही टिळकांची काव्यपंक्ती लक्ष्मीबाईंना आठवायची. एका निरागस, निष्पाप बालकवीचे बाल्य लक्ष्मीबाईंच्या घरी बागडत होते, त्याचा हृदयद्रावक अंत वाचकांच्या मनाला चुटपूट लावल्याखेरीज रहात नाही.

'स्मृतिचित्रां' तील व्यक्तिचित्रणाचे परीक्षण–

वरील प्रमुख व्यक्तींखेरीज इतरही अनेक व्यक्ती 'स्मृतिचित्रां' त आढळतात. पतीची लाथ खाऊन तोंडात पाण्याशिवाय काही न घेता रामनामाचा जप करीत प्राण सोडणारी टिळकांची आई, आणि आपल्या विहिणीने अशा रीतीने कोठे प्राण सोडला हे मुद्दाम त्या गावी जाऊन पाहणारी व पुढे त्याच आजाराने मृत्यू पावणारी लक्ष्मीबाईची आई, लक्ष्मीबाईंचा शोध घेण्यासाठी मुंबईभर वणवण फिरत चाळीचाळीतून डोकावणारे गोविंदराव मामा, लक्ष्मीबाईंचे घरचे साधे जेवण घेताना आपण पंचपक्वान्ने खात आहोत असा आव आणणारा श्रीमंत बुटींचा मुलगा बापूसाहेब, 'येनकेन मार्गाने टिळकांना पुन्हा स्वधर्मात आणू इच्छिणारे व ही इच्छा पूर्ण झाली नाही तरी टिळकांवर अबाधित प्रेम करणारे नानासाहेब पेंडसे, 'आई, तू लोकांच्यासमोर रडू नकोस' असे म्हणणारा दत्तू व टिळकांच्या

लोकांनी
'स्मृतिचित्रां'त गर्दी केली आहे. कुशल चित्रकाराने कुंचल्याच्या एका फटकाऱ्याने एखादे सुबक चित्र निर्माण करावे, त्याप्रमाणे लक्ष्मीबाईंनी या व्यक्तींचे चित्रण केले आहे.

लक्ष्मीबाई व्यक्तींच्या स्वभावाचे, त्यांच्या गुणदोषांचे वर्णन या व्यक्तिचित्रणातून करतात. त्यांच्या व्यक्तिचित्रणाचे एक वैशिष्ट्य म्हणजे त्या व्यक्तीच्या बहिरंगाचे चित्रण करण्यापेक्षा त्यांच्या कृति–उक्तीतून त्यांचे स्वभाववैशिष्ट्य दाखविण्याचा प्रयत्न करतात. त्या आधारे त्या मनोदर्शन घडवितात पण मनोविश्लेषण करीत नाहीत. त्या व्यक्तीच्या मनात विशिष्ट प्रसंगी कोणती खळबळ माजली आहे, याचा मागोवाही त्या घेत नाहीत. टिळकांचे धर्मान्तर हा त्यांच्या व लक्ष्मीबाईंच्या जीवनातील समरप्रसंग. पण यावेळीही स्वतःच्या मनात कोणती वादळे उठत आहेत, कोणते विचारतरंग उमटत आहेत, याची नोंद त्या घेत नाहीत. स्वतःच्या मानसिक यातनांचे चित्रण त्यांच्या लिखाणात फारसे आढळत नाही. मनाला बसलेल्या त्या प्रचंड धक्क्यामुळे शरीरावर काय परिणाम झाले,– आपण खुरडत कशा चाललो, दिवसभर या घरातून त्या घरात येरझाऱ्या कशा घातल्या, आपल्या डोळ्यांतील पाणी कसे खळत नव्हते– याचेच त्या वर्णन करतात. याचे कारण त्यांच्या बहिर्मुख वृत्तीत असावे. त्यामुळे त्यांनी आपले सर्व लक्ष माणसाचे बोलणे व त्याची कृती यावरच केंद्रित केले. तथापि त्यामुळे त्या त्या व्यक्तींचे गुणदोष, स्वभाववैचित्र्ये त्यांच्या सूक्ष्म नजरेतून सुटत नाहीत. त्यांनी जी वर्णने केली आहेत, त्यावरून त्या त्या व्यक्तींचे स्वभावविशेष व त्या त्या प्रसंगातील त्यांची मनःस्थिती यांचे दर्शन झाल्याखेरीज राहत नाही. आपण एक लेखिका आहोत व आपणास काही वाङ्मयकृती घडवायची आहे, याची त्यांना अजिबात जाणीव नसल्याने त्यांनी केलेली स्वभावचित्रणे अगदी सहज, वास्तव, जिवंत व म्हणूनच अकृत्रिम आहेत. स्वभावचित्रणाचे 'पुस्तकी' तंत्र त्यांना ठाऊक नव्हते व म्हणून कसलीही कृत्रिम बंधने त्यांच्या व्यक्तिचित्रणावर पडली नाहीत. त्यांचे स्वतःचे व्यक्तिमत्त्व खंबीर व स्वतंत्र असल्याने कोणत्याही दडपणाची बाधा त्यांच्या व्यक्तिचित्रणाला झालेली नाही. ज्या आपल्या प्रिय पतीचे चरित्र लिहिण्यासाठी त्यांनी या ग्रंथलेखनाचा प्रपंच केला, त्यांचे गुणदोष व विक्षिप्तपणा दाखविण्यास जेथे या कचरल्या नाहीत, तेथे इतर व्यक्तींचे गुणावगुण त्या कशा झाकून ठेवतील? आपल्या सूक्ष्म निरीक्षण शक्तीने, तल्लख बुद्धिमत्तेने व विनोदबुद्धीने त्यांनी त्यांच्या सहवासात आलेल्या व्यक्तींचा वेध घेतला व 'स्मृतिचित्रा'तून त्यांचे दर्शन घडविले. गंगाधर गाडगीळ यांनी लक्ष्मीबाईंच्या व्यक्तिचित्रणातील कौशल्याचा यथार्थ गौरव केला आहे. ते म्हणतात, 'लक्ष्मीबाईंनी नुसती व्यक्तिचित्रे रंगविली नाहीत तर या व्यक्तिचित्रांतून आणि त्यांच्या परस्पर संबंधातून

त्यांनी अनेकविध घाट निर्माण केले आहेत. फार थोर लेखकांनाच जे साधते ते त्यांनी साधले आहे.' [११९] या परस्परसंबंधातून निर्माण केलेल्या विविध घाटांद्वारे त्यांनी सर्वच व्यक्तिमत्त्वांची खुलावट साधली आहे.

टिळक व लक्ष्मीबाई खरे तर परस्पर–विरोधी स्वभावाच्या व्यक्ती. पण त्यांची व्यक्तिमत्त्वे परस्परपूरकही ठरली. टिळकांच्या संतापी स्वभावाला लक्ष्मीबाईंच्या विनोदाची जोड मिळाली, त्यांच्या अतिरेकी औदार्याला लक्ष्मीबाईंच्या व्यवहारदक्षतेचे कुंपण प्राप्त झाले, त्यांचा बंधमुक्त स्वभाव लक्ष्मीबाईंच्या एकनिष्ठेच्या पाशात बद्ध झाला व गंगाधर गाडगीळ म्हणतात त्याप्रमाणे, 'ढगांवर सूर्यप्रकाश पडल्यावर जसे इंद्रधनुष्य खुलते, तसेच टिळकांशी संबंध असल्यामुळे लक्ष्मीबाईंचे सारे व्यक्तिमत्त्व खुलले. अ णि दोघांच्या व्यक्तिमत्वाचे मिळून एक भव्य इंद्रधनुष्य निर्माण झाले. त्यांचे एक टोक हिमशिखरावर विसावले होते आणि दुसऱ्याला लक्ष्मीबाईंच्या संसाराचे शिके टांगलेले होते.'[१२०]

इतर व्यक्तिचित्रांचे परस्परसंबंधही असेच अर्थपूर्ण आहेत. टिळकांची सरळ स्वभावाची आई व त्यांचे तऱ्हेवाईक वडील, टिळकांइतकेच औदार्य व विक्षिप्तपणा लाभलेले महादेवभाऊजी, टिळकांच्या संसाराची काळजी घेऊ इच्छिणारे श्रीमंत आप्पासाहेब बुटी व डॉ. हचूम, टिळकांच्या मृत्यूने भ्रमिष्ट झालेले सखारामभाऊजी, कविहृदयाचे बालकवी व अल्पवयातच चुणचुणीतपणा दाखविणारे देवदत्त या सर्वांनी टिळकांभोवती फेर धरला आहे. लक्ष्मीबाईंच्या व्यक्तिमत्त्वाची देखील अशीच खुलावट झालेली आहे. 'स्मृतिचित्रा' तील व्यक्तिरेखांनीच प्रामुख्याने या आत्मचरित्राला वाङ्मयीन महात्मता प्राप्त करून दिली आहे, असे म्हणण्यास प्रत्यवाय नाही. हे पाहिले की मराठीतील एक थोर समीक्षक बा. सी. मर्ढेकर यांच्या विधानाची सत्यता पटते. ते म्हणतात, 'वाङ्मयीन महात्मतेत अभिप्रेत असलेल्या महात्मतेची खरी कल्पना यावयास 'स्मृतिचित्रां' च्या अभ्यासाइतकी श्रेयस्कर दुसरी गोष्ट नाही... 'स्मृतिचित्रां' तील भावनागालिचा, त्यातील राग आणि प्रेम, सहानुभूती व तिरस्कार, अव्याजसरलता आणि प्रतिष्ठित सभ्यता, भोळा असमंजसपणा आणि छद्मी व्यवहारकुशलता यांच्या निरनिराळ्या स्वरूपांची आणि परस्परसंबंधाची सूक्ष्म छाननी करण्याची सूचना दिल्याशिवाय राहवत नाही.'[१२१]

'स्मृतिचित्रां' तून प्रकट झालेली बालकवींची व्यक्तिरेखा ही एक वैशिष्ट्यपूर्ण व्यक्तिरेखा आहे. एका कवीच्या बालपणाचा तो इतिहास आहे. त्यांच्या काव्यनिर्मितीमागील पार्श्वभूमी जाणून घेण्याच्या दृष्टीने त्याला फार महत्त्व आहे. म्हणून त्यांनी केवळ बालकवींच्या आठवणीच लिहिल्या असत्या तरी वाङ्मयाच्या अभ्यासाच्या दृष्टीने ती कामगिरी मोलाची ठरली असती. बालकवींच्या व्यक्ति-

चित्रणाचा अभ्यास करताना एक शंका मात्र मनात उद्‌भवते. बालकवींचा अपघाती मृत्यू झाल्याचे सर्वांनाच माहीत आहे. तथापि या अपघाती मृत्यूवर लक्ष्मीबाई अधिक प्रकाश टाकतील, ही अपेक्षा मात्र पूर्ण होत नाही. 'ज्योतिष्याचे भविष्य त्या वेळेस खोटे ठरले पण पुढे पाच वर्षांनी खरे ठरले.' [१२१] एवढेच वास्तववादी थंडे विधान त्या करतात. हा मृत्यू रेल्वे अपघातात झाला, हेसुद्धा त्या सांगत नाहीत. बालकवींचा मृत्यू हा अपघात की आत्महत्त्या, असा विचार मनात येतो, पण त्याबद्दलही लक्ष्मीबाई काहीच सांगत नाहीत. बालकवीच्या मृत्यूने त्यांची किती वैयक्तिक हानी झाली, हे त्या सांगतात, पण त्यांना मृत्यू कसा, कोणत्या परिस्थितीत आला, याची मुळीच माहिती देत नाहीत. स्वतःच्या कौटुंबिक कथेपलीकडील व 'मी' शी संबंधित नसलेल्या जीवनातील नाट्याविषयी त्यांच्या नाट्यात्मक प्रतिभेने कमालीचा संयम बाळगला आहे; असेच म्हणावे लागेल. आपल्या संसाराचे रामायण सांगताना इतर उपाख्यानांना त्यांनी फारसे महत्त्व दिलेले नाही. त्यामुळे काही ठिकाणी वाचकांचे कुतूहल व जिज्ञासा यांचे समाधान होत नसले तरी त्यामुळे या वाङ्‌मयीन कृतीच्या लालित्याची कोठेच हानी होत नाही, हे मात्र कबूल केले पाहिजे.

लक्ष्मीबाईंनी जाणीवपूर्वक ही साहित्यकृती निर्माण केली नसली तरी कलेच्या निर्मितीचे कसब त्यांच्या ठिकाणी निसर्गदत्तच होते असे म्हणावे लागते. त्या अंतःकरणपूर्वक, प्रांजलपणे लिहू लागल्या व कलात्मकता त्यांच्या लेखणीतून झरू लागली. यादृष्टीने क्रोचे या ग्रंथकाराच्या Technique either does not exist or coincides with art itself' [१२३] या विधानाचा प्रत्यय येतो. लक्ष्मीबाईंचे व्यक्तिचित्रणातील यश केवळ असामान्य आहे.

• •

संदर्भ सूची

१. टिळक, लक्ष्मीबाई–स्मृतिचित्रे–संपादक अशोक देवदत्त टिळक–नागरिक छापखाना, नाशिक. अभिनव आवृत्ती १९७३, भाग पहिला, पृष्ठ ६.

२. तत्रैव, पृष्ठ ८.

३. तत्रैव, पृष्ठ १०.

४. तत्रैव, पृष्ठ ७७.

५. तत्रैव, पृष्ठ ३६.

६. तत्रैव, पृष्ठ ४१.

७. तत्रैव, पृष्ठ ४६:



८. तत्रैव, पृष्ठ ४७.

९. तत्रैव, पृष्ठ ५६.

१०. तत्रैव, पृष्ठ १६१.

११. तत्रैव, पृष्ठ १६०.

१२. तत्रैव, भाग दुसरा, पृष्ठ ४.

१३. तत्रैव, भाग दुसरा, पृष्ठ २८.

१४. तत्रैव, भाग दुसरा, पृष्ठ ६६.

१५. तत्रैव, भाग पहिला, पृष्ठ १२३.

१६. तत्रैव, भाग दुसरा, पृष्ठ ११.

१७. तत्रैव, भाग तिसरा, पृष्ठ ५.

१८. तत्रैव, भाग दुसरा, पृष्ठ २५.

१९. तत्रैव, भाग पहिला, पृष्ठ १०९.

२० वैद्य, सरोजिनी -माती आणि मूर्ती–मॅजेस्टिक बुक स्टॉल, मुंबई–४. प्रथमावृत्ती १९७५. पृष्ठ ९७.

२१. टिळक उनि. भाग पहिला–पृष्ठ ८०.

२२. तत्रैव, पृष्ठ ८१.

२३. तत्रैव, पृष्ठ ४४.

२४. तत्रैव, भाग पहिला, पृष्ठ ७५.

२५. तत्रैव, भाग चौथा, पृष्ठ ३५.

२६. वैद्य, उनि, पृष्ठ ९८.

२७. गाडगीळ, गंगाधर,–साहित्याचे मानदंड. पॉप्युलर प्रकाशन, मुंबई. १९६२, पृष्ठ ८५.

२८. टिळक उनि, भाग दुसरा, पृष्ठ ४९.

२९. तत्रैव, प्रस्तावना, पृष्ठ ९.

३०–अ– टिळक लक्ष्मीबाई– स्मृतिचित्रे (संक्षिप्त) संपादक देवदत्त नारायण टिळक साहित्य अकादेमी तर्फे पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, दुसरी आवृत्ती १९६८, प्रस्तावना, पृष्ठ १३.

३०–ब– टिळक अशोक देवदत्त – 'स्मृतिचित्रे आणि वस्तुस्थिती' लोकप्रभा' १ मे १९८३, पृष्ठ - २.

३१. टिळक लक्ष्मीबाई उनि, अभिनव आवृत्ती, भाग चौथा, पृष्ठ ११९.
३२. तत्रैव, भाग पहिला, पृष्ठ १७३
३३. तत्रैव, भाग दुसरा, पृष्ठ १०८
३४. तत्रैव, पृष्ठ २९.
३५. तत्रैव, भाग तिसरा, पृष्ठ १२१.
३६. तत्रैव, भाग दुसरा, पृष्ठ १२१.
३७. तत्रैव, भाग दुसरा, पृष्ठ ९३.
३८. तत्रैव, भाग चौथा, पृष्ठ १३२.
३९. तत्रैव.
४०. तत्रैव, पृष्ठ १३७.
४१. तत्रैव, भाग पहिला, पृष्ठ ८
४२. तत्रैव, पृष्ठ १२.
४३. तत्रैव, पृष्ठ २२.
४४. तत्रैव, पृष्ठ २१.
४५. तत्रैव, पृष्ठ २७.
४६. तत्रैव, पृष्ठ ७९.
४७. तत्रैव, पृष्ठ १७७.
४८. तत्रैव, पृष्ठ ३५.
४९. तत्रैव पृष्ठ १५४.
५०. तत्रैव.
५१. तत्रैव, भाग दुसरा, पृष्ठ ५१.
५२. तत्रैव, पृष्ठ ३६–३७.
५३. तत्रैव, पृष्ठ ४३–४४.
५४. तत्रैव, पृष्ठ ४४.
५५. तत्रैव, पृष्ठ ४९.
५६. तत्रैव, प्रस्तावना, पृष्ठ १२–१३
५७. तत्रैव, भाग चौथा, पृष्ठ ११८.
५८. तत्रैव, भाग तिसरा, पृष्ठ ३७.

५९. तत्रैव, पृष्ठ ३६.
६० तत्रैव, भाग पहिला, पृष्ठ ८६.
६१. तत्रैव, भाग दुसरा, पृष्ठ ६८.
६२. तत्रैव, भाग तिसरा, पृष्ठ २-३.
६३. तत्रैव, पृष्ठ २८.
६४. तत्रैव, भाग पहिला, पृष्ठ १०४.
६५. पाध्ये, प्रभाकर - 'स्मृतिचित्रां'तील टिळकदर्शन.
सत्यकथा जुलै ७६, पृष्ठ ३६.
६६. टिळक, लक्ष्मीबाई उनि, अभिनव आवृत्ती,
भाग तिसरा, पृष्ठ ६६.
६७. तत्रैव, भाग दुसरा, पृष्ठ ५९.
६८. तत्रैव, भाग पहिला, पृष्ठ ९९.
६९. तत्रैव, भाग दुसरा, पृष्ठ १३३.
७०. पाध्ये उनि, पृष्ठ ३६.
७१. टिळक, लक्ष्मीबाई उनि, भाग तिसरा, पृष्ठ १३७.
७२. तत्रैव, भाग दुसरा, पृष्ठ १२१.
७३. तत्रैव, भाग तिसरा, पृष्ठ ३१.
७४. तत्रैव, भाग पहिला, पृष्ठ १५९.
७५. गाडगीळ उनि, पृष्ठ ७३.
७६. टिळक लक्ष्मीबाई उनि, भाग पहिला, पृष्ठ १८४.
७७. तत्रैव, भाग तिसरा, पृष्ठ १४४.
७८. तत्रैव, पृष्ठ १४०
७९. तत्रैव, भाग पहिला, पृष्ठ १७७.
८०. तत्रैव, भाग तिसरा, पृष्ठ १४४.
८१. तत्रैव, पृष्ठ १५४.
८२. देशपांडे अ. ना. - आधुनिक मराठी वाङ्मयाचा इतिहास
भाग दुसरा - व्हीनस प्रकाशन पुणे २.
आवृत्ती पहिली १९५८, पृष्ठ ५५६.
८३. जोशी अ. म. - प्रदक्षिणा - 'चरित्र्यवाङ्मय'
कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे. ३०
सहावी आवृत्ती १९७६, पृष्ठ २९९.

८४. टिळक, लक्ष्मीबाई उनि, अभिनव आवृत्ती, भाग पहिला, पृष्ठ ३.
८५. तत्रैव, पृष्ठ ४.
८६. तत्रैव, पृष्ठ ६.
८७. तत्रैव, पृष्ठ ११.
८८. तत्रैव, पृष्ठ ५७.
८९. तत्रैव, भाग दुसरा, पृष्ठ २७.
९०. तत्रैव, पृष्ठ २९.
९१. तत्रैव, पृष्ठ ५२.
९२. तत्रैव, पृष्ठ १०५.
९३. तत्रैव, पृष्ठ १०६.
९४. तत्रैव, पृष्ठ १०८.
९५. तत्रैव, भाग पहिला, पृष्ठ १६.
९६. तत्रैव, पृष्ठ २४.
९७. तत्रैव, पृष्ठ १०५.
९८. तत्रैव.
९९. तत्रैव, पृष्ठ १०६.
१००. तत्रैव, पृष्ठ १०४.
१०१. तत्रैव.
१०२. तत्रैव, पृष्ठ १९.
१०३. तत्रैव, भाग तिसरा, पृष्ठ १३.
१०४. तत्रैव, भाग चौथा, पृष्ठ ३८.
१०५. तत्रैव, भाग दुसरा, पृष्ठ ७६.
१०६. तत्रैव, पृष्ठ ९९.
१०७. तत्रैव, पृष्ठ १००
१०८. तत्रैव, पृष्ठ १०१.
१०९. तत्रैव, पृष्ठ १२७.
११०. तत्रैव, भाग तिसरा, पृष्ठ २२.
१११. तत्रैव.
११२. तत्रैव, पृष्ठ २३.

११३. तत्रैव, पृष्ठ २४.
११४. तत्रैव, पृष्ठ २६.
११५. तत्रैव, पृष्ठ ५३.
११६. तत्रैव, पृष्ठ ११६.
११७. तत्रैव, पृष्ठ ११९.
११८. तत्रैव, पृष्ठ १२०.
११९. गाडगीळ, गंगाधर–साहित्याचे मानदंड, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई १९६२, पृष्ठ ८०,
१२०. तत्रैव, पृष्ठ ८१.
१२१. मर्ढेकर, बा. सी. –सौंदर्य आणि साहित्य
मौज प्रकाशन, मुंबई ४.
तिसरी आवृत्ती १९७५, पृष्ठ १६९.
१२२. टिळक, लक्ष्मीबाई उनि, अभिनव आवृत्ती,
भाग तिसरा, पृष्ठ ८४.
१२३. फडके, ना. सी.–प्रतिभासाधन
देशमुख आणि कंपनी, पुणे २.
सातवी आवृत्ती १९६०, पृष्ठ २३७.

———

संदर्भ ग्रंथ सूची

1, Arnold, Mathew–The Study of Poetry–English Critical Texts-Edited by D. J. Enright and Ernst De chickera-Oxford University Press, Delhi, Third impression 1979.

2. Aristotle's Theory of Poetry and Fine Arts ' Dover Publications INS, U S A 4 th Edition 1907.

3. Encyclopaedia Britannica, Vol. 2 Encyclopaedia Britannica, Ltd. William Benton, Publisher London, 1963.

४. कऱ्हाडे, डॉ. सदा-चरित्र आणि आत्मचरित्र (साहित्यरूप)
लोकवाङ्मयगृह प्रा. लि. मुंबई, प्रथमावृत्ती १९७६.

५. कर्वे, आनंदीबाई-माझे पुराण
केशव भिकाजी ढवळे, मुंबई ४.
दुसरी आवृत्ती १९५१.

६. कुलकर्णी, वा. ल.--वाङ्मयातील वादस्थळे
पॉप्युलर प्रकाशन--दुसरी आवृत्ती १९६२.

७. कुसुमाग्रज (संपादक)-- 'पिंपळपान'
कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे, द्वितीय आवृत्ती.

८. गाडगीळ, गंगाधर – साहित्याचे मानदंड
पॉप्युलर प्रकाशन, मुंबई १९६२.

९. जोशी, अ. म. १) चरित्र-आत्मचरित्र
सुविचार प्रकाशन मंडळ प्रा. लि. नागपूर, १९५६.
२) 'प्रदक्षिणा'
कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे ३०
पाचवी आवृत्ती १९७२.

१०. देशपांडे, अ. ना. – आधुनिक मराठी वाङ्मयाचा इतिहास
(भाग १ व २) व्हीनस प्रकाशन, पुणे.

११. देशपांडे, डॉ. कमलाबाई – स्मरणसाखळी
मनोहर ग्रंथमाला प्रकाशन पुणे, १९४३.

12 Naik Dr. D. G. – Art of Autobiography. Vidarbha Marathwada Book Company, Poona. First published 1962.

13. Nicolson, Harold –The Development of English Biography, The Hogarth Press, London, 1959.

१४. ठिपसे, सौ. प्रतिभा – हृद्‌गत
दास्ताने रामचंद्र आणि कंपनी पुणे.
प्रथमावृत्ती १९८१.

१५. फडके, ना. सी. – प्रतिभा-साधन
देशमुख आणि कंपनी, पुणे २.
दहावी आवृत्ती १९७०.

१६. फडके, भालचंद्र– मराठी लेखिका : चिंता आणि चिंतन
श्रीविद्या प्रकाशन, पुणे ३० पहिली आवृत्ती १९८०

१७. मराठी विश्वकोश – खंड दुसरा
महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृति मंडळ, मुंबई.
प्रथम प्रकाशन १९७६.

१८. मर्ढेकर, बा. सी.– सौंदर्य आणि साहित्य
मौज प्रकाशन, तिसरी आवृत्ती १९७५.

19, Maurois, Andre– Aspects of Biography
Cambridge University Press, 1929.

20. Wellek and Warren–
Theory of Literature–Penguin Books,
Third Edition–Reprinted 1968.

२१. वैद्य, सरोजिनी – माती आणि मूर्ती
मॅजेस्टिक बुक स्टॉल, मुंबई ४.
प्रथमावृत्ती १९७५.

२२. सहस्रबुद्धे, पु. ग. – स्वभावलेखन
मॉर्डन बुक डेपो, पुणे, १९३८.

नियतकालिके :–

१. महाराष्ट्र साहित्य पत्रिका –
अंक २२१, एप्रिल-मे-जून १९८२.

२. ललित-
दिवाळी अंक, नोव्हेंबर डिसेंबर १९८१.
एप्रिल, १९८२.

३. लोकप्रभा –

४. वीणा – मे १९६४. १ मे १९८३.

५. सत्यकथा – जुलै १९७६.



REFBK-0025554

'स्मृतिचित्रे' हे एक बालबोध पुस्तक वाटले तरी ते तसे नाही. कारण या आत्मचरित्राने तत्कालीन स्त्री जीवनावर आणि विशेषत: धार्मिक, सामाजिक संकेतावर स्पष्ट प्रकाश टाकला आहे. एका बालबोध वाटणाऱ्या पण नाना प्रकारचे अनुभव गोळा केलेल्या एका विलक्षण आणि रसज्ञ वृत्तीच्या कलावती सुगृहिणीने सहजगत्या आपल्या स्वत:च्या, आपल्या पतीच्या आणि आप्त नातलगांच्या भावजीवनावर शोधक झोत टाकला आहे. 'स्व' ला बाजूला ठेवून आजुबाजूच्या जगाकडे काहीशा मिस्किलपणाने पण सखोलपणाने पाहण्याची एक दुर्मिळ समजूतदार वृत्ती लक्ष्मीबाईंच्या ठायी असल्यामुळे हे आत्मचरित्र केवळ आत्मचरित्रात्मक वाङमयातच नव्हे तर मराठी वाङमयात सुद्धा 'अक्षर' स्वरुपाचे एक लेणे होऊन वसले आहे. अशा या साहित्यकृतीबद्दलचे चिंतन वाचकांच्या पुढे ठेवत आहेत प्रा. मीर इसहाक सुलेमान शेख. कोणतेही आत्मचरित्र वाचताना, अभ्यासताना प्रा. शेख ह्यांचे प्रस्तुत चिंतन वाचायलाच हवे हेच ह्या पुस्तकाचे वैशिष्ठ्य ठरावे. प्रा. मीर इसहाक सुलेमान शेख हे सोलापूर सोशल असोसिएशन आर्टस् अॅन्ड कॉमर्स कॉलेजमध्ये मराठी विभागाचे प्रमुख आहेत. प्रा. शेख विविध नियतकालिकांतून कविता व स्फुट लेखन करीत असतात.

प्रतिमा प्रकाशन